
सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित
धाराशिव | सोमवार, २० जुलै २०२६ | वर्ष ४ थे अंक १३१ | पाने १२ | किंमत रु. ८/- ■ RNI No. MAHMAR/2023/86468 ■ Postal Regd No. SLP/32/2024-2026. dainiktarunbharat.com epaper.dainiktarunbharat.com

## विचारपुष्प



आपल्या जबाबदाऱ्या सांभाळून संघासाठी अधिकाधिक वेळ काढता येईल, अशी आपली दिनचर्या असली पाहिजे. याबरोबरच संघकार्याच्या दृष्टीने आपली शारीरिक, बौद्धिक, मानसिक क्षमताही वाढत राहील यासाठी आपण प्रयत्नशील असले पाहिजे.

- स्व. हो. वे. शेषाद्री
रा. स्व. संघाचे पूर्व सरकार्यवाह

# पूर्वसूचना दिल्यावरच विधेयके आणणार

## केंद्र सरकारची भूमिका; आजपासून पावसाळी अधिवेशन




**नवी दिल्ली, १९ जुलै**

संसदेच्या पावसाळी अधिवेशनाला सोमवारपासून प्रारंभ होत आहे. अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला सरकारने सर्वपक्षीय बैठक बोलावली होती. अधिवेशनाचे कामकाज सुरळीत चालवण्यासाठी विरोधी पक्षांनी सहकार्य करण्याचे आवाहन या बैठकीत सरकारतर्फे करण्यात आले.

राममंदिरातील देणगीतील कथित गैरव्यवहार, सोनम वांगचुक यांना जबरदस्तीने रुग्णालयात दाखल करणे आणि अन्य मुद्यांवरून विरोधी पक्ष आक्रमक भूमिका घेत सरकारला घेरण्याची शक्यता असल्यामुळे हे अधिवेशन वादळी होण्याची शक्यता आहे.

संसद भवन परिसरात संरक्षणमंत्री राजनाथसिंह यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीला राज्यसभेतील सत्तापक्षनेते जे. पी. नड्डा, सांसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू, राज्यमंत्री अर्जुन राम मेघवाल, डॉ. एल. मुरुगन, अपना दलच्या नेत्या अनुप्रिया पटेल, जदयुचे नेते संजय झा, काँग्रेसचे जयराम रमेश, सपाचे धर्मेंद्र प्रधान यांच्यासह ४० पक्षांचे ५० नेते उपस्थित होते.

विरोधक उपस्थित करणाऱ्या सर्व विषयांवर सभागृहात चर्चा घडवून आणण्याची सरकारची तयारी असल्याचे तसेच सरकार जी विधेयके अधिवेशनात आणेल, त्याची पूर्वसूचना विरोधी पक्षांना देण्यात येईल, असे सांसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी तीन तास चाललेल्या सर्वपक्षीय बैठकीनंतर पत्रकारांना सांगितले.

पावसाळी अधिवेशनाच्या तोंडावर सरकारने रविवारी सर्वपक्षीय बैठक बोलावली होती. आपला विरोध दर्शवण्यासाठी सुरुवातीला विरोधी पक्षांनी काही वेळ या बैठकीवर बहिष्कार घातला, नंतर मात्र ते या बैठकीत सहभागी झाले. काँग्रेस, आप, समाजवादी पक्ष आणि अन्य विरोधी पक्षांनी या बैठकीवर सांकेतिक बहिष्कार घातला.

महिला आरक्षण आणि मतदारसंघाच्या परिसीमनाबाबतचे विधेयक सरकार या अधिवेशनात आणणार का याबाबत उत्सुकता वाढली आहे. सरकारने याबाबत स्पष्टपणे काहीही सांगितले नाही.

अधिवेशनात आठ विधेयके मांडली जाणार आहेत. त्याबाबतची अधिकृत माहिती संसदेच्या सचिवालयाने दिली आहे, याकडे लक्ष वेधत किरेन रिजिजू म्हणाले की, अन्य कोणतेही विधेयक सरकार मांडणार असेल तर त्याची सूचना दिली जाईल, विरोधी पक्षांना विश्वासात घेऊन त्याबाबत चर्चाही केली जाईल. (वृत्तसंस्था)

### स्वतंत्र चौकशीची काँग्रेसची मागणी

राममंदिरातील देणगी अपहार प्रकरणाची स्वतंत्र आणि व्यापक चौकशी करण्यात यावी, अशी मागणी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष आणि राज्यसभेतील विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खडगे तसेच लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पाठवलेल्या पत्रातून केली आहे. श्रीराम जन्मभूमी तीर्थक्षेत्र न्यासाची स्थापना केंद्र सरकारने सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानंतर केली, तसेच या न्यासातील सदस्यांची नियुक्तीही केंद्र सरकारने केली. त्यामुळे सरकार या प्रकरणातील आपली जबाबदारी टाळू शकत नाही, असे काँग्रेसने या पत्रात म्हटले आहे.

### तृणमूल काँग्रेसचे पंतप्रधानांना पत्र

मतदारसंघाचे परिसीमन आणि एफसीआरए विधेयकाच्या मुद्यावर सरकारने सर्वपक्षीय बैठक बोलवावी, अशी मागणी तृणमूल काँग्रेसचे खासदार डेरेक ओ ब्रायन यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पाठवलेल्या पत्रातून केली आहे. या दोन्ही महत्त्वपूर्ण मुद्यांवर कोणताही निर्णय घेण्यापूर्वी सरकारने सर्व पक्षांना विश्वासात घ्यावे, त्यांच्याशी चर्चा करावी, अशी मागणी ब्रायन यांनी पत्रातून केली आहे.

# आईने १० महिन्यांच्या चिमुकलीला पाण्याच्या बादलीत बुडवून ठार मारले

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी दि. १९ जुलै-**

२६ वर्षीय दस्तुरखुद्द आईने अवघ्या १० महिन्यांच्या चिमुकलीला गळा दाबत, पाण्याच्या बादलीत बुडवून ठार मारल्याची धक्कादायक व नातेसंबंधाला काळीमा फासणारी घटना बार्शी शहरातील शंभुराजे चौक, अलीपूर रोड परिसरात घडली. विशेष म्हणजे, 'ती' निर्दयी आई आपल्या सहा वर्षीय दुसऱ्या मुलीला घेऊन स्वतः बार्शी शहर पोलिस ठाण्यात हजर होत, पोटच्या मुलीचा खून केल्याचे सांगितले. याप्रकरणी 'त्या' आईच्या विरोधात भारतीय न्याय संहिता कलम १०३ (१) व १०९ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला.




यातील संशयित पूजा योगेश खुर्दामुळे (वय-२६, मूळ रा.शिराढोण, ता.कंधार, जि.नांदेड, सध्या रा.शंभुराजे चौक, अलीपूर रोड, बार्शी) ही रविवार दि.१९ जुलै २०२६ रोजी सकाळी ९.३५ वाजण्याच्या सुमारास दोन मुलींना घेऊन पोलिस ठाण्यात आली. दोन मुलीसह हातात घेतलेले लहान मुलगी दाखवत ती म्हणाली की, मी हिचा गळा दाबून तिला पाण्याच्या बादलीमध्ये बुडवून जिवंत मारले असून मला अटक करा, मला गोळ्या घालून मारुन टाका. यानंतर महिला पोलीस हेड कॉन्स्टेबल शबाना कोतवाल यांनी विचारपूस केली असता, तिने स्वतःच मुलीचा गळा दाबून तसेच पाण्याने भरलेल्या बादलीत बुडवून तिचा जीव घेतल्याचे सांगितल्याची नोंद फिर्यादीत आहे.

प्राथमिक चौकशीत संबंधित महिलेने नवऱ्याकडून होत असलेल्या कथित त्रासाला कंटाळून दोन्ही मुलींना ठार मारण्याचा निर्णय घेतल्याचे सांगितले. उपविभागीय पोलिस अधिकारी सुहास जगताप, बार्शी शहर पोलिस ठाण्याचे पोनि गणेश कुंभार यांनी घटनास्थळी भेट देऊन घटनास्थळाचा पंचनामा, पुरावे संकलन व इतर कायदेशीर प्रक्रिया पूर्ण केली. पुढील तपास सपोनि सुनील धनवे हे करीत आहेत.

### मी चांगली शाळा शिकते म्हणाल्यानंतर सहा वर्षीय तेजल बचावली

या घटनेत बचावलेल्या सहा वर्षीय तेजल योगेश खुर्दामुळे हिने पोलिसांना दिलेल्या प्राथमिक माहितीनुसार, वडील सकाळी कामावर गेल्यानंतर आईने प्रथम १० महिन्यांच्या शक्तीचा गळा दाबून तिला पाण्याच्या बादलीत बुडवले. त्यानंतर तिचाही गळा दाबून तोंडावर उशी दाबण्याचा प्रयत्न केला. मात्र, 'मी चांगली शाळा शिकते, मला मारु नको,' अशी विनवणी केल्यानंतर आईने तिला सोडल्याचे मुलीने सांगितल्याची माहिती पोलिसांनी नोंदवली आहे.

# भाविकांच्या कारला अपघात; एकाच कुटुंबातील १ ठार, ६ जखमी

### वळसंग टोल नाकाजवळील घटना

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१९ जुलै-**

दर्शन घेवून निघालेल्या संभाजीनगर येथील भाविकांच्या कारला समोरुन मालट्रकने जोराची धडक दिली. या अपघातात एकाच कुटुंबातील एका जणाचा जागीच मृत्यू झाला तर सहा जण जखमी झाले. ही घटना सोलापूर-अक्कलकोट मार्गावर वळसंग टोल नाक्याजवळ घडली.



प्रकाश सिताराम देशमुख (वय-५०) असे मृत्यू झालेल्या व्यक्तीचे; वर्षा प्रकाश देशमुख (वय-३९), विशाल प्रकाश देशमुख (वय-२४), शिवानी योगेश देशमुख (वय-२१), अमोल अशोकराव देशमुख (वय-३२), अभिनव प्रभाकर देशमुख (वय-१३), प्रिन्स अमोल देशमुख (वय-८) अशी जखमींची नावे आहेत.

याबाबतचे वृत्त असे की, देशमुख परिवारातील हे सर्वजण संभाजी नगरहून एम.एच.२५ आर ०५८८ या क्रमांकाच्या कारमधून देवदर्शनासाठी आले होते. शनिवारी रात्री पंढरपूर येथे दर्शन घेऊन ते सोलापूरमार्गे अक्कलकोटकडे जात होते. रविवारी पहाटे त्यांची कार वळसंग टोल नाक्याजवळ आली असता समोरुन येत असलेल्या के.ए.३२ ए.ए.७४५० या क्रमांकाच्या ट्रकने जोराची धडक दिली. अपघाताची माहिती मिळताच वळसंग पोलिस घटनास्थळी दाखल झाले. मयत प्रकाश देशमुख यांचा मृतदेहाचे शासकीय रुग्णालयात विच्छेदन केल्यानंतर नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात आला. जखमींवर कुंभारी येथील अश्विनी सहकारी रुग्णालयात दाखल प्राथमिक उपचार करुन संभाजीनगर येथे पुढील उपचारासाठी हलविण्यात आले.

## महत्त्वाचे

### एअर इंडियाच्या ताफ्यात ६० विमाने

**नवी दिल्ली :** टाटा समूहाच्या मालकीची एअर इंडिया एक्सप्रेस आणि एअर इंडियाच्या ताफ्यात ६० नवीन विमाने येणार आहेत. एअर इंडिया समूहाचे मुख्य व्यावसायिक अधिकारी आणि एअर इंडिया एक्सप्रेसचे अध्यक्ष निपुण अग्रवाल यांनी ही माहिती दिली. समूहाची परिवर्तन योजना पूर्णपणे योग्य मार्गावर आहे. एअर इंडिया समूहाला आगामी काळात ६० नवीन विमाने मिळणार आहेत. कंपनीने एकूण ६०० विमानांच्या खरेदीसाठी प्रक्रिया सुरू केली आहे. त्यापैकी १० टक्क्यांपेक्षा कमी विमाने वितरित झाली आहेत. पुढील सात ते आठ वर्षांसाठी, दरवर्षी ५० ते ६० विमाने ताफ्यात सामील केली जातील. एअर इंडिया एक्सप्रेस जुन्या विमानांना सेवेतून कमी करून त्याऐवजी नवीन विमाने ताफ्यात आणेल. प्रवाशांच्या सुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य असल्याचेही त्यांनी सांगितले.

### 'कॉक्रोच'च्या मोर्चाला परवानगी नाही

**नवी दिल्ली :** कॉकरोच पार्टीच्या सोमवारच्या 'चलो संसद' मोर्चाला दिल्ली पोलिसांनी परवानगी देण्यास स्पष्ट नकार दिला आहे. संसदेच्या पावसाळी अधिवेशनाचा पहिलाच दिवस असल्याने पोलिसांनी सुरक्षेच्या कारणास्तव हा निर्णय घेतला आहे. पोलिसांनी यासंदर्भात एक जाहीर नोटीस प्रसिद्ध केली असून, कायदा मोडणाऱ्यांवर कडक कायदेशीर कारवाई केली जाईल, असा इशारा आहे. पोलिसांनी निवेदनात म्हटले की, 'कॉकरोच पार्टी'च्या संसद चलो मोर्चाला परवानगी देण्यात आलेली नाही. संसदेच्या मार्गावर निषेध मार्च काढण्यास बंदी आहे.

# अमेरिकेचा अणुऊर्जा केंद्रावर हल्ला

### सैनिकांच्या मृत्यूचा सूड घेण्याचा संकल्प

**दुबई, १९ जुलै**

इराणने आखाती देशांतील लष्करी आणि हवाई तळावर केलेल्या हल्ल्यात अमेरिकेच्या विमानांचे नुकसान झाले, तसेच तीन सैनिकांना जीव गमवावा लागला. सैनिकांच्या मृत्यूचा सूड घेण्याच्या संकल्पाने अमेरिकेने इराणचे सामरिक आणि व्यापारी दृष्टीने महत्त्वाचे असलेल्या केशम बेटावर क्षेपणास्त्रांचा मारा केला. याशिवाय डारखोविन अणुऊर्जा प्रकल्पाला लक्ष्य केले. दुसरीकडे इराणने सलग तिसऱ्या दिवशी कुवेत-बहरीन-जॉर्डनवर ड्रोन आणि क्षेपणास्त्रांचा मारा केला. या हल्ल्यात अमेरिकेच्या लष्करी आणि हवाई तळांच्या पायाभूत सुविधांचे नुकसान झाले.


अमेरिकेच्या हल्ल्यानंतर इराणच्या केशम बेटावर अनेक स्फोट झाले

अमेरिकेने इराणच्या केशम बेट आणि सिरिक बंदरावर रविवारी हवाई हल्ले चढवले. जॉर्डनमध्ये दोन अमेरिकी सैनिकांच्या मृत्यूनंतर ही कारवाई करण्यात आली आहे. अमेरिकेच्या सेंट्रल कमांडने (सेंटकॉम) जारी केलेल्या निवेदनात म्हटले की, सैन्याने सामरिकदृष्ट्या महत्त्वाच्या होर्मुझ सामुद्रधुनीमध्ये असलेल्या इराणच्या सिरिक या बंदर शहरालाही लक्ष्य केले. होर्मुझमधील व्यापारी जहाजांची सुरक्षा सुनिश्चित करणे आणि इराणी सैन्याला कमकुवत करणे हा याचा उद्देश आहे. इराणच्या अणुऊर्जा संस्थेने डारखोविन अणुऊर्जा प्रकल्पावर हल्ला झाल्याची पुष्टी केली आहे. खुझेस्तान प्रांतातील या अणुऊर्जा प्रकल्पावर क्षेपणास्त्रांचा मारा करण्यात आला. नुकसानीचे अवलोकन केले जात असून, यासंदर्भातील माहिती लवकरच जाहीर केली जाईल.

### इराणचा निषेध

इराणने आखाती प्रदेशातील अमेरिकी तळांवर प्रतिहल्ले तीव्र केले आहेत. कुवेतमध्ये एका तेल सुविधेला आणि एका वीज व पाणी प्रकल्पाला लक्ष्य करण्यात आले. दुसरीकडे बहरीनमधील लष्करी, हवाई तळांवर आणि जॉर्डनमधील अल-अझराक या अमेरिकी तळावरील इंधन टाक्यांनाही लक्ष्य करण्यात आले. इराणच्या हल्ल्याचा आखाती देशांनी संयुक्त निवेदन जारी करत निषेध नोंदवला आहे.

**५० इराणी नागरिक ठार**

अमेरिकेच्या हल्ल्यात ५० नागरिकांचा मृत्यू झाला असून, ५०० पेक्षा अधिक जखमी झाले आहेत. (वृत्तसंस्था)

# वांगचुक यांच्या उपचारात हस्तक्षेप करण्यास नकार

## दिल्ली उच्च न्यायालयाने नाकारला अंतरिम आदेश

**नवी दिल्ली, १९ जुलै**

सफदरजंग रुग्णालयात उपचार घेत असलेले सामाजिक कार्यकर्ते सोनम वांगचुक यांच्या उपचार प्रक्रियेत हस्तक्षेप करण्यास दिल्ली उच्च न्यायालयाने रविवारी नकार दिला. उपोषणाला बसलेल्या वांगचुक यांना जंतरमंतरवरून सरकारी रुग्णालयात हलवण्याच्या सरकारच्या निर्णयाला 'मनमानी' म्हणता येणार नाही, असे न्यायालयाने स्पष्ट केले.

सोनम वांगचुक यांचे हस्तांतरण करण्याचा या टप्प्यावर कोणताही अंतरिम आदेश देण्याची गरज नाही, असे न्या. मिनी पुष्कर्णा यांनी सांगितले. वांगचुक यांना खाजगी रुग्णालयात हलवण्याची परवानगी मागणाऱ्या त्यांच्या पत्नी, गीतांजली जे. आंग्मो यांच्या याचिकेवर हे निरीक्षण नोंदवण्यात आले. सफदरजंग रुग्णालयातील डॉक्टर वांगचुक यांच्यावर बारकाईने लक्ष ठेवून आहेत आणि उपचारासाठी त्यांच्यावर बळाचा वापर केला जात आहे, असे म्हणता येणार नसल्याचे न्या. पुष्कर्णा यांनी रविवारी झालेल्या विशेष सुनावणीदरम्यान सांगितले.

वांगचुक यांनी स्वतःहून कोणत्याही रुग्णालयात दाखल न झाल्यामुळे, त्यांच्या वैद्यकीय स्थितीचा विचार करता त्यांना सफदरजंग रुग्णालयात नेण्याचा सरकारला पूर्ण अधिकार होता, असे निरीक्षण न्या. पुष्कर्णा यांनी वांगचुक यांच्या आरोग्यावर लक्ष ठेवण्याचा आणि गरज भासल्यास वैद्यकीय हस्तक्षेप करण्याचा निर्देश देणाऱ्या उच्च न्यायालयाच्या १६ जुलैच्या आदेशाची दखल घेत नोंदवले. सफदरजंग रुग्णालयातील डॉक्टर वांगचुक यांच्या प्रकृतीवर बारकाईने लक्ष ठेवून आहेत, असे न्यायालयाने सांगितले. (वृत्तसंस्था)

### नातेवाईकांना भेटण्याची परवानगी

सध्याच्या टप्प्यावर न्यायालयाकडून कोणताही अंतरिम आदेश पारित करण्याची आवश्यकता नाही. वांगचुक यांच्या २४ तास भेटीची परवानगी पत्नी, त्यांचे भाऊ आणि मेहुण्यांना आहे, असे न्या. पुष्कर्णा यांनी स्पष्ट केले.

# उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी घेतले श्रीविठ्ठल-रुक्मिणी मातेचे मुखदर्शन

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.१९ जुलै-**

आषाढी यात्रेच्या अनुषंगाने श्रीक्षेत्र पंढरपूर येथे मोठी गर्दी झाली असून भाविकांना श्रीविठ्ठल-रुक्मिणीचे दर्शन सुलभरित्या घेता यावे; यासाठी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी रविवार, दि.१९ जुलै २०२६ रोजी श्री विठ्ठल-रुक्मिणी मातेचे मुखदर्शन घेतले. त्यांच्यासमवेत सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर, गृहराज्यमंत्री योगेश कदम हेही होते.



यावेळी तीर्थक्षेत्र विकास आराखड्यातून श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर जतन व संवर्धनाचे काम सुरु असून, झालेल्या कामांची तसेच प्रस्तावित नवीन दर्शन मंडपाबाबत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी माहिती घेतली. मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी मंदिर जतन, संवर्धन व नवीन दर्शन मंडपाच्या कामाबाबतची सविस्तर माहिती दिली.

श्रीविठ्ठल-रुक्मिणी मंदिर समितीच्या वतीने जिल्हाधिकारी एस.कार्तिकेयन व कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांच्या हस्ते उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा शाल व श्री विठ्ठल-रुक्मिणीची मूर्ती देऊन सत्कार करण्यात आला. गृहराज्यमंत्री योगेश कदम व आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांचाही मंदिर समितीच्या वतीने कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी सत्कार केला.

दरम्यान, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पंढरपूर कॉरिडॉर बाबत नागरिकांशी चर्चा केली. याप्रसंगी आ.तानाजी सावंत, आ.समाधान आवताडे, आ.राजू खरे, आ.अभिजीत पाटील, जिल्हाधिकारी एस.कार्तिकेयन, प्रांताधिकारी सचिन इथापे, व्यवस्थापक प्रवीणकुमार घम आदी उपस्थित होते.

# होय, मी अर्बन नक्षल दीपकेवर शाई फेकली

## बरखा त्रेहान यांची 'एक्स'वर निर्भीड पोस्ट; हिंदू देवतांचा अपमान केल्याने संतप्त

**नवी दिल्ली, १९ जुलै**

जंतरमंतरवर आंदोलन करणाऱ्या 'कॉक्रोच' पार्टीचा नेता अभिजित दीपकेवर शाईफेक करणाऱ्या बरखा त्रेहान यांनी निर्भीडपणे 'एक्स'वर पोस्ट करीत स्वतःची बाजू मांडली आहे. होय, मी अर्बन नक्षल अभिजित दीपकेवर शाई फेकली. कॉक्रोच पार्टीच्या मंचावरून प्रभू श्रीरामाचा अपमान झाला, तेव्हा तो हसला होता. मी एक कट्टर हिंदू आहे. मला खूप संताप आला. हा माझा निषेध होता आणि मला त्याचा अभिमान आहे, असे त्यांनी या पोस्टमध्ये म्हटले आहे.



रविवारी दुपारी दीड वाजताच्या सुमारास अभिजित दीपके समर्थकांना संबोधित करीत होता. भाषणादरम्यान सोनम वांगचुक यांना निदर्शनाच्या ठिकाणावरून पोलिसांनी युक्ती लढवत हटवले असा आरोप केला. दीपके भाषण करीत असताना बरखा त्रेहान हळूहळू मंचाच्या दिशेने गेली आणि अगदी जवळून दीपकेच्या अंगावर शाई फेकली. कॉक्रोच पार्टीच्या समर्थकांनी तिला तातडीने मंचापासून दूर ओढले आणि संसद मार्ग पोलिस ठाण्यात नेले. शांततापूर्ण निदर्शनांना विरोध नाही आणि माझा कोणत्याही राजकीय पक्षाशी संबंध नाही, असे बरखा त्रेहान यांनी आपल्या कृतीचे समर्थन करताना सांगितले. माझा कोणत्याही राजकीय पक्षाशी संबंध नाही. कॉक्रोच पार्टीच्या या आंदोलनाचा संबंध नीट परीक्षेच्या मुद्याशी नाही, उलट हे आंदोलन राजकीय प्रेरित आहे, असा आरोप त्रेहान यांनी केला.

अभिजित दीपके आणि त्याच्या सहकाऱ्यांनी भगवान राम आणि माता सीता यांच्याबद्दल अपमानास्पद टिप्पणी केली, असा आरोप त्रेहान यांनी केला. त्या वक्तव्यांचा निषेध करण्यासाठीच शाई फेकली, असे त्यांनी सांगितले. हिंदू देवतांचा अपमान सहन न झाल्याने आपण हे पाऊल उचलले, असे सांगितले. केवळ निषेध म्हणून मी अभिजितवर शाई फेकली. मला तसे करणे भाग पडले. अशा गोष्टी मी कधीच सहन करीत नाही. राहिला प्रश्न त्या गुंडांचा तर त्यांनी मला मारहाण केली, असे त्रेहान यांनी सांगितले. (वृत्तसंस्था)

### सोनम वांगचुक यांचा वापर

या घटनेनंतर कॉक्रोच पार्टीच्या समर्थकांनी माझ्यावर हल्ला केला. मला मारहाण करण्यात आली. केस ओढले गेले, असा आरोप त्रेहान यांनी केला. या आंदोलनात सोनम वांगचुक यांचा वापर करून घेतला जात असल्याचे अण्णा हजारेंसोबत या आंदोलनाची तुलना करताना सांगितले.

### प्रोफाईलवर हिंदू उद्योजक म्हणून ओळख



बरखा त्रेहान यांना बाहेर नेले जात असताना त्यांनी 'जय श्रीराम'चा जयघोष केला, असे पोलिसांनी सांगितले. 'एक्स'वरील त्यांच्या पोस्टमध्ये कॉक्रोच पार्टीवर वारंवार टीका केली आहे. या मंचावरील प्रोफाईलमध्ये स्वतःची ओळख 'हिंदू उद्योजक' आणि 'व्हॉईस ऑफ मेन' अशी करून देण्यात आल्याची माहिती पोलिसांनी दिली.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत

https://epaper.dainiktarunbharat.com/



## महत्वाचे...



## वटवृक्ष देवस्थानच्या माध्यमातून शिक्षणासोबत संस्कारही दिले जातात

**अक्कलकोट, दि. १९ जुलै-**

येथील श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थानच्या माध्यमातून शिक्षणासोबत संस्कारही दिले जात आहेत ही अभिमानाची बाब आहे कारण कै.कल्याणराव इंगळे तंत्रनिकेतन महाविद्यालयाने ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी खूप चांगले काम केले आहे, असे मनोगत महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण संचालनालयाचे संचालक डॉ. विनोद मोहितकर यांनी व्यक्त केले. नुकतेच डॉ. विनोद मोहितकर यांनी सपत्निक अक्कलकोट येथील श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थानाला भेट देऊन स्वामी समर्थांचे दर्शन घेतले. यावेळी मंदीर समितीच्या वतीने समितीचे चेअरमन महेश इंगळे यांनी डॉ.विनोद मोहितकर यांचा सपत्निक श्री स्वामी समर्थांचे कृपावस्त्र, प्रसाद, प्रतिमा देऊन यथोचित सत्कार केला. यावेळी डॉ.विनोद मोहितकर बोलत होते. यावेळी प्राचार्य नागनाथ जेऊरे सर, प्रा.विजयकुमार पवार, देवस्थानचे सचिव आत्माराम घाटगे आणि विश्वस्त महेश गोगी उपस्थित होते.





## पिलीव केंद्र शाळेच्या व्यवस्थापन समिती अध्यक्षपदी नाना मदने

### उपाध्यक्षपदी अश्विनी वगरे यांची निवड

**पिलीव, दि. १९ जुलै-**

माळशिरस तालुक्यातील पिलीव येथील जिल्हा परिषद प्राथमिक केंद्र शाळेच्या शाळा व्यवस्थापन समितीची नूतन कार्यकारिणी जाहीर झाली असून, अध्यक्षपदी नाना मदने तर उपाध्यक्षपदी अश्विनी वगरे यांची सर्वानुमते बिनविरोध निवड करण्यात आली आहे. तर सर्वसाधारण सदस्य योगेश देशमुख, रघुनाथ नरळे, संतोष बोडरे, सारंग बनसोडे, सचिन मदने, महिला सदस्य रेश्मा खामगळ, रुक्सार पठाण, राजश्री जोशी, आम्रपाली वाघमारे यांच्या निवडी करण्यात आल्या. निवड प्रक्रिया शांततेत पार पडल्यानंतर मुख्याध्यापक राजू गोरवे आणि सर्व शिक्षकवृंदाच्या वतीने नवनिर्वाचित अध्यक्ष, उपाध्यक्ष व सर्व सदस्यांचा सत्कार करण्यात आला.

## काँग्रेस (आय) महिला काँग्रेसच्या जिल्हा अध्यक्षपदी डॉ. सुवर्णा मलगोंडा

**अक्कलकोट, दि. १९ जुलै-**



सोलापूर जिल्हा काँग्रेस (आय) महिला काँग्रेसच्या जिल्हा अध्यक्ष पदी डॉ. सुवर्णा मलगोंडा यांची निवड अखिल भारतीय महिला काँग्रेसच्या सरचिटणीस शिल्पी आरोरा यांनी पत्राद्वारे केली आहे. डॉ. सुवर्णा मलगोंडा या अक्कलकोट नगरपालिकेच्या माजी नगराध्यक्षा आहेत. त्या शहरातील नामांकित डॉक्टर म्हणून प्रसिद्ध आहेत. महाराष्ट्र राज्याच्या माजी शिक्षण राज्यमंत्री पार्वतीबाई मलगोंडा यांच्या त्या कन्या आहेत. डॉ. मलगोंडा यांची निवड झाल्याने भारताचे माजी गृहमंत्री मा. सुशीलकुमार शिंदे, खा. प्रणिती शिंदे, जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष सातलिंग शटगार, वरीष्ठ उपाध्यक्ष अरुण जाधव, अशपाक बळोरगी, तालुका काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन पाटील, बाळासाहेब शेळके, भिमाशंकर जमादार, ॲड. अर्जुन पाटील यांनी त्यांचे अभिनंदन केले.



## सोजर स्कूलमध्ये 'टाकाऊपासून टिकाऊ' स्पर्धेचे आयोजन

**बार्शी, दि. १९ जुलै-**

यशोदा शिक्षण प्रसारक मंडळ संचलित सोजर इंग्लिश स्कूल माध्यमिक विभागाच्यावतीने 'टाकाऊ पासून टिकाऊ' वस्तू बनविण्याच्या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये प्रशालेतील विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने स्पर्धेत सहभाग नोंदवला. इयत्ता ५ ते ७ व इयत्ता ८ ते १० या दोन गटात ही स्पर्धा संपन्न झाली. विद्यार्थ्यांनी प्लास्टिक बॉटल्स, बांबू, कार्डबोर्ड, लाकूड, वृत्तपत्रे, कपडे, टायर यासारख्या अनेक टाकाऊ गोष्टींपासून आकर्षक व सुंदर वस्तू तयार केल्या. स्पर्धेचे परिक्षण मुख्याध्यापक संदीप पोळ लिपीक भगवंत बडवे यांनी केले. यामध्ये इयत्ता ५ ते ७ या गटातून अनुक्रमे सर्वज्ञ शिंदे प्रथम, अलिझा आत्तार द्वितीय व आर्यन बारंगुळे तृतीय तर इयत्ता ८ ते १० या गटातून अनुक्रमे कृष्णा इंगळे, प्रांजल वाघमारे आणि साद शेख यांनी क्रमांक मिळवले. या स्पर्धेच्या यशस्वीतेसाठी सर्व शिक्षकांनी विद्यार्थ्यांना योग्य मार्गदर्शन केल्यामुळे मुलांनी या स्पर्धेचा आनंद घेतला. सांस्कृतिक विभागाच्या मार्गदर्शनाखाली या स्पर्धेचे व्यवस्थापन शिक्षक सचिन शिंदे आणि शिक्षिका प्रमोदिनी गायकवाड यांनी केले.

# पंढरपुरात ११ लाखांचा मुद्देमाल जप्त

### अवैध दारु साठ्यावर पोलिसांचा छापा; आषाढीच्या पार्श्वभूमीवर कारवाई

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. १९ जुलै-**



पंढरपूर शहर पोलिसांची आषाढी वारीच्या अनुषंगाने मोठी कारवाई करीत एकूण १ लाख ४२ हजार रुपयाची अवैध दारू व एक कार तसेच दोन मोटरसायकल असा ११ लाख ४२ हजारांचा मुद्देमाल जप्त केला.

सहाय्यक पोलीस अधीक्षक प्रशांत दगडे यांच्या मार्गदर्शनाखाली आषाढी वारीच्या अनुषंगाने पंढरपूर शहर पोलिसांनी एक होंडाई कंपनीची कार (क्रं.एमएच१३- इसी ६९०८) एक युनिकॉन कंपनीची मोटरसायकल एक स्कूटी असा तीन वाहनांमधून अवैधरित्य दारूचे बॉक्स घेऊन जात असताना सापळा लावून ४२ बॉक्स दारू त्यामध्ये देशी विदेशी कंपन्याची एक लाख ४२ हजार रुपयांचा अवैध दारू साठा, एक कार आणि दोन मोटरसायकल असा ११ लाख ४२ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केलेला असून या कारवाईमध्ये सात आरोपी विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. जिल्हा पोलिसअधीक्षक अतुल कुलकर्णी, अपर पोलीस अधीक्षक विजय कबाडे, येथील सहाय्यक पोलीस अधीक्षक प्रशांत डगळे यांच्या मार्गदर्शनाखाली पंढरपूर शहर पोलिस स्टेशनचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक टी.वाय. मुजावर, पोलीस उपनिरीक्षक नितीन जगताप, हवालदार रोंगे, लोंढे, सुजित उबाळे, शहाजी मंडले, ठाकर, काझी नवले, हेडकॉन्स्टेबल रंगे, महिला पोलिस राऊत, पोलिस हवालदार लोंढे भांडवड यांच्या पथकाने केली.

## बी. टी. जोशी यांनी समाजात माणुसकीची प्रतिमा निर्माण केली : औटी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १९ जुलै-**



स्वातंत्र्यसैनिकांच्या संस्कारातून घडलेले बी. टी. (भालचंद्र) जोशी यांनी प्रामाणिकपणा, पारदर्शकता आणि माणुसकीच्या बळावर समाजासमोर आदर्श निर्माण केला, असे गौरवोद्गार कवी देवेंद्र औटी यांनी काढले.

.बी. टी. जोशी यांच्या अमृतमहोत्सवानिमित्त आयोजित सत्कार सोहळ्यात ते बोलत होते. यावेळी डॉ. विलास जहागीरदार, डी. टी. जोशी, ज्येष्ठ विचारवंत रविंद्र नायडू, शरद अकतनाळ यांच्यासह पुणे व सोलापूर येथील मित्रपरिवार मोठ्या संख्येने उपस्थित होता. औटी म्हणाले, सिव्हिल हॉस्पिटलमधील सेवाकाळात बी. टी. जोशी यांनी नियमबद्ध, पारदर्शक आणि नैतिक मूल्यांवर आधारित कार्यपद्धतीचा आदर्श घालून दिला. आजच्या मूल्यहीन वातावरणात त्यांचे कार्य नव्या पिढीसाठी प्रेरणादायी आहे.यावेळी बी. टी. जोशी यांची ग्रंथतुला करण्यात आली. श्रीपाद व वल्लभ जोशी यांनी उपस्थितांचे स्वागत, तर डी. टी. जोशी यांनी आभार मानले.

## श्री गजानन महाराज दिंडीचे बीएसएनएल परिवारातर्फे स्वागत



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १९ जुलै-**

आषाढी वारीनिमित्त श्री गजानन महाराजांच्या पवित्र दिंडीचे बीएसएनएल, सोलापूर परिवारातर्फे स्वागत करण्यात आले. यावेळी दिंडीवर पुष्पवृष्टी करून वारकरी बंधू-भगिनींचा सन्मान करण्यात आला.

बीएसएनएल, सोलापूरचे महाव्यवस्थापक श्रीकांत माब्रुखाणे यांच्या हस्ते दिंडीचे स्वागत करण्यात आले. याप्रसंगी उपमहाप्रबंधक श्रीमती अनिता पाटील, वित्त विभागाचे संतोष जेटगी, अतनूर, मंडल अभियंता प्रशांत कवडे, युनियनचे अधिकारी ए. जे. शेख, खोबरे, सुजित हावळे, राजू राठोड तसेच बीएसएनएल मार्केटिंग फ्रँचायझी विशाल लंगडे यांनी स्वागत समारंभात सहभाग घेतला. यावेळी बीएसएनएलच्या वार्षिक कृषी प्लॅन (१५५१) च्या आकर्षक फलकाने शेतकरी व वारकरी बंधूंचे लक्ष वेधले. बीएसएनएल, सोलापूर परिवारातर्फे सर्व वारकरी बंधू-भगिनींना पिण्याच्या पाण्याच्या बाटल्या, बिस्किट पॅकेट व छत्रीचे मोफत वाटप करण्यात आले. उपक्रम यशस्वी करण्यासाठी बीएसएनएलचे मार्केटिंग विभाग प्रमुख प्रवीण कवडे, कार्यालय अधीक्षक सुजित हावळे व त्यांच्या सहकाऱ्यांनी परिश्रम घेतले.




## अक्कलकोट लायन्स क्लबच्या अध्यक्षपदी खोबरे

### नव्या पदाधिकाऱ्यांचा पदग्रहण सोहळा उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. १९ जुलै-**

अक्कलकोट लायन्स क्लबच्या २०२६-२७ वर्षासाठीच्या नूतन पदाधिकाऱ्यांचा पदग्रहण सोहळा अजिंक्यतारा येथे पार पडला.

यावेळी दुसऱ्यांदा अध्यक्षपदाची धुरा स्वीकारणारे अभय खोबरे यांच्यावर विश्वास व्यक्त करताना आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी, 'देशावर नैसर्गिक आपत्ती, भूकंप, पूर किंवा कोविडसारखे संकट आले की लायन्ससारख्या संस्था मदतीला धावून येतात. अशा नामांकित संस्थेला साजेसे कार्य अभय खोबरे यांच्या नेतृत्वाखाली होत असून त्यांच्या अनुभवाचा लाभ क्लबच्या प्रगतीस निश्चितच होईल,' असे गौरवोद्गार काढले.

कार्यक्रमास श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जनमेजयराजे भोसले, सचिव शामराव मोरे, नगराध्यक्षा मिलन कल्याणशेट्टी, माजी उपनगराध्यक्ष दिलीप सिद्धे, लायन्स इंटरनॅशनलचे माजी प्रांतपाल राजशेखर कापसे, उपप्रांतपाल मंगेश दोशी, रिजन चेअरमन महेश नळे, झोन चेअरमन स्वामीनाथ कलशेट्टी, नूतन सचिव शिरीष पंडीत, भाऊ कापसे आदी मान्यवर उपस्थित होते. उपप्रांतपाल मंगेश दोशी यांनी नूतन पदाधिकाऱ्यांना पदाची शपथ दिली.

यावेळी माजी उपनगराध्यक्ष दिलीप सिद्धे यांनी लायन्स शाळेने अनेक गुणवंत विद्यार्थी घडवून समाजाला दिल्याचे सांगितले. कार्यक्रमात नूतन अध्यक्ष अभय खोबरे, माजी नगराध्यक्षा अनिता खोबरे यांच्यासह मान्यवर आणि पत्रकारांचा सत्कार करण्यात आला.

नवीन कार्यकारिणीत शिरीष पंडीत (सचिव), शिवशरण खुबा (सहसचिव), विठ्ठल तेली (खजिनदार), संतोष जिरोळे, चेतन जाधव (प्रथम उपाध्यक्ष) तसेच जनमेजयराजे भोसले, कमल आळ्ळोळी, सुभाष गडसिंग, शिवपुत्र हळगोदे, राजेंद्र हत्ते, शदीद वळसंगकर, सिद्धय्या मठ, मल्लीनाथ साखरे, सुनील बिराजदार आदींची विविध पदांवर निवड करण्यात आली. सूत्रसंचालन सुभाष गडसिंग यांनी केले. स्वागत नूतन अध्यक्ष अभय खोबरे यांनी, तर वार्षिक अहवालाचे वाचन सचिव शिरीष पंडीत यांनी केले.

## 'निष्पत्ती आधारित शिक्षण' विषयावर कार्यशाळा

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. १९ जुलै-**



रयत शिक्षण संस्थेच्या, अधिकारप्रदत्त स्वायत्त कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय, पंढरपूर येथे नुकतेच अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाच्या (आयक्यूएसी) वतीने 'निष्पत्ती आधारित शिक्षण' (आउटकम बेस्ड एज्युकेशन) या विषयावरील दोन दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बी. टी. जाधव यांच्या अध्यक्षतेखाली कार्यशाळेचे उद्घाटन संपन्न झाले.

कार्यशाळेस प्रमुख पाहुणे म्हणून प्रा. डॉ. बी. एस. बलवंत उपस्थित होते. प्रारंभी डॉ. नेहा देसाई यांनी प्रास्ताविक करून कार्यशाळेच्या उद्देश व स्वरूपाविषयी माहिती दिली.

कार्यशाळेच्या पहिल्या दिवशी एकूण तीन सत्रांचे आयोजन करण्यात आले. पहिल्या सत्रात डॉ. नेहा देसाई यांनी 'अभ्यासक्रम निष्पत्ती (सीओ), कार्यक्रम निष्पत्ती (पीओ) आणि कार्यक्रम विशिष्ट निष्पत्ती (पीएसओ) यांसाठी आराखडा विधान' या विषयावर मार्गदर्शन केले. द्वितीय सत्रात आयक्यूएसी समन्वयक डॉ. अमर कांबळे यांनी 'अभ्यासक्रम निष्पत्ती, कार्यक्रम निष्पत्ती आणि कार्यक्रम विशिष्ट निष्पत्ती यांचे परस्परसंबंध निर्धारण (मॅपिंग)' या विषयाचे सविस्तर विवेचन केले. तर तृतीय सत्रात प्रा. डॉ. आनंद शिंदे यांनी 'निष्पत्ती प्राप्ती पातळीचे गणन' (कॅल्क्युलेशन ऑफ लेव्हल ऑफ अटेन्मेंट) या विषयावर सखोल मार्गदर्शन केले. कार्यशाळेच्या दुसऱ्या दिवशी प्राचार्य डॉ. बी. टी. जाधव यांनी 'निष्पत्ती आधारित शिक्षण : परिचय आणि महत्त्व' या विषयावर मार्गदर्शनपर व्याख्यान दिले. त्यानंतर सर्व विभागप्रमुखांनी आपल्या विभागातील अभ्यासक्रम निष्पत्ती व कार्यक्रम निष्पत्ती यांचे सादरीकरण केले. या सादरीकरणावर तज्ज्ञांकडून आवश्यक सूचना व मार्गदर्शन करण्यात आले. कार्यशाळेस महाविद्यालयातील सुमारे १०० हून अधिक प्राध्यापकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. समारोप प्रसंगी सर्व सहभागी प्राध्यापकांना प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले. या कार्यशाळेच्या समन्वयक म्हणून डॉ. नेहा देसाई यांनी प्रभावीपणे काम पाहिले.

## मुख्यमंत्री बळीराजा शेत/पाणंद रस्ते योजनेच्या सहअध्यक्षपदी रणवीर राऊत

**तसा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १९ जुलै-**



राज्यातील शेतकऱ्यांसाठी जिव्हाळ्याच्या असलेल्या मुख्यमंत्री बळीराजा शेत/पाणंद रस्ते योजने'च्या प्रभावी अंमलबजावणीसाठी महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी मोठा निर्णय घेतला आहे. या योजनेच्या कामात अधिक सुसूत्रता आणण्यासाठी विधानसभा क्षेत्र स्तरीय समित्यांमध्ये सहअध्यक्ष पदाची अधिकृत नेमणूक करण्यात आली असून, याबाबतचा शासन निर्णय जारी केला आहे. शासनाने जारी केलेल्या पत्रात मुख्यमंत्री बळीराजा शेत/पाणंद रस्ते योजनेच्या बार्शी विधानसभा क्षेत्राच्या सहअध्यक्षपदी रणवीर राऊत यांची निवड केली आहे.

राज्यातील शेत व पाणंद रस्त्यांची कामे सुलभ पद्धतीने आणि जलद गतीने व्हावीत यासाठी १४ डिसेंबर २०२५ रोजी या योजनेची सुरुवात करण्यात आली होती. या योजनेच्या अंमलबजावणीसाठी गठित करण्यात आलेल्या विधानसभा क्षेत्रस्तरीय समितीच्या कामकाजात मदतीसाठी एका 'सहअध्यक्षा'ची निवड करण्याचे अधिकार महसूल मंत्री यांना देण्यात आले होते. त्यानुसार शासनाच्या विचाराधीन असलेल्या बाबीवर शिक्कामोर्तब करण्यात आले असून विधानसभा मतदारसंघांमधील लोकप्रतिनिधी व मान्यवरांची सहअध्यक्ष म्हणून घोषणा करण्यात आली आहे.

# पंढरपूर अर्बन बँक उद्योजक घडविण्यात आघाडीवर

### बँकेस वैधानिक लेखापरीक्षणात 'अ' वर्ग; सभासदांना 10 टक्के लाभांश जाहीर

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. १९ जुलै-**

दि पंढरपूर अर्बन को-ऑप. बँक लि., पंढरपूरला सन २०२५-२६ या आर्थिक वर्षातील वैधानिक लेखापरीक्षणात 'अ' वर्ग प्राप्त झाला असून, बँकेने रु. ४३.१८ कोटींचा ढोबळ नफा व रु. १७.६१ कोटींचा निव्वळ नफा मिळविला आहे. तसेच सभासदांसाठी १० टक्के लाभांश जाहीर करण्यात आल्याची माहिती बँकेचे चेअरमन सतीश मुळे यांनी दिली. बदलत्या बँकिंग व्यवस्थेनुसार ग्राहकांच्या सोयीसाठी चालू आर्थिक वर्षात मोबाईल बँकिंग, यूपीआय यांसारख्या आधुनिक डिजिटल सेवा सुरू करण्यात येणार असल्याचेही त्यांनी जाहीर केले.

दि. पंढरपूर अर्बन को-ऑप.बँक लि., पंढरपूरची ११४ वी वार्षिक सर्वसाधारण सभा बँकेच्या कर्मयोगी सभागृह, नवीपेठ शाखा, पंढरपूर येथे पार पडली. सभेची सुरुवात स्व. सुधाकरपंत परिचारक यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. मागील वर्षात दिवंगत झालेल्या सभासदांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.




यावेळी बँकेचे कुटुंबप्रमुख तथा माजी आमदार प्रशांत परिचारक, विविध संस्थांचे पदाधिकारी, मान्यवर तसेच मोठ्या संख्येने सभासद उपस्थित होते. सभासदांचे प्रशिक्षण सत्रही यावेळी आयोजित करण्यात आले. प्रास्ताविक चेअरमन सतीश मुळे यांनी केले. बँकेचे कुटुंबप्रमुख माजी आमदार प्रशांत परिचारक यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, कोरोना काळातील प्रतिकूल परिस्थितीनंतर नवनियुक्त संचालक मंडळाने सक्षम नेतृत्व करत बँकेची आर्थिक स्थिती भक्कम केली. आज सभासदांना १० टक्के लाभांश जाहीर करण्याइतकी बँकेने प्रगती साधली असून, आगामी काळातही बँकेने अशीच उत्तरोत्तर भरारी घ्यावी, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. मुख्य कार्यकारी अधिकारी उमेश विरधे यांनी वार्षिक अहवालाचे वाचन केले. सभासदांनी उपस्थित केलेल्या विविध प्रश्नांना त्यांनी समर्पक उत्तरे दिली.

### बँकेमार्फत सुरु केलेल्या नव्या योजनांची माहिती

सभेदरम्यान पंतप्रधान रोजगार निर्मिती कार्यक्रम (PMEGP) अंतर्गत १५ ते ३५ टक्के अनुदान असलेल्या कर्ज योजना तसेच ग्रामीण भागातील महिला वर्गासाठी प्रतिभा दुग्ध संपादन कर्ज योजना तसेच सर्व ठेवीदारांसाठी १५ महिन्यांच्या मुदतीची ८ टक्के व्याजदराची 'सुधन ठेव योजना' कार्यान्वित करण्यात आल्याची माहिती देण्यात आली. या योजनांमधील लाभार्थ्यांचा विशेष सत्कारही करण्यात आला. सोलापूर जिल्ह्याची अर्थवाहिनी म्हणून ओळखल्या जाणारी बँक उद्योजक घडविण्यात आघाडीवर आहे.

# रशियाच्या हल्ल्याने युक्रेनची दाणादाण

**शेकडो क्षेपणास्त्र-ड्रोनचा मारा, कीव्ह शहरात विध्वंस, १२ ठार, ४८ जखमी**



रशियाच्या हल्ल्यात युक्रेनमधील अनेक इमारतींचे नुकसान झाले असून, सुरक्षा पथकाने बचावकार्य सुरू केले

**कीव्ह, १९ जुलै**

रशियाच्या वायुदलाने युक्रेनची राजधानी कीव्ह शहरासह अनेक भागातील पायाभूत सुविधांना लक्ष्य करत रविवारी पहाटे जोरदार हल्ले चढवले. काही तासातच ४०० ड्रोन आणि दीडशेपेक्षा अधिक क्षेपणास्त्रांचा मारा केला, यात १२ नागरिक ठार झाले, तर ४८ जखमी आहे.

रशियाच्या हल्ल्यात युक्रेनची राजधानी कीव्ह शहराचे मोठे नुकसान झाले. लष्करी तळ, वीज प्रकल्प आणि रेल्वेच्या पायाभूत सुविधांवर क्षेपणास्त्र आणि ड्रोनचा मारा करण्यात आल्याची पुष्टी युक्रेनच्या संरक्षण विभागाने निवेदनातून केली आहे.

अनेक निवासी इमारती उद्ध्वस्त झाल्या असून, ढिगाऱ्यातून १२ नागरिकांचे मृतदेह बाहेर काढले आणि अजूनही बचावकार्य सुरू आहे. राष्ट्राध्यक्ष वोलोदिमिर झेलेन्स्की यांनी या हल्ल्याचे वर्णन आतापर्यंतच्या सर्वात मोठ्या हल्ल्यांपैकी एक केले आहे. युरोपियन देशांकडून अतिरिक्त हवाई संरक्षण मदतीची मागणी त्यांनी पुन्हा एकदा अधोरेखित केली. रविवारी सुमारे पाच तास केलेल्या हल्ल्यामुळे शहराच्या अनेक भागांमध्ये आग लागली आणि इमारतींचे मोठे नुकसान झाले. रशियाने राजधानी कीव्हवर विविध प्रकारची सुमारे ४० क्षेपणास्त्रे आणि १२० ड्रोन हल्ले केले. ◂ (वृत्तसंस्था)

## तेल प्रकल्पावरील हल्ल्याचा सूड

युक्रेनने दोन दिवसांपूर्वी रशियाची तेल शुद्धीकरण प्रकल्प, काळ्या समुद्रातील जहाजे आणि बंदरांना लक्ष्य करत ड्रोनचा मारा केला होता. यात रशियाचे मोठे नुकसान झाले. हल्ल्याचा सूड घेण्यासाठी रशियाने कीव्ह शहरावर ४० इस्कंदर-एम आणि हायपरसॉनिक झिरकॉन क्षेपणास्त्रे डागली. काही मिनिटांतच, एकापाठोपाठ एक स्फोट झाले. शेवचेन्किव्हस्की जिल्ह्यातील अनेक इमारतीला भीषण आग लागली. बचाव पथकाने ढिगाऱ्याखाली अडकलेल्या लोकांना बाहेर काढले. ■

## रेल्वे, मेट्रो सेवा स्थगित

सुरक्षेच्या कारणास्तव युक्रेन प्रशासनाने रेल्वे आणि मेट्रो सेवा स्थगित केली आहे आणि नागरिकांना सुरक्षित स्थळी जाण्याचे आवाहन केले. कीव्हचे महापौर विटाली क्लिचको यांनी सांगितले की, रशियाच्या हल्ल्याने शहरातील अनेक भागातील पायाभूत सुविधा नष्ट झाल्या आहे. बहुतांश भागाचा वीजपुरवठा खंडित झाल्याने नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. दुसरीकडे झेलेन्स्की यांनी अमेरिकेकडे पॅट्रियट इंटरसेप्टर क्षेपणास्त्रांचा अतिरिक्त पुरवठा करण्याची मागणी केली आहे. ■

## भाजप आमदार जेनिफर मोन्सेरात यांचे निधन

**पणजी, १९ जुलै**

गोव्याच्या राजकारणातील एक प्रभावी आणि सक्रिय महिला चेहरा, ताळगाव मतदारसंघाच्या भाजप आमदार तसेच माजी महसूल मंत्री जेनिफर मोन्सेरात यांचे रविवारी (१९ जुलै २०२६) कर्करोगाने निधन झाले. त्या ५६ वर्षांच्या होत्या. गेल्या काही महिन्यांपासून गोव्यातील एका खाजगी रुग्णालयात त्यांच्यावर उपचार सुरू होते, मात्र उपचारादरम्यान त्यांची प्राणज्योत मालवली. त्यांच्या निधनामुळे गोव्याच्या राजकीय आणि सामाजिक क्षेत्रात मोठी शोककळा पसरली आहे. त्यांनी २००५ मध्ये सक्रिय राजकारणात पाऊल ठेवले. ◂ (वृत्तसंस्था)



केन-बेतवा नदी जोड प्रकल्पाला विरोध करण्यासाठी छतरपूर जिल्ह्यातील नागरिक गेल्या पंधरा दिवसांपासून नदीच्या काठावर आंदोलन करीत होते. नदीला पूर आल्याने खबरदारीचा उपाय म्हणून रविवारी पोलिसांच्या मदतीने आंदोलकांना हलविण्यात आले

# भारताशी हवेत दृढ व्यापारी संबंध

**व्यवसायासाठी सुलभ प्रवेशाचा अफगाणिस्तान सरकारचा आग्रह**

**काबुल, १९ जुलै**

अफगाणिस्तानच्या प्रमुख व्यापार संघटनेने भारतासोबतचे व्यापार आणि गुंतवणुकीचे संबंध वाढवण्याचे आवाहन केले आहे. तसेच त्यांनी व्यावसायिक प्रक्रिया सुलभ करणे, प्रशासकीय अडथळे दूर करणे आणि व्यावसायिक व्हिसा मिळवण्याची प्रक्रिया सुलभ करणे या गोष्टींच्या गरजेवर भर दिला.

अफगाणिस्तान चेंबर ऑफ कॉमर्स ॲण्ड इन्व्हेस्टमेंटचे अध्यक्ष सय्यद करीम हाशेमी आणि अफगाणिस्तानातील भारताचे राजदूत यतिन पटेल यांच्यात काबुल येथे झालेल्या बैठकीत या प्रस्तावांवर चर्चा करण्यात आली. दोन्ही बाजूंनी धोरणात्मक आणि राजनैतिक संवादाच्या चौकटीत चर्चा केली, असे व्यापारी संघटनेने शनिवारी जारी केलेल्या निवेदनात म्हटले आहे.

ही बैठक अशा वेळी होत आहे, जेव्हा अफगाणिस्तानचा शेजारील पाकिस्तानसोबतचा पारगमन व्यापार मोठ्या प्रमाणात घटला आहे. आर्थिक वर्ष २०२१ मधील जवळपास पाच अब्ज अमेरिकी डॉलर्सवरून हा व्यापार आर्थिक वर्ष २०२६ मध्ये ३६७ दशलक्ष अमेरिकी डॉलर्सवर आला आहे. कारण, अफगाणिस्तानने इराणमार्गे जाणाऱ्या मार्गांसह पर्यायी व्यापार मार्गांचा वापर वाढवला आहे. भारत इराणच्या चाबहार बंदराद्वारे अफगाणिस्तानशी संपर्क व्यवस्था बळकट करत आहे. या बंदरामुळे पाकिस्तानला वळसा घालून त्या जमिनीने वेढलेल्या देशापर्यंत पोहोचणे शक्य होते. कारण, पाकिस्तान भारतीय मालाची अफगाणिस्तानकडे होणारी जमिनीवरून वाहतूक होऊ देत नाही.

पाकिस्तानसोबत तणाव निर्माण झाल्याने तोरखाम आणि बोलन सीमा रेषेवरून सुरू असलेला व्यापार पूर्णपणे ठप्प पडला आहे. याचे परिणाम दोन्ही देशांतील व्यापाऱ्यांना भोगावे लागत आहे. इराण युद्धामुळे चाबहार बंदरातून भारताशी होत असलेला व्यापारही थंडावल्याने काबूलवरून होणारा मालाचा पुरवठाही थांबला आहे. ◂ (वृत्तसंस्था)

### भारत-अफगाणिस्तानमधील व्यापार ९०७ दशलक्ष डॉलर्सचा

२०२५-२६ मध्ये भारत-अफगाणिस्तान यांच्यातील द्विपक्षीय व्यापार ९०७.८५ दशलक्ष अमेरिकी डॉलर्स इतका होता. भारतानेह काबुलसोबत संपर्क वाढवला असून, अफगाणिस्तानचे कृषी मंत्री मौलवी अताउल्ला ओमारी हाशेमी यांनी या महिन्याच्या सुरुवातीला नवी दिल्लीला भेट दिली. ■

### कृषी निर्यात, खाणकामावर भर

कृषी निर्यात, हस्तकला, खाणकाम आणि खनिज संसाधने या क्षेत्रांतील आर्थिक सहकार्य टिकवून ठेवण्याच्या आणि ते अधिक दृढ करण्याच्या गरजेवर हाशेमी यांनी भर दिला. अफगाणिस्तानची निर्यात वाढवण्याच्या उद्देशाने त्यांनी धोरणात्मक प्रस्ताव मांडले. यामध्ये लक्ष्यित बाजारपेठांमध्ये पोहोच वाढवणे, लॉजिस्टिक्सच्या पायाभूत सुविधांमध्ये सुधारणा करणे आणि व्यावसायिक व्हिसा मिळवण्याची प्रक्रिया सुलभ करण्याचा समावेश होता. ■

## गियानामध्ये नौका उलटली, ६३ बेपत्ता

**माद्रिद, १९ जुलै**

दक्षिण अमेरिकेतील गियाना या देशात ११६ प्रवासी आणि कर्मचाऱ्यांना घेऊन जाणारी एक नौका उलटली. यातील ५३ जणांना वाचवण्यात यश आले, तर ८३ जण अजूनही बेपत्ता आहे. कर्मचाऱ्यांच्या शोधासाठी बचाव पथकाने व्यापक मोहीम सुरू केली आहे. एमव्ही बारिमा ही नौका राजधानी जॉर्जटाऊनहून उत्तर अटलांटिक किनाऱ्यावरील पोर्ट कैटुमाकडे जात होती. गियानाचे पंतप्रधान मार्क फिलिप्स यांनी सांगितले की, पोमेरोन नदीजवळ हा अपघात झाला. स्थानिक वेळेनुसार रात्री ११:०१ वाजता मदतीसाठीचा संदेश मिळाला. सरकारी आणि खाजगी नौकांच्या मदतीने तत्काळ शोध आणि बचाव मोहीम सुरू करण्यात आली. या अपघातात कोणाचा मृत्यू झाला आहे की नाही हे अस्पष्ट आहे. पंतप्रधान फिलिप्स संपूर्ण बचाव आणि मदत कार्यावर लक्ष ठेवून आहेत. ◂ (वृत्तसंस्था)

## चित्रपट वार्ता

### ‘रामायण’साठी साई पल्लवींची विशेष तयारी



**नवी दिल्ली :** येथे शनिवारी ‘प्रथम संकल्प’ या विशेष कार्यक्रमाने ‘रामायणः पार्ट-१’च्या प्रचार मोहिमेला सुरुवात झाली. या कार्यक्रमाला चित्रपटातील कलाकार आणि तंत्रज्ञांसह सिनेमा तसेच आध्यात्मिक क्षेत्रातील अनेक नामवंत व्यक्तींनी उपस्थिती लावली. यावेळी अभिनेता यशने बॉलिवूड अभिनेता रणबीर कपूरचे भरभरून कौतुक केले. त्याचबरोबर दिग्दर्शक नितेश तिवारी यांनीही चित्रपटातील सीतेची भूमिका साकारणाऱ्या साई पल्लवीचे विशेष कौतुक केले. सीतेची भूमिका साकारताना स्वतःला शक्य तितके शुद्ध ठेवण्याचा प्रयत्न केल्याचेही साई पल्लवीने सांगितले. ■

### दीपिका कक्कडची चिंता वाढली



**मुंबई :** टीव्ही अभिनेत्री दीपिका कक्कड यांनी त्यांच्या ताज्या व्लॉगमधून आईच्या प्रकृतीबाबत माहिती दिली आहे. सतत होत असलेल्या असह्य पोटदुखीमुळे त्यांच्या आईला रुग्णालयात दाखल करावे लागल्याचे त्यांनी सांगितले. मात्र, चाहत्यांनी काळजी करू नये, असेही दीपिका यांनी दिली असून सध्या त्यांच्या आईच्या त्रासाचे नेमके कारण शोधण्यासाठी विविध वैद्यकीय तपासण्या सुरू असल्याचे त्यांनी स्पष्ट केले आहे. दरम्यान, दीपिका कक्कड यांच्या कुटुंबासाठी हे वर्ष अनेक चढ-उतारांचे ठरले आहे. यापूर्वी त्यांच्या सासऱ्यांनाही रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. त्यामुळे कुटुंबीयांसाठी हा काळ भावनिक आणि आव्हानात्मक ठरत आहे. ■

### ...हा सन्मान आयुष्यभर लक्षात राहील

**मुंबई :** अभिनेत्री यामी गौतम पुन्हा एकदा चर्चेत आली आहे.



आपल्या दमदार अभिनयाच्या जोरावर सातत्याने प्रेक्षक आणि समीक्षकांचे लक्ष वेधून घेणाऱ्या यामीने आता ७२ व्या राष्ट्रीय चित्रपट पुरस्कारांमध्येही मोठी कामगिरी केली आहे. यामी गौतम अभिनित ‘आर्टिकल ३७०’ या चित्रपटाने विशेष छाप पाडली. या चित्रपटाला सर्वोत्कृष्ट फीचर फिल्मचा राष्ट्रीय पुरस्कार मिळाला, तर चित्रपटातील प्रभावी अभिनयासाठी यामी गौतमला सर्वोत्कृष्ट अभिनेत्रीचा राष्ट्रीय पुरस्कार जाहीर करण्यात आला. या मोठ्या यशानंतर यामीने सोशल मीडियावर एक भावनिक पोस्ट शेअर करत आनंद व्यक्त केला आहे. हा सन्मान केवळ चित्रपटांच्या यादीत आणखी एक पुरस्कार जोडला जाण्याइतपत मर्यादित नाही. अनेक वर्षांच्या मेहनतीचे आणि प्रतीक्षेचे हे फळ आहे, असे यामी गौतमने म्हटले आहे. ■

# तलवार आमची अन् गळा तुमचा असेल

**कट्टरपंथी गटाचा पेझेश्कियन यांना इशारा**



खामेनेई यांच्या शोकसभेत एकत्र जमलेले कट्टरपंथी

**तेहरान, १९ जुलै**

सर्वोच्च नेते अयातुल्ला खामेनेई यांच्या निधनानंतर इराणमध्ये गटबाजीला उत आला असून कट्टरपंथी गटांनी सत्ताधाऱ्यांवर अविश्वास व्यक्त केला आहे. अमेरिकेसोबत केलेल्या करारानंतर सत्ताधारी कट्टरपंथींच्या लक्ष्यावर आहेत. राष्ट्रपती मसूद पझेश्कियान यांनी दगाफटका केल्यास आमची तलवार आणि त्यांचा गळा असेल असा इशारा दिला आहे. त्यांनी अमेरिकेसोबत वाटाघाटी करण्यास विरोध केला असून, खामेनेई यांच्या मृत्यूचा बदला घेण्याची मागणी सत्ताधाऱ्यांकडे केली. कट्टरपंथीयांचा विरोध पाहता पेझिश्कियान यांनी अमेरिकेसोबतचा करार संपुष्टात आल्याची घोषणा केली आहे.

इराणध्ये सध्या सत्ताधारी नेत्यांवर देशाशी विश्वासघात करून अमेरिकेसोबत तडजोड केल्याचा आरोप होत आहेत. कट्टरपंथी गट राष्ट्राध्यक्ष मसूद पेझेश्कियन आणि अमेरिकेशी शांततेसाठी वाटाघाटी केल्याचा आरोप असलेल्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या विरोधात आहेत. खामेनेई यांच्या अंत्यसंस्कारापासून सत्ताधाऱ्यांविरोधातील नाराजीने जोर पकडला आहे. अंत्यसंस्कारावेळी परराष्ट्र मंत्री अब्बास अराघची यांच्यावर दगडफेक करण्यात आली आणि देश विकणारा गद्दार, अशा घोषणा देण्यात आल्या. सत्तापालटचा कट रचणे आणि शरणागती पत्करल्याचेही आरोप त्यांच्यावर करण्यात आले. तेव्हापासून सत्ताधाऱ्यांविरोधात सातत्याने निदर्शने सुरू आहे.

**मोज्तबा खामेनेईचा ठावठिकाणा नाही**

नवीन सर्वोच्च नेते, मोज्तबा खामेनेई सार्वजनिकरित्या दिसलेले नाहीत, ही वस्तुस्थिती राजकीय संकटाला आणखी गंभीर बनवत आहे. वडिलाच्या अन्त्यसंस्कारातही त्यांची उपस्थिती नसल्याने त्यांच्यासंदर्भात संभ्रम वाढला आहे. कट्टरपंथी गटांचा आरोप आहे की, पेझेश्कियान, संसद अध्यक्ष मोहम्मद बागेर गालिबाफ आणि अराघची हे मोज्तबांच्या निर्देशांचे पूर्णपणे पालन न करता मोठे निर्णय घेत आहेत.

**बंडाचा कट रचल्याचा आरोप**

गालिबाफ आणि त्यांचे सहकारी देशावर नियंत्रण मिळवण्याच्या प्रयत्नात असल्याने कट्टरपंथी गालिबाफ आणि पेझेश्कियान यांच्यावर मोज्तबा यांच्याविरुद्ध बंडाचा कट रचल्याचा आरोप करत आहेत. ◂ (वृत्तसंस्था)

# दहशतवाद्यांना घरात घुसून मारणार

**राजनाथसिंह यांचा इशारा**

**नवी दिल्ली, १९ जुलै**

दहशतवादाविरुद्धचे भारताचे शून्य सहनशीलता (झीरो टॉलरन्स) धोरण घोषणा नव्हे, तर कार्यशैली आहे. आम्ही दहशतवाद्यांना त्यांच्या घरात घुसून मारू. ‘ऑपरेशन सिंदूर’दरम्यान जगाने भारताचे हे बदललेले रूप पाहिले आहे, अशा शब्दांत संरक्षण मंत्री राजनाथसिंह यांनी दहशतवाद व त्याला खतपाणी घालणाऱ्या देशांना इशारा दिला. दहशतवाद्यांना पाठिंबा देणाऱ्यांना किंमत चुकवावी लागेल असेही त्यांनी नमूद केले.



राजधानी दिल्लीत ‘रिपब्लिक फोर्सेस फर्स्ट कॉन्क्लेव्ह २०२६ : भारत-द डिफेन्स पॉवरहाऊस’ कार्यक्रमात बोलताना राजनाथसिंह म्हणाले, भारत सीमेपलीकडून होणाऱ्या दहशतवादी हल्ल्यांना निर्णायक व प्रभावीपणे चोख उत्तर देण्यास पूर्णपणे सक्षम आहे, हे ऑपरेशन सिंदूरने हे स्पष्ट केले. ऑपरेशन सिंदूर हे तंत्रज्ञानावर आधारित आधुनिक युद्धाचे उत्कृष्ट उदाहरण होते.

भारताकडे वाकड्या नजरेने पाहणाऱ्यांना अद्दल घडवण्यास भारत सक्षण आहे. दहशतवाद्यांना पाठिंबा देऊन भारतात हल्ले करण्याची योजना आखणाऱ्यांना यापुढे मोठी किंमत चुकवावी लागेल. ◂ (वृत्तसंस्था)

## बद्रीनाथमधील देणगीची करणार पडताळणी


**चमोली, १९ जुलै**

बद्रीनाथ धाममधील देणगी गैरव्यवहार प्रकरणाच्या तपासाची व्याप्ती वाढवली असून भगवान बद्रीनाथांच्या कुबेर खजिन्यात तीन वर्षांत जमा झालेल्या देणगीचा हिशेब सादर करण्याच्या सूचना बद्रीनाथ-केदारनाथ मंदिर समितीला (बीकेटीसी) दिल्या आहे. रोख रक्कम, तसेच भक्तांनी दान केलेले सोने, चांदी, हिरे, माणिक आणि इतर मौल्यवान दागिन्यांची माहिती देण्याचेही पोलिसांनी सांगितले.

मंदिर परिसरात लावलेल्या २६ दानपेट्यांमधून मिळालेली रोकड आणि मौल्यवान वस्तू मोजल्यानंतर, त्या वेगवेगळ्या तिजोऱ्यांमध्ये ठेवल्या जातात आणि त्यांची नोंद दप्तरात केली जाते. याला बद्रीनाथमध्ये कुबेराचा खजिना म्हटले जाते.

आता या दप्तराची बारकाईने तपासणी केली जाईल अशी माहिती पोलिस अधीक्षक सुरजीत सिंग पनवार यांनी माध्यमांना दिली. ◂ (वृत्तसंस्था)

# सहाव्या इंद्रियाचे गुपित उलगडले



**लंडन, १९ जुलै**

सहावे इंद्रिय सक्रिय असण्यासाठी आवश्यक घटक आणि मानवामध्येही ही अलौकिक शक्ती आहे का, याची उकल शास्त्रज्ञांनी केली आहे. सहावे इंद्रीय ही एक संवेदना असून मानवाच्या शरीराक नेमके काय घडते, याची माहिती संशोधनातून समोर आली. अभ्यासात सहावे इंद्रिय मानवातही सक्रिय असते आणि महिलांपेक्षा पुरुषांतही ते अधिक सक्रिय असल्याची माहिती उघड झाली आहे.

**मानवाकडेही अलौकिक शक्ती**

मानवाकडेही सहा इंद्रिय असतात का, हा प्रश्न अनेक वर्षांपासून चर्चेत आहे. मात्र शास्त्रज्ञांच्या नव्या संशोधनानुसार सहावे इंद्रिय म्हणजे कोणतीही गूढ किंवा अलौकिक शक्ती नसून, शरीरातील अंतर्गत बदल ओळखण्याची क्षमता म्हणजेच ‘इंटरोसेप्शन’ आहे. ही क्षमता मानसिक आरोग्य, भावना नियंत्रित करणे आणि तणावाच्या काळात अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावते, असे ऑक्सफोर्डच्या संशोधकांनी केल्या अभ्यासात समोर आले. प्राण्यांमध्ये भूकंप, ज्वालामुखीचा उद्रेक किंवा इतर नैसर्गिक संकटांची चाहूल आधीच लागते, अशा अनेक गोष्टी आपण ऐकतो. पक्षी, साप किंवा कुत्रे काही अदृश्य संकेत ओळखू शकतात, म्हणून त्यांच्यामध्ये सहावे इंद्रिय आहे, असे म्हटले जाते. प्रत्यक्षात मात्र त्यांच्याकडे अत्यंत विकसित जैविक संवेदन प्रणाली असते, जी पृथ्वीचे चुंबकीय क्षेत्र, ध्वनी किंवा विद्युत संकेत ओळखू शकते.

**संशोधनातून माहिती उघड**

**सर्व शास्त्रज्ञ सहमत नाहीत**

‘इंटरोसेप्शन’ ही संकल्पना सर्वांनीच स्वीकारलेली नाही. काही संशोधकांच्या मते, शरीरातील विविध संवेदन प्रक्रिया एकत्र करून ‘इंटरोसेप्शन’ हा व्यापक शब्द वापरला जातो. २०२४ मध्ये प्रसिद्ध झालेल्या एका लेखात, इंटरोसेप्शन अशी स्वतंत्र एकच संवेदना अस्तित्वात नाही, असा दावा करण्यात आला आहे. या संकल्पनेचे स्वरूप अधिक गुंतागुंतीचे असल्याचे त्यात नमूद करण्यात आले. भविष्यात चिंता, नैराश्य आणि इतर मानसिक विकारांवर अधिक प्रभावी उपचार विकसित करण्यासाठी या संशोधनाची महत्त्वाची भूमिका असू शकते. ◂ (वृत्तसंस्था)

### काय असते ‘सहावे इंद्रिय’ ?



मानवांमध्येही अशीच एक विशेष संवेदना असते, मात्र ती कोणतेही भविष्य सांगत नाही किंवा अलौकिक शक्तींशी संबंधित नाही. शास्त्रज्ञ तिला ‘इंटरोसेप्शन’ असे म्हणतात. ही संवेदना आपल्या शरीरात नेमके काय घडत आहे, याची माहिती मेंदूपर्यंत पोहोचवते. भूक लागल्याची जाणीव होणे, भाषणापूर्वी हृदयाचे ठोके वाढल्याचे जाणवणे, आजारी पडण्यापूर्वी शरीरात काहीतरी वेगळे जाणवणे किंवा तहान लागल्यावर पाणी पिण्याची इच्छा होणे, ही सर्व ‘इंटरोसेप्शन’ची उदाहरणे आहेत. ■

### मानसिक आरोग्याशी काय संबंध ?

संशोधकांच्या मते, ज्या व्यक्तींना आपल्या शरीरातील अंतर्गत संकेत अधिक अचूकपणे जाणवतात, त्या आपल्या भावनांवर अधिक प्रभावीपणे नियंत्रण ठेवू शकतात. उलट ही क्षमता कमी झाल्यास चिंता, नैराश्य, खाण्याचे विकार आणि पोस्ट-ट्रॉमॅटिक स्ट्रेस डिसऑर्डर यांसारख्या मानसिक समस्यांचा धोका वाढू शकतो. नवीन संशोधनानुसार, ही संवेदना केवळ शारीरिक गरजा ओळखत नाही, तर व्यक्तीचा आत्मविश्वास आणि तणावपूर्ण परिस्थितीत योग्य निर्णय घेण्याच्या क्षमतेवरही प्रभाव टाकते. ■

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## अग्रलेख

# कुरापती शेजारी !

घशाला कोरड पडत असल्याने आपले शेजारी बडे मियां पाकिस्तान आणि छोटे मियां बांगलादेश यांनी थयथयाट सुरू केला आहे. कारण आहे ते पाणी. जागतिक बँकेला भारत आणि पाकिस्तान यांच्यात सिंधू जलवाटप करार घडवून आणण्यासाठी तब्बल दहा वर्षे लागली होती. तो करार पहलगामच्या हल्ल्यानंतर मोदी सरकारने एका झटक्यात स्थगित केला. तोट्याचा असतानाही शेजारधर्म आणि माणुसकीच्या नात्याने भारताच्या तत्कालीन सरकारने हिमालयातून वाहत येणारे गोड आणि शुद्ध पाणी भविष्याचा फारसा विचार न करता पाकिस्तानच्या झोळीत टाकले होते. पाकिस्ताननंतर आता बांगलादेशनेही वळवळ सुरू केली आहे. तीस्ता नदीतील पाण्याबाबत भारताला विचारात न घेता बांगलादेशने चीनसोबत सामंजस्य करार केला आहे. हा करार अद्याप अधिकृत झाला नसल्याने त्यातील कलमे जाहीर करण्यात आली नाहीत. शेजारी देशांच्या प्रकरणात नाक खुपसण्याची सवय चीनला आहेच. या गोष्टीकडे भारत नैतिक-अनैतिकतेच्या चष्म्यातून पाहत असला तरी विश्वासघात करण्यात तरबेज असलेला चीन याकडे व्यावहारिक चष्म्यातून पाहतो. कसेही करून भारतावर दबाव आणण्याची चीनची रणनीती नेहमीच असते. पाकिस्तान, नेपाळ, म्यानमार, बांगलादेशसोबत रस्ते बांधून भारताला भूमार्गाने घेरण्याचा प्रयत्न केल्यानंतर तीस्ता प्रकल्पाबाबत सामंजस्य करार करून चीनने मोठे आव्हान उभे केले आहे हे खरेच. पूर्वोत्तर भारतासाठी तीस्ता नदीचे मोठे महत्त्व आहे. तसेच बांगलादेशच्या उत्तर भागातील लक्षावधी नागरिकांसाच्या दृष्टीनेही तीस्ता नदीचे पाणी म्हणजे जीवन-मरणाचा प्रश्न आहे. एकूण ४१४ किलोमीटर लांब असलेल्या या नदीचा उगम सिक्कीममधील तीस्ता खांगत्से हिमनदीच्या परिसरात पोहुनरी शिखराजवळ असल्याचे मानले जाते. बांगलादेशात ब्रह्मपुत्रेला (यमुना) मिळण्यापूर्वी तीस्ताची भारतातील लांबी ३०९ किलोमीटर आहे. आज आपल्या दोन्ही शेजारी देशांमध्ये पाण्याची जी भीषण समस्या निर्माण झाली, त्याला भारत जबाबदार नाही. भारतापासून वेगळ्या झालेल्या पाकिस्तानने गेल्या ७९ वर्षांमध्ये पाणी अडविण्यासाठी काहीच उपाययोजना केल्या नाहीत. भारत म्हणजे भित्रा, नेभळट देश असून तो आपले काहीच वाकडे करू शकणार नाहीत, अशा आविर्भावात पाकिस्तान वावरत होता. भारतातून वाहून जाणाऱ्या पाण्यापैकी केवळ ३० दिवस पुरेल एवढेच पाणी साठवून ठेवण्याची क्षमता पाकिस्तानकडे आहे. उर्वरित सर्व पाणी अरबी समुद्रात वाहून जाते. सिंधू जल करार स्थगित केल्याने आणि पाकिस्तानकडे जाणाऱ्या नद्यांमधील पाणी अडविण्यास प्रारंभ केल्याने डोळे पांढरे होण्याची वेळ या नाठाळ शेजाऱ्यावर आली आहे. पंजाब आणि जम्मू-काश्मीरमधील जनतेचा विचार न करता तत्कालीन सरकारने सिंधू जल करारावर स्वाक्षरी केली होती. हा करार म्हणजे राज्यातील जनतेसोबत केलेला विश्वासघात होय, असे उद्गार जम्मू-काश्मीरचे तत्कालीन मुख्यमंत्री फारुक अब्दुल्ला यांनी अनेकदा काढले. इतिहासात केलेल्या चुका कधीही दुरुस्त केल्या जाऊ शकतात. सिंधू जलवाटप करार स्थगित करून मोदी सरकारने देशहिताचा निर्णय घेतला. २०१९ मध्ये ३७० कलम निष्प्रभ केल्यानंतर भारतासोबतचे सर्व संबंध तोडून टाकण्याचा जो निर्णय पाकिस्तानचे तत्कालीन पंतप्रधान इम्रान खान यांनी घेतला, त्याचे परिणाम आता जनता भोगत आहे. इम्रान खान यांच्या पावलावर पाऊल ठेवत बांगलादेशचे पंतप्रधान तारिक रहमान यांनी तीस्ता नदीच्या मुद्यावर भारताला विचारात न घेता चीनसोबत सामंजस्य करार केला आहे. या नदीच्या पाण्यावरून दोन्ही देशांत चार दशकांपासून वाद सुरू आहेत. १९८३ मध्ये दोन्ही देशांमध्ये पाणीवाटपाबाबत तात्पुरती सहमती झाली. ३९ टक्के पाणी भारताने तर ३६ टक्के बांगलादेशच्या वाट्याला आले. गेल्या चार दशकांमध्ये नदीचे पात्र आणि प्रवाहात बदल झाला. बांगलादेशमध्ये प्रवेश केल्यानंतर अनेक ठिकाणी नदी गाळामुळे उथळ झाली तर कुठे पात्र अरुंद झाले. परिणामी पावसाळ्यात पुराचा सामना करावा लागतो. दरम्यानच्या काळात भारताने सिक्कीम आणि पश्चिम बंगालमध्ये वीजप्रकल्प आणि सिंचनासाठी बंधारे बांधले. शेतकऱ्यांना सिंचनासाठी पुरेसे पाणी उपलब्ध झाले. उन्हाळ्यात प्रवाह कमी होत असल्याने या काळात सिंचनासाठी नदीतील ५० टक्के पाणी देण्याची मागणी बांगलादेशने केली आहे. २०११ मध्ये काँग्रेसचे सरकार असताना दोन्ही देशांमध्ये करार जवळपास निश्चित झाला होता. ३७.५ टक्के पाणी बांगलादेशला तर ४२.५ टक्के भारताच्या वाट्याला येणार होते. हा करार उत्तर बंगालमधील शेतकऱ्यांच्या हिताला बाधा आणणारा असल्याचे सांगत तत्कालीन मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी कराराला विरोध केला. बंगालच्या उत्तर भागातील दार्जिलिंग, कलिम्पांग, जलपायगुडी, कुचबिहार, उत्तर दिनाजपूर आणि दक्षिण दिनाजपूर या जिल्ह्यांसाठी तीस्ता ही जीवनदायिनी आहे. शेती, उद्योग, पिण्याचे पाणी आणि जलविद्युत निर्मितीसाठी तीस्ता नदीच्या पाण्याचा उपयोग केला जातो. या नदीचे ८५ टक्के खोरे भारतात आहे. परिणामी, जास्तीत जास्त पाणी आम्हाला मिळावे, अशी रास्त मागणी सिक्कीम आणि बांगलादेशची आहे. हा केवळ पाण्याचा मुद्दा नव्हे; तर राजनैतिक, सुरक्षा आणि सामरिक दृष्टिकोनातूनही तीस्ता भारतासाठी अत्यंत महत्त्वाची आहे. आंतरराष्ट्रीय सीमेपासून अवघ्या १० ते १२ आणि सिलिगुडी कॉरिडॉरपासून २२ किलोमीटर अंतरावर तीस्ता सिंचन प्रकल्प उभारला जाणार आहे. प्रकल्प पूर्ण झाल्यास भारताच्या सीमेवरील जिल्ह्यांना बॅकवॉटरचा फटका बसण्याची शक्यता आहे. हा प्रकल्प सिलिगुडी कॉरिडॉरजवळ असल्याने सुरक्षेच्या दृष्टीने संवेदनशील आहे. या भागातील चीनची दीर्घकालीन उपस्थिती भारतासाठी डोकेदुखी वाढविणारी ठरू शकते. भारताने यावर सावध प्रतिक्रिया व्यक्त करताना शेजारी देशांत सुरू असलेल्या घडामोडींवर लक्ष ठेवून असल्याचे म्हटले आहे. मोहम्मद युनूस यांच्या कार्यकाळात भारत-बांगलादेश यांच्यातील संबंधात निर्माण झालेला तणाव तारिक रहमान यांच्या तीस्ता प्रकल्पाबाबत घेतलेल्या निर्णयाने आणखीनच वाढला आहे. पदभार स्वीकारल्यानंतर तारिक रहमान संबंध सुधारण्याचा एक भाग म्हणून भारताच्या दौऱ्यावर येतील, असे वाटत होते. पण, पाकिस्तानप्रमाणे बांगलादेशचेही चीनप्रेम उफाळून आल्याने भारताला सावध व्हावे लागणार आहे. रहमान भारताच्या दौऱ्यावर येणार नाहीत आणि याबाबत त्यांनी कधी वाच्यताही केली नाही, असे बांगलादेशच्या परराष्ट्र मंत्रालयाने स्पष्ट केले. तीस्ताबाबत आमचा चीनसोबत सामंजस्य करार झाला असून, आम्ही संरक्षण करारही करणार असल्याचे स्पष्ट केले. ढाकाने घेतलेली ताठर भूमिका पाहता भविष्यात दोन्ही देशांचे संबंध कोणत्या वळणावर जाणार आहेत, हे स्पष्ट होते. भारतासोबत थेट पंगा घेण्याची पाकिस्तान अथवा बांगलादेशची कुवत नसल्याने चीनच्या काखेत बसून कुरापती करण्याचे उद्योग त्यांनी सुरू केले आहेत. नरेंद्र मोदींच्या रूपात कणखर आणि देशाच्या सुरक्षेविषयी जागरूक असलेले नेतृत्व सत्तेवर असल्याने आपली डाळ शिजणार नाही, याची कल्पना रहमान सरकारला आहे. पण या करारात चीनचे आर्थिक आणि तांत्रिक सहकार्य घेऊन अप्रत्यक्षपणे भारतावर दबाव आणण्याचे बांगलादेशचे प्रयत्न सुरू आहेत. त्यामुळे भारताने भविष्यातील धोके ओळखून बांगलादेशसोबत संपर्क साधणे आवश्यक आहे. केवळ एकधर्मीय असल्याचा फायदा घेत पाकिस्तान आणि बांगलादेश हे शेजारी चीनची मदत घेऊन भारताला अडचणीत आणण्याचे प्रयत्न करीत आहेत. पण, सिंधू जल वाटप करार स्थगित करून पाकिस्तानला ज्याप्रमाणे वठणीवर आणले, त्याचप्रमाणे तारिक रहमान यांना त्यांची जागा दाखवून देणे आवश्यक झाले आहे. तशी पावले उचलली जातील हे नक्की; तोवर कुरापती शेजाऱ्यांवर डोळ्यात तेल घालून नजर ठेवावी लागेल. ■

## दिल्ली दिनांक

# संसदेचे पावसाळी अधिवेशन

**रवींद्र दाणी**

पंतप्रधान, मुख्यमंत्री, केंद्रीय मंत्री, राज्याराज्यांमधील मंत्री यांना एखाद्या प्रकरणात सलग ३० दिवस कारागृहात ठेवण्यात आल्यास ३१व्या दिवशी त्यांना पदमुक्त करणारे १३०वे घटनादुरुस्ती विधेयक संसदेच्या या पावसाळी अधिवेशनात पारित केले जाण्याची शक्यता आहे.

संसदेचे पावसाळी अधिवेशन आजपासून सुरू होत असून, ते १३ ऑगस्टपर्यंत चालेल. या घटनादुरुस्ती विधेयकावर विचार करण्यासाठी संसदेची संयुक्त समिती अगोदरच नियुक्त करण्यात आली असून, समिती कोणत्या व कशा शिफारशी करते यावर विधेयकाचे भवितव्य बऱ्याच प्रमाणात अवलंबून आहे. विधेयक पारित झाल्यास अशा प्रकारचे ते जगातील पहिले उदाहरण असेल.

**कारण केजरीवाल ? :** या विधेयकाच्या मुळाशी आप नेते व दिल्लीचे माजी मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल व तामिळनाडूमधील एक माजी द्रमुक मंत्री बालाजी यांनी कारागृहात गेल्यावरही राजीनामा न देणे हे असल्याचे मानले जाते. केजरीवाल यांना दिल्लीत गाजलेला मद्य घोटाळ्यात अटक करण्यात आली होती. पण, तिहार कारागृहात गेल्यावरही त्यांनी राजीनामा देण्यास नकार दिला होता आणि त्यांना बरखास्त करण्याचा कोणताही अधिकार केंद्र सरकारजवळ नव्हता. भविष्यात अशी स्थिती उद्भवू नये यासाठी केंद्र सरकारने हे घटनादुरुस्ती विधेयक मांडण्याचा निर्णय घेतला असे समजते.

**एक काळ होता... :** देशाच्या राजकारणात एक काळ होता की, एखाद्या उच्च न्यायालयाने एखाद्या मुख्यमंत्र्याच्या वा मंत्र्याच्या विरोधात ताशेरे ओढले तरी तो मुख्यमंत्री वा मंत्री राजीनामा देत असे. महाराष्ट्राचे एक मुख्यमंत्री बॅ. अब्दुल रहेमान अंतुले यांना सिमेंट घोटाळ्यात मुंबई उच्च न्यायालयाच्या ताशेऱ्यानंतर राजीनामा द्यावा लागला होता. नंतर मात्र न्यायालयांच्या ताशेऱ्यांची धार कमी होऊ लागली, न्यायालयांचा धाक कमी होऊ लागला. न्यायालयांच्या ताशेऱ्यानंतरही मंत्री आपापल्या पदांवर सन्मानाने राहू लागले.

**मुख्यमंत्री कारागृहात :** मुख्यमंत्र्यांनी कारागृहात जाण्याची स्थिती अलिकडच्या काळात सुरू झाली. झारखंडचे मुख्यमंत्री हेमंत सोरेन यांना कारागृहात जावे लागले. मात्र, कारागृहात जाण्यापूर्वी त्यांनी राजकीय प्रगल्भता दाखवीत राजीनामा दिला व नंतर ते कारागृहात गेले. केजरीवाल यांनी ती राजकीय परिपक्वता दाखविली नाही. लालूप्रसाद यादव कारागृहात गेले. तेथे जाण्यापूर्वी त्यांनी आपल्या पत्नीस- राबडीदेवीस- मुख्यमंत्री केले. केजरीवाल यांनीही असा विचार केला होता असे समजते. पण, पक्षात व जनतेत आपल्या प्रतिमेला धक्का बसेल या भीतिपोटी त्यांनी राजीनामा न देता कारागृहात जाणे पसंत केले. पण, याने त्यांची अधिक बदनामी झाली. केजरीवाल जवळपास ५ महिने तिहार कारागृहात होते. तेथून त्यांनी सरकार चालविले. म्हणजे या काळात सरकारी कामकाज पूर्णपणे ठप्प होते. दिल्लीत तसेही प्रमुख अधिकार नायब राज्यपालांना देण्यात आले असल्याने लोकनिर्वाचित सरकारला फारसे अधिकार नाहीत. पण, जे काही लंगडे-लुळे सरकार आहे तेही कारागृहात बंदिस्त होते. त्यातूनच या विधेयकाचा जन्म झाला असे समजते. मात्र नंतर संबंधित प्रकरणात न्यायालयाने- त्या मुख्यमंत्र्यास - मंत्र्यास निर्दोष ठरविले तर काय, असा प्रश्न विधेयक सादर केला जाण्यापूर्वीच विचारला जात आहे आणि तो उचितही आहे. सरकारनेही याचा पुरेसा विचार केला असावा असे समजण्यास हरकत नाही.

**१३१ वे घटनादुरुस्ती विधेयक :** खासदारांची संख्या वाढविणे, त्यांच्या मतदारसंघाचे परिसीमन, महिला आरक्षण या संबंधीचे १३१वे घटनादुरुस्ती विधेयक या अधिवेशनात पुन्हा मांडले जाईल असे समजते. अर्थसंकल्पीय अधिवेशनात ते मांडण्यात आले होते. पण, दोन्ही सभागृहांत सरकारजवळ दोन तृतीयांश बहुमत नसल्याने ते पारित करता आले नव्हते. पण, आता तृणमूल काँग्रेस, शिवसेना ठाकरे गट, आम आदमी पार्टी यांच्यात फूट पडली आहे. राष्ट्रवादी काँग्रेसच्या शरद पवार गटाने या विधेयकास पाठिंबा देण्याचा निर्णय घेतला आहे. अशा स्थितीत सरकारला आता हे विधेयक पारित करवून घेण्यास साहाय्य होईल असे मानले जाते.

मात्र, विधेयक पारित झाल्यावरही सरकारला एका समस्येचा सामना करावा लागणार आहे. ही समस्या कायदेशीर- घटनात्मक राहणार आहे. पक्षफुटीची काही प्रकरणे अगोदरच न्यायालयात आहेत. आणखी प्रकरणे न्यायालयात जाणार आहेत. त्यांचा निवाडा-निकाल लागण्यापूर्वी या खासदारांचे मतदान-'वैध' मानून विधेयक पारित केल्यास, पण, नंतर ही पक्षफूट अवैध ठरल्यास सारेच समीकरण गडबडण्याची शक्यता आहे. राजकारणात व कायदा तयार करताना या सर्व बाबींचा फार काळजीपूर्वक विचार करावा लागतो व सरकारकडून तो केला जाईल असे समजण्यास हरकत नाही.

**चर्चा होईल काय ? :** अशा या दोन महत्त्वाच्या व दूरगामी परिणाम करणाऱ्या घटनादुरुस्ती विधेयकांवर संसदेच्या दोन्ही सभागृहांत व्यापक विस्तृत चर्चा होणे अपेक्षित आहे. मात्र, मागील काही अधिवेशनांचे स्वरूप पाहता यावर एक मोठे प्रश्नचिन्ह आहे असे म्हणता येईल. संसदेतील गंभीर चर्चा- दर्जेदार भाषणे हा भाग आता इतिहासजमा झाला आहे. विरोधी पक्षांनी संसदेचे कामकाज चालू द्यावे व त्यांनी सभागृहात आपली भूमिका प्रभावीपणे मांडावी असे अभिप्रेत आहे आणि सरकारी पक्षानेही विरोधी पक्षांच्या भावना विचारात घेत त्यांना बोलण्याची पूर्ण संधी द्यावी हेही अपेक्षित आहे. पण, सध्या विरोधी पक्ष आणि सत्ताधारी पक्ष यांच्यातील संबंध कमालीचे ताणले गेलेले आहेत. यात दोन्ही पक्षांनी जवळ येणे, एकत्र येणे जवळपास अशक्य असल्याचे मानले जाते.

**नवे सभागृह ? :** खासदारांची संख्या वाढल्यास या सर्व खासदारांना सामावून घेण्याची क्षमता विद्यमान संसद भवनात नाही. सांसदीय परंपरेनुसार दरवर्षी होणाऱ्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाचा प्रारंभ दोन्ही सभागृहांसमोर राष्ट्रपतींच्या अभिभाषणाने होत असतो. लोकसभा व राज्यसभा यांची सदस्यसंख्या वाढल्यानंतर संयुक्त बैठक कुठे होणार हा प्रश्न उपस्थित होणार आहे. त्यासाठी तिसरे संसद भवन बांधावे लागेल असे करण्यापेक्षा राष्ट्रपतींनी लोकसभा भरणाऱ्या सभागृहात येऊन भाषण द्यावे व राज्यसभा सदस्यांनी ते आपल्या सभागृहात म्हणजे राज्यसभेत बसून ऐकावे असा एक पर्याय काढला जाऊ शकतो. अर्थात ही समस्या लोकसभा निवडणुकीनंतर उद्भवणार आहे. २०२९ च्या लोकसभा निवडणुकीनंतर लोकसभा खासदारांची संख्या वाढलेली असेल तर राज्यसभा खासदारांची संख्या वाढण्यास नंतर काही वर्षे लागतील. राज्यसभेच्या नियमानुसार एक तृतीयांश सदस्य दर दोन वर्षांनी निवृत्त होत असतात व नवे सदस्य निवडले जात असतात म्हणजे नव्या विधेयकानुसार राज्यसभा खासदारांची संख्या वाढल्यास २०२९ नंतर ६ वर्षे लागतील.

**आणखी काही मुद्दे :** पावसाळी अधिवेशनात जंतर-मंतरवर सुरू असलेले विद्यार्थ्यांचे आंदोलन, सोनम वांगचुकांचे उपोषण हे मुद्दे उपस्थित केले जातील, असे समजते. ऑपरेशन सिंदूरबाबत संरक्षण मंत्री राजनाथसिंग यांच्याविरोधात हक्कभंग प्रस्ताव आणण्याची तयारी विरोधी पक्षांनी चालविली असल्याचे समजते. ऑपरेशन सिंदूर दरम्यान एकही भारतीय जवान हुतात्मा झाला नसल्याचे विधान राजनाथसिंगांनी केले होते, असा विरोधी पक्षांचा दावा आहे आणि आता ६ भारतीय जवान हुतात्मा झाल्याची बाब भारत सरकारने मान्य केली आहे. त्यामुळे राजनाथसिंगांनी चुकीची माहिती देत संसदेची दिशाभूल केली असा विरोधी पक्षांचा आरोप आहे. राजनाथसिंगांनी याचा अगोदरच इन्कार केला आहे. त्यामुळे विरोधी पक्षांनी राजनाथसिंगांच्या विरोधात आणलेल्या हक्कभंग प्रस्तावास फार महत्त्व दिले जात नाही.

संसद सुरू असताना घडलेल्या घटनांचे साद-पडसाद सभागृहांत उमटत असतात. याने कधी कधी संपूर्ण अधिवेशनाची दिशाही बदलून जाते असाही इतिहास आहे. अशा घटनांबाबत सरकार काहीच करू शकत नाही, ही वस्तुस्थिती असते. मात्र, १३० व १३१ क्रमांकाची दोन घटनादुरुस्ती विधेयके येणाऱ्या काळात अतिशय महत्त्वाची ठरतील यात शंकाच नाही. ■

## वेध

**हेमंत सालोडकर**

# सुविधांचा सुकाळ संस्कारांचा दुष्काळ

लोकांना कोणतीही गोष्ट फुकट मिळण्याची सवय झाली की तिचे मोल राहात नाही. सार्वजनिक वस्तूंचा वापर कसा करायचा, त्याचे नुकसान होऊ नये याची काळजी घेण्याची जबाबदारी सरकारसोबतच नागरिकांचीही आहे. सार्वजनिक मालमत्ता म्हणजे सरकारने नागरिकांच्या करातून उभारलेल्या त्या सुविधा, ज्यांचा वापर प्रत्येक नागरिक करतो. रस्ते, पदपथ, वाचनालये, क्रीडा मैदाने, उद्याने, बसथांबे, सार्वजनिक स्वच्छतागृहे, पथदिवे, विजेचे खांब, पोलिस बुथ, सार्वजनिक ठिकाणी असलेले स्टील डस्टबिन, ग्रीन जिम, कियॉस्क मशिन्स, थोर पुरुषांचे पुतळे अशा सर्व गोष्टींची काळजी घेणे, त्यांचा उपयोग करणे नागरिकांचे कर्तव्य आहे. या मालमत्तेचे जतन करणे ही केवळ सरकारची नव्हे, तर प्रत्येक नागरिकाचीही जबाबदारी आहे. मोठ्या शहरांमध्ये या सुविधा असतात. त्याचा उपयोग सुजाण नागरिक करतात, पण काही समाजकंटकांच्या उपद्रवामुळे या वस्तूंचे नुकसान होते.

अनेक ठिकाणच्या सार्वजनिक वाचनालयांची स्थिती अत्यंत दयनीय आहे. वाचनालयांतील पुस्तके फाडणे किंवा चोरीला जाणे, अस्वच्छता यामुळे तेथे जाण्यास अनेक जण टाळतात. अनेक गरीब मुले वाचनालयात अभ्यास करायला जातात. पण तेथील अव्यवस्था पाहून त्यांच्या पदरी निराशा पडते. जेथे ज्ञान ग्रहण करायचे ती जागा स्वच्छ असावी, वातावरण प्रसन्न असावे. पण काही नागरिकांच्या वागण्यामुळे वातावरण गढूळ होते. क्रीडा मैदानांचीही यापेक्षा वेगळी स्थिती नाही. साहित्याची तोडफोड, तुटलेली बाके, व्यायामाची साधने मोडलेली असतात. अनेक ठिकाणी ग्रीम जिम उभारण्यात आले आहेत. नव्याचे नऊ दिवस म्हणून त्यांची देखरेख ठेवली जाते. पण काही दिवसांतच ती तुटलेली असतात. रस्त्याच्या बाजूला अनेक ठिकाणी स्टीलचे डस्टबिन असतात.

काही दिवसांनी त्यापैकी काहीच शिल्लक असतात. बाकीचे चोरीला जातात. तेथे फक्त त्यांचे खांब उभे असतात. यासह शहर स्वच्छ असावे म्हणून फायबर स्वच्छतागृहे असतात. त्यातील साहित्यही चोरीला जाणे, पाण्याच्या टाक्या चोरीला जाणे असे प्रकार आढळून येतात. पदपथावर अतिक्रमण, रस्त्यावरील पुतळे अस्वच्छ, कियॉस्क मशिन्सची दुरवस्था हे नेहमीचेच झाले आहे. काही दिवसांपूर्वी वाहतूक पोलिसांसाठी चौकाचौकात बुथ ठेवले होते. पण मोजक्याच बुथचा वापर केला जातो. इतर बुथ केवळ शोभेचे ठरले आहेत. आता युद्धसुद्धा मानवरहित होत असताना, वाहनचालकांवर नजर ठेवण्यासाठी पोलिसांची गरज उरली नाही. अत्याधुनिक कॅमेरे ठिकठिकाणी असतील आणि नागरिकांना वाहतूक नियम पाळण्याचे संस्कार असतील तर वाहतूक पोलिसांचीही गरज उरणार नाही आणि बुथचीही आवश्यकता राहणार नाही. या समस्या केवळ महानगरांसाठी मर्यादित नाही.

सार्वजनिक वस्तूंचे नुकसान म्हणजे आपले नुकसान आहे, याची जाणीव नागरिकांना केवळ सामूहिक संस्कारांतूनच होऊ शकते. नागरिकांच्या कुरापतखोर वागणुकीमुळे सरकारला एकाच गोष्टीवर वारंवार पैसे खर्च करावे लागतात. तो पैसा इतर विकास कामांवर खर्च करता येत नाही. या गोष्टी टाळायच्या असतील तर प्रत्येक सुविधेसाठी नागरिकांकडून शुल्क आकारणे गरजेचे आहे. भुर्दंड बसल्यावर लोकांना सार्वजनिक संस्कारांची जाणीव होईल. यासाठी प्रत्येक ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसविणे, सार्वजनिक मालमत्तेची तोडफोड करणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई, सार्वजनिक मालमत्तेच्या संरक्षणासाठी विशेष पथके, सुजाण नागरिक घडविण्यासाठी शाळा, महाविद्यालयांमध्ये जागृती करणे आवश्यक आहे. मात्र, केवळ दंडात्मक कारवाई पुरेशी नाही, नागरिकांचा सक्रिय सहभाग तितकाच महत्त्वाचा आहे. परिसरातील सार्वजनिक मालमत्तेच्या देखभालीसाठी स्वयंसेवी उपक्रम राबवावेत. मुलांना उद्याने, वाचनालये आणि सार्वजनिक ठिकाणी शिस्त पाळण्याची सवय लावणे आवश्यक आहे. सार्वजनिक वस्तू वापरण्याचे संस्कार रुजले, तर मोफत सेवा टिकतील, सार्वजनिक खर्च कमी होईल आणि विकासकामांसाठी अधिक निधी उपलब्ध होईल. सार्वजनिक मालमत्तेचे संरक्षण ही केवळ कायदेशीर जबाबदारी नसून सुजाण नागरिकत्वाची खरी ओळख आहे. ■

९८५०७५३२८१

## कानोसा

# श्रद्धेचे दृढीकरण आणि व्यवस्थेचे शुद्धीकरण

**अमोल पुसदकर**

रामजन्मभूमीवर प्रभू श्रीरामांचे भव्य मंदिर उभे राहावे, ही केवळ भारतातील नव्हे तर जगभरातील कोट्यवधी रामभक्तांची शतकानुशतके जपलेली इच्छा होती. अनेक पिढ्यांच्या संघर्ष, त्याग आणि प्रतीक्षेनंतर अयोध्येत उभे राहिलेले श्रीराम मंदिर हे भारतीय संस्कृती, श्रद्धा आणि राष्ट्रीय अस्मितेचे प्रतीक बनले आहे.

प्रभू श्रीराम हे मर्यादा पुरुषोत्तम म्हणून ओळखले जातात. आदर्श पुत्र, आदर्श भाऊ, आदर्श पती, आदर्श राजा आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे सत्य व धर्मासाठी सर्वस्वाचा त्याग करणारे व्यक्तिमत्त्व म्हणून त्यांचे स्मरण केले जाते. म्हणूनच आजही आपण अभिमानाने म्हणतो-

**रघुकुल रीति सदा चली आई, प्राण जाई पर वचन न जाई.**

अशा सत्यनिष्ठ परंपरेचे प्रतीक असलेल्या श्रीरामांच्या मंदिराशी संबंधित देणग्यांच्या व्यवस्थापनाबाबत काही अनियमिततेचे आरोप समोर आल्याने अनेक रामभक्तांच्या मनात वेदना निर्माण होणे स्वाभाविक आहे. या प्रकरणाची चौकशी सुरू असून संबंधित यंत्रणा आणि न्यायव्यवस्था आपले काम करत आहेत. दोषी कोणी असेल तर त्याच्यावर कठोर कारवाई व्हावी आणि निरपराध व्यक्तीवर अन्याय होऊ नये, हीच प्रत्येक रामभक्ताची अपेक्षा आहे. मात्र या घटनेच्या निमित्ताने काही राजकीय आणि वैचारिक वादही निर्माण झालेत. काहींनी या आरोपांच्या आधारे संपूर्ण राम मंदिर, ट्रस्ट किंवा हिंदू समाजावर प्रश्नचिन्ह उभे करण्याचा प्रयत्न केला. कोणत्याही एका व्यक्तीच्या किंवा काही व्यक्तींच्या कथित चुकीचा ठपका संपूर्ण संस्थेवर किंवा समाजावर ठेवणे योग्य नाही. वास्तविक पाहता देणगी स्वरूपात आलेली धनराशी मोजणे व त्याचे योग्य व्यवस्थापन करणे याच्याबद्दलचा करार बँक ऑफ इंडिया सोबत झालेला होता. जे लोक अटकेमध्ये आहेत त्यातही त्यांचेच कर्मचारी आहेत. ज्या प्रकारे एखाद्या सरकारी कार्यालयातील भ्रष्टाचारामुळे संपूर्ण शासन भ्रष्ट ठरत नाही, त्याचप्रमाणे एखाद्या धार्मिक संस्थेतील कथित अनियमिततेमुळे श्रद्धेचे मूल्य कमी होत नाही. तसेच गैरव्यवहार झाला या घटनेचेही अवमूल्यन व्हायला नको.

या देशात राहणाऱ्या प्रत्येक व्यक्तीचे, समाजघटकाचे, राजकीय पक्षांचे आणि विविध संघटनांचे काही ना काही हितसंबंध असतात. अनेकदा त्या हितसंबंधांच्या दृष्टीनेच त्यांची भूमिका निश्चित होत असते. राम मंदिराच्या प्रश्नातही हेच चित्र दिसून आले. काही राजकीय नेत्यांनी प्राणप्रतिष्ठा सोहळ्याला उपस्थिती लावली, तर काहींनी त्यापासून जाणीवपूर्वक दूर राहण्याचा निर्णय घेतला. काहींनी या कार्यक्रमावर टीका केली, तर काहींनी त्याचे मनापासून स्वागत केले. काहींना राम मंदिराची उभारणीच मान्य नव्हती; काहींनी त्या जागेचा इस्पितळासारख्या अन्य कारणांसाठी उपयोग व्हावा, अशी भूमिका मांडली. तर काहींच्या राजकीय भूमिकेवरून असे जाणवले की, हा प्रश्न कायम प्रलंबित राहिला असता तर त्यातून त्यांना राजकीय लाभ मिळाला असता.

काही लोकांनी राम मंदिराच्या निर्माणाला मोदींचा किंवा भाजपाचा विजय मानले. राम मंदिर हे जागतिक आस्थेचे केंद्र आहे या सत्यतेची त्यांच्या मनाला पुसटशी जाणीवही कधी झाली नाही. राम मंदिर हा त्यांच्यासाठी संघ परिवाराचा मुद्दा होता. ज्या वेळेला राम मंदिरासाठी संपूर्ण देशभरातून एक एक रुपया गोळा करण्यात आला त्याही वेळेला तो पैसा कुठे गेला, त्याचे काय झाले असे प्रश्न विचारणारे होते. असे प्रश्न विचारणाऱ्यांचा त्याही वेळचा उद्देश पैशांचा हिशेब विचारणे हा नव्हता तर संघ परिवाराला बदनाम कसे करता येईल हाच त्यांचा मुख्य उद्देश होता.

प्रभू श्रीरामांवर श्रद्धा असलेला सामान्य माणूस कालही आपल्या कष्टाच्या कमाईतील काही भाग मंदिरासाठी अर्पण करत होता आणि आजही करतो. तो दान करताना व्यवहार करत नाही; तो श्रद्धा व्यक्त करत असतो. त्या श्रद्धेचे संरक्षण करणे ही ट्रस्ट, व्यवस्थापन आणि समाज या सर्वांची संयुक्त जबाबदारी आहे. जेव्हा हा वाद उभा राहिला, तेव्हा समाजातील अनेक जण पुढे आले. त्यांनी आपण राम मंदिरासाठी दान दिलेल्या वस्तूंची नावे आणि यादी जाहीरपणे सांगितली. आम्ही हे दिले होते, आम्ही ते दिले होते, असे अनेकांनी सांगितले. परंतु सनातन धर्मानुसार दानाचे आदर्श तत्त्व असे आहे की, दान दिल्यानंतर आपण काय दिले याचे स्मरणही राहू नये. इतकेच नव्हे, तर मी दान दिले आहे हा अहंभावसुद्धा मनात राहू नये. निःस्वार्थ भावनेने, कोणत्याही प्रसिद्धीची अपेक्षा न ठेवता केलेले दान हेच सनातन धर्माने श्रेष्ठ मानले आहे.

आज आवश्यकता आहे ती दोन गोष्टींची, एक श्रद्धेचे दृढीकरण आणि दुसरे म्हणजे व्यवस्थेचे शुद्धीकरण. श्रद्धा अबाधित राहिली पाहिजे आणि व्यवस्थेतील त्रुटी निर्धाराने दूर केल्या पाहिजेत. राम मंदिर हे केवळ दगडांचे बांधकाम नाही; ते कोट्यवधी भारतीयांच्या श्रद्धेचे, संघर्षाचे आणि सांस्कृतिक स्मृतींचे प्रतीक आहे. त्यामुळे मंदिराची प्रतिष्ठा जपणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे.


प्रभू श्रीरामांनी आपल्या जीवनातून सत्य, न्याय, मर्यादा आणि उत्तरदायित्वाचा आदर्श घालून दिला. त्या आदर्शांनुसारच मंदिर व्यवस्थापनानेही स्वतःला अधिक सक्षम, पारदर्शक आणि लोकविश्वासास पात्र बनविले, तर ही घटना भविष्यासाठी एक महत्त्वाचा धडा ठरेल. ■

९५५२५३५८१३

(लेखक प्रसिद्ध वक्ते, सामाजिक व राजकीय विचारक आहेत.)

### गुरूच शिष्याच्या उन्नतीचे खरे मार्गदर्शक

मनुष्यजन्माचे खरे सार्थक कशात आहे, याचा शोध घेण्याचा प्रयत्न आज फार कमी लोक करतात. बहुतेक प्रत्येक जण बाह्य जगाच्या आकर्षणात रमून गेलेला दिसतो, परंतु खरा, शाश्वत आनंद हा गुरूंच्या चरणीच मिळतो. गुरूंचा सहवास मनुष्याला केवळ समाधान देत नाही, तर त्याला मोक्षप्राप्तीच्या मार्गावरही नेतो. मनुष्यजन्म मिळणे, गुरूंची भेट होणे आणि त्यांना ओळखून त्यांच्या सान्निध्यात राहणे तिन्ही गोष्टी अत्यंत दुर्मिळ आहेत.



गुरू शोधायचे नसतात, उलट योग्य वेळी गुरूच आपल्या जीवनात येतात. गुरू म्हणजे शिष्याचे खरे हित जाणणारे, सुख-दुःखात समत्व कसे राखावे हे शिकवणारे आणि त्याच्या आध्यात्मिक उन्नतीचा मार्ग दाखवणारे. गुरू शिष्याच्या मनातील इच्छा-आकांक्षा हळूहळू नष्ट करतात. गोंदवलेकर महाराज यांचे उदाहरण यासाठी अत्यंत मार्मिक आहे.

गाडी रोज काशीला जाते, पण तिला विश्वेश्वराचे दर्शन होत नाही, दर्शन होते ते त्या गाडीत बसलेल्या प्रवाशांना. त्याचप्रमाणे, गुरूंच्या सान्निध्यात राहून त्यांच्या उपदेशाचे आचरण करणाऱ्यालाच त्याचा खरा लाभ मिळतो. गुरू शिष्याला स्वतःसारखे बनवतात. सदाचारी आणि शुद्ध आचरण करणाऱ्या व्यक्तीच्या देहावर एक प्रकारचे तेज दिसते, परंतु सत्पुरुषांचे वैशिष्ट्य वेगळे असते. त्यांचे अंतःकरण भगवंताच्या भक्तीने व्यापलेले असते. या जगातील देहाधिष्ठित सुखांचे मार्ग आपण अधिक जाणतो, परंतु देहाच्या पलीकडे असलेले, चिरंतन आणि खरे सुख भगवंताशी एकरूप होण्याचे सुख हे केवळ गुरुकृपेनेच समजू शकते. म्हणून आध्यात्मिक प्रगतीसाठी गुरुकृपा होणे आवश्यक आहे

गोंदवलेकर महाराज म्हणतात, आगगाडीत बसलेले सर्व प्रवासी शेवटच्या स्थानकापर्यंत पोहोचतात, त्याचप्रमाणे, गुरूंचे आज्ञापालन करणारे सर्व जण भगवंतापर्यंत पोहोचतात. सदोष, पापी किंवा अयोग्य वाटणारे लोकही गुरुकृपेने तरून जाऊ शकतात. जसे वाल्या कोळी लुटारू होता परंतु भक्तीमुळे, साधनेमुळे आणि गुरुकृपेमुळे त्याचे जीवन ऋषितुल्य झाले आणि पुढे वाल्मीकि ऋषी झाले.

**रमा देशमुख**/नागपूर

■■■

## वाचक पत्रे

### अव्याहत प्रयत्न गरजेचे

१८ जुलैच्या मागोवा पुरवणीत व्याप्त काश्मीरसंदर्भातील प्रफुल्ल केतकरांचा लेख वाचनीय आहेच. या विषयावर आणखीन सखोल व विस्तृत आणि अभ्यासपूर्ण चर्चा होणे गरजेचे आहे, असे मला वाटते. सरकार युनोत या प्रश्नावर आवाज उठवून मानवी स्वातंत्र्यावर पाक लष्कर कसा भयानक अत्याचार करीत आहे, हे जगाला दाखवले पाहिजे. पूर्वीच्या सरकारच्या मूर्खपणामुळे पाकने बळकावलेला आपला भूभाग परत मिळविण्यासाठी अव्याहत प्रयत्न व्हायलाच पाहिजे, असे मनापासून वाटते. यानिमित्ताने केतकरांची उचललेला मुद्दा विचारात घेऊन यावर चर्चा घडवून आणावी, एवढेच.

**किशोर आपटे**/खराडी, पुणे।७८८८१६४४७१

■■■

### पांदण रस्त्यांसाठी आशेचा किरण

१५ जुलै २०२६ ला महसूल व वन विभागामार्फत मुख्यमंत्री बळीराजा शेत पांदण रस्ते योजनेअंतर्गत एक शासन निर्णय निर्गमित करण्यात आला. त्यात विधानसभा क्षेत्रस्तरीय समितीच्या कामकाजात मदतीसाठी सह-अध्यक्षाच्या नेमणुकीची व्यवस्था आहे. या आधीसुद्धा प्रभावी अंमलबजावणीसाठी अनेक शासन निर्णय अस्तित्वात आहेत, अनेकदा समित्या गठित करण्यात आलेल्या आहेत. पालकमंत्री शेत पांदण रस्ते योजना (२०१८), मातोश्री ग्रामसमृद्धी शेत पांदण रस्ते योजना (२०२१) घोषित करण्यात आल्या होत्या. तसेच मनरेगा आणि रोजगार हमी योजनेच्या माध्यमातूनही यासाठी प्रयत्न झालेत. परंतु या सर्व योजना फारशा यशस्वी झाल्या नाहीत कारण प्रशासकीय अनास्था, निधीचा अभाव, योग्य साहित्य व यंत्रसामुग्री प्रस्तावित नसणे, शेतकऱ्यांकडूनही अतिक्रमणे व असहकार्य वगैरे. आजही अनेक शेत रस्ते शेतकऱ्यांना वाहतुकीसाठी योग्य नाही. पावसाळ्यात शेतात पायी जाण्याचीही सोय नसते तर ट्रॅक्टरद्वारे यांत्रिक शेतीचे स्वप्न तर फार दूर आहे. या सर्व अडचणींवर मात करण्यासाठी, स्थानिक पातळीवर समन्वय व देखरेख करण्यासाठी, भेदभाव टाळण्यासाठी सह-अध्यक्षांच्या नेमणुका करण्यात आल्याने शेत रस्त्यांसाठी एक नवीन आशा निर्माण झाली आहे. शेतकऱ्यांसाठी अत्यंत जिव्हाळ्याचा असलेल्या या प्रश्नाला गती मिळेल आणि योग्य तो निधी अर्थसंकल्पाद्वारे उपलब्ध होईल अशी आशा करू या. ■

**प्रा. विलास डोईफोडे**/९११२८५७२९९

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल अॅड्रेस tbedit2016@gmail.com तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास ९८५०७५३२८१ या व्हॉट्स अॅप क्रमांकावर पाठवावा.

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# बोराळेत अवैध दारू विक्रीविरोधात महिलांचा एल्गार

## जयश्री कवचाळे आक्रमक; पोलिस प्रशासनाला निवेदन

**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा, दि. १९ जुलै -**

मंगळवेढा तालुक्यातील बोराळे गावात अवैध दारूविक्री जोरात चालू आहे. याविरोधात महिलांनी सातत्याने आंदोलने करुनही कारवाई होत नसल्याने त्यांचा राग अनावर झाला आहे. शनिवारी दि. १८ जुलै रोजी पंचायत समिती सदस्य जयश्री कवचाळे यांच्या नेतृत्वाखाली आक्रमक मोर्चा काढून पोहिलस प्रशासनाला निवेदन देण्यात आले.

'निवेदनांचा पाऊस, कारवाईचा दुष्काळ' असे ठळक घोषवाक्य घेऊन बोराळे गावातील महिलांनी पावले उचलली आहे. पंचायत समिती सदस्य जयश्री कवचाळे यांच्या नेतृत्वाखालील मोर्चा काढला. महिला संघटनांनी पोलीस उपनिरीक्षक आरती कन्हेरे यांना तातडीने आणि सातत्याने कारवाई करण्याची मागणी करणारे एक निवेदन दिले. अवैध दारूविक्री, मटका आणि गुटखा विक्रीमुळे गावातील तरुण पिढी व्यसनाच्या विळख्यात सापडत आहे. वारंवार निवेदन देवूनही कारवाई होत नसल्याने आम्ही शांत राहणार नाही. प्रशासन कठोर कारवाई करत नसेल तर व्यापक जनआंदोलन उभारण्याचा निर्णय आम्ही घेतला असल्याचे जयश्री कवचाळे यांनी सांगितले.



### वेळप्रसंगी विधानसभेसमोर आंदोलन

पोलिस आणि प्रशासनाने याकडे गंभीरतेने पहावे. अन्यथा जिल्हाधिकारी, निवडणूक आयोग आणि आवश्यक असल्यास मुंबई प्रवेश करून विधानसभा परिसरात मोठे आंदोलन करणार आहे.
- **जयश्री कवचाळे,** सदस्य, पंचायत समिती सदस्य, मंगळवेढा

# पोलिस किंवा सैन्यात भरती होऊन देशसेवा करा : कुंभार

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १९ जुलै-**

अभ्यास, शिस्त आणि प्रामाणिकपणाचे महत्त्व पटवून देत मोबाईल व सोशल मीडियाच्या आहारी न जाता अभ्यासावर लक्ष केंद्रीत करा, शिक्षणाच्या बळावर पोलीस किंवा सैन्य दलात अधिकारी होऊन देशसेवा करण्याचे स्वप्न बाळगा, असा प्रेरणादायी संदेश पोलीस निरीक्षक गणेश कुंभार यांनी विद्यार्थ्यांना दिला.

बार्शी येथील नवीन मराठी शाळेच्या इयत्ता पाचवी ते सातवीच्या सेमी इंग्रजी विभागातील विद्यार्थ्यांनी बार्शी शहर पोलीस ठाण्याला शैक्षणिक भेट दिली. यावेळी ते बोलत होते. पोलीस उपनिरीक्षक अभयकुमार माकणे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

# ईच्छा भगवंताची परिवारातर्फे उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, खा. पार्थ पवार यांचा सत्कार



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १९ जुलै-**

ईच्छा भगवंताची परिवाराचे मार्गदर्शक तथा प्रभाग क्रमांक २२ चे भाजपचे नगरसेवक किसन जाधव यांनी उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार आणि राज्यसभा खासदार पार्थ पवार यांची सदिच्छा भेट घेत त्यांचा सत्कार केला. यावेळी स्वर्गीय अजितदादांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या अर्धाकृती मूर्तीची भेट खासदार पार्थ पवार यांना देण्यात आली.

बारामती विधानसभा पोटनिवडणुकीतील विजयानंतर उपमुख्यमंत्रीपदाची धुरा सांभाळणाऱ्या सुनेत्रा पवार तसेच राज्यसभेवर बिनविरोध निवड झालेल्या खासदार पार्थ पवार यांचा ईच्छा भगवंताची परिवाराच्या वतीने शाल, पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला. या प्रसंगी स्वर्गीय अजितदादांच्या स्मृतींना उजाळा देणारी अर्धाकृती मूर्ती पार्थ पवार यांना भेट देण्यात आल्याने वातावरण भावूक झाले.

यावेळी युवा नेते चेतन गायकवाड, विनायक शिवशेट्टी, माणिक कांबळे, महादेव राठोड, यल्लप्पा शिवपुरे, वैभव प्रचंडे तसेच ईच्छा भगवंताची परिवाराचे पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते.

# जगदंबा चौकात संत गजानन महाराजांच्या पालखीचे स्वागत

## खा. वाघमारे यांनी फुगडी खेळत अनुभवला वारकरी परंपरेतील भक्तीभाव

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १९ जुलै-**

श्रीक्षेत्र शेगाव येथील संतश्रेष्ठ श्री गजानन महाराजांच्या पालखीचे रविवारी लष्कर परिसरातील जगदंबा चौक येथे भक्तिभावाने स्वागत करण्यात आले. राज्यसभा खासदार प्रा. डॉ. ज्योती वाघमारे यांच्या उपस्थितीत गुलाबाच्या पाकळ्यांची उधळण, पुष्पवृष्टी, टाळ-मृदुंगाचा गजर आणि हरिनामाच्या जयघोषात परिसर भक्तिमय झाला.

यावेळी खासदार डॉ. ज्योती वाघमारे यांनी संत गजानन महाराजांच्या चरणी नतमस्तक होत राज्यात सुख, शांती, समृद्धी, सामाजिक ऐक्य नांदो, बळीराजावर वरुणराजाची कृपा व्हावी, शेतकऱ्यांना त्यांच्या कष्टाचे योग्य फळ मिळावे तसेच प्रत्येक कुटुंब निरोगी व आनंदी राहावे, असे साकडे घातले.



पालखी आगमनावेळी त्यांनी महिलांसमवेत टाळ-मृदुंगाच्या गजरात फुगडी खेळत वारकरी परंपरेतील भक्तीभाव अनुभवला. 'गण गण गणात बोते' आणि 'विठ्ठल... विठ्ठल...'च्या अखंड नामघोषाने परिसर दुमदुमून गेला. शिवसेना युवा सेनेचे जिल्हाप्रमुख तथा सोलापूर महानगरपालिकेचे नगरसेवक प्रियदर्शन साठे यांच्या वतीने भाविकांना प्रसादाचे वाटप करण्यात आले. विठ्ठल-रुक्मिणीच्या वेशभूषेतील चिमुकल्यांनी उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले. यावेळी नगरसेविका कल्पना कदम, दीपक पाटील, अविनाश जाधव, धनंजय पाटील, मोहन नारळे, दिनेश लोणार, भैय्या माने, प्रशांत लोणार, हुलजनतीवाले, मंगेश जंगडेकर, गणेश तुपदोळे उपस्थित होते.

## टी.सी. हरवली आहे

दिनांक १४/५/२६ रोजी किलज ते अणदूर प्रवासा दरम्यान अभिषेक कालिदास जळकोटे या नावाची जवाहर महाविद्यालय अणदूर या संस्थेची १२ वी पास टी. सी. हरवली आहे, ज्यांना सापडली असेल त्यांनी खालील पत्त्यावर आणून द्यावी, त्यांना योग्य ते बक्षीस देण्यात येईल.

**अभिषेक कालिदास जळकोटे**
**मु.पो. किलज, तालुका - तुळजापूर जिल्हा - धाराशिव**

## जाहीर प्रसिध्दीकरण

सिव्हील एम. ए. नं. २५/२०२६
नि.६

### अक्कलकोट येथील मे. सिव्हील जज्ज ज्यु. डी. यांचे कोर्टात

१) **श्री. सिध्दप्पा रेवणसिध्द पुजारी**
रा. मु. तळेवाड पो. बोरोटी, ता. अक्कलकोट
२) **श्रीमती संगव्वा चंद्रशा पुजारी**
रा. मु. तळेवाड, पो. बोरोटी, ता. अक्कलकोट
३) **श्री. गिरेप्पा चंद्रशा पुजारी**
रा. मु. तळेवाड पो. बोरोटी, ता. अक्कलकोट
४) **श्री. यलप्पा चंद्रशा पुजारी**
रा. मु. तळेवाड पो. बोरोटी, ता. अक्कलकोट
५) **श्री. सोमनिंग चंद्रशा पुजारी**
रा. मु. तळेवाड पो. बोरोटी, ता. अक्कलकोट
— **जाब देणार**

विरुध्द

**कोणीही नाही** — **सामनेवाले**

ज्या अर्थी वरील अर्जदाराने या न्यायालयात दिवाणी किरकोळ अर्ज नं. २५/२०२६ हा दि. बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ प्रमाणे दाखल केला असून अर्जदार क्र. १ चे काका व अर्जदार क्र. २ चे चुलत सासरे व अर्जदार नं. ३ ते ५ यांचे आजोबा गिरेप्पा सिध्दप्पा पुजारी यांचे दि. ०१/०५/१९८५ रोजी तळेवाड, ता. अक्कलकोट येथे निधन झाले आहे. अर्जदारांना शासकीय कामाकरीता अर्जदार हे गिरेप्पा सिध्दप्पा पुजारी यांचे वारस असलेने अर्जदारांना वारसा प्रमाणपत्र मिळावे याकरीता अर्ज दाखल केला आहे.

त्या अर्थी या जाहीर प्रसिध्दीकरणाने कळविण्यात येते की, उक्त अर्जाबाबत अथवा यातील अर्जदार हे मयत गिरेप्पा सिध्दप्पा पुजारी यांचे वारस असलेबाबत कोणाचे काही म्हणणे अगर हरकत असल्यास त्यांनी हे जाहीर प्रसिद्धीकरण झाल्यापासून ३० दिवसांत अथवा दिनांक २०/०८/२०२६ रोजी या न्यायालयात हजर राहून आपली हरकत नोंदवावी, अन्यथा कोणाची हरकत नाही, असे समजून उक्त अर्जदाराच्या अर्जावर पुढील आदेश करण्यात येईल व त्याप्रमाणे अर्जदारांना त्यांच्या मागणीप्रमाणे वारसा प्रमाणपत्र देण्याबाबत आदेश मे. कोर्टातर्फे देण्यात येईल.

आज रोजी मे. कोर्टाच्या हुकुमाप्रमाणे माझ्या सहीने हे जाहीर प्रसिद्धीकरण केले. ता. १७/०७/२०२६

कोर्टाचा शिक्का

सही/-
**सहा. अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय,**
**अक्कलकोट**

## जाहीर प्रसिध्दीकरण

पुढील नेमलेली तारीख : १९/०८/२०२६
दि.कि.अ.नं. ४७/२०२६ नि. ५

### बार्शी येथील मे. जिल्हा व सत्र न्यायाधिश साहेब यांचे कोर्टात

१) **आर्या संदिप म्हेत्रे,**
उ.व. १६, धंदा - शिक्षण,
रा. दत्त नगर, मोडनिंब, ता. माढा, जि. सोलापूर
अ.पा.क. अर्जदार नं. ३ आई या नात्याने
२) **आर्यन संदिप म्हेत्रे,**
उ.व. १०, धंदा - शिक्षण,
रा. दत्त नगर, मोडनिंब, ता. माढा, जि. सोलापूर
अ.पा.क. अर्जदार नं. ३ आई या नात्याने
३) **श्रीमती अस्मिता संदिप म्हेत्रे**
उ.व. ३६, धंदा - घरकाम,
रा. दत्त नगर, मोडनिंब, ता. माढा
जि. सोलापूर स्वतःकरीता व अर्जदार
नं. १ व २ चे अ.पा.क. म्हणून
४) **सौ. प्रमिला प्रेमनाथ म्हेत्रे,**
उ.व. ६४, धंदा - घरकाम,
रा. दत्त नगर, मोडनिंब, ता. माढा, जि. सोलापूर
— **जाब देणार**

विरुध्द

**महाराष्ट्र शासन** — **सामनेवाला**

ज्याअर्थी डि. सोलापूर सब डि. ता. माढा पैकी मौजे - टेंभुर्णी येथील बिनशेती प्लॉट जागा तिचे वर्णन गट नंबर - १०१ पैकी प्लॉट नं. ६ क्षेत्रफळ २५६.५० चौ.मी. आकार रु. २३०-८५ पैसे यापैकी अर्जदार यांचे मालकीची पुर्वेकडील बिनशेती खुली प्लॉट जागा त्याचा तपशील येणेप्रमाणे गट नं. १०१ पैकी, प्लॉट नं. ६ पैकी क्षेत्रफळ १२८.२५ चौ.मी. आकार रुपये ११५.४२ पैसे यांसी चतुःसिमा :- पुर्वेस : प्लॉट नं. ८, दक्षिणेस : प्लॉट नं. ५, पश्चिमेस : गट नं. ६ पैकी, उत्तरेस : अंतर्गत रस्ता

वर नमूद केलेली मिळकत अज्ञान अर्जदार यांचे मालकी कब्जे वहिवाटीची व ७/१२ हक्कपत्रकी नोंद असलेली मिळकत असून सदर मिळकत अज्ञान अर्जदार नं. १, २ ची अ.पा.क. म्हणून अर्जदार नं. ३ व ४ यांनी अज्ञान अर्जदार नं. १ व २ यांचे भविष्यातील शिक्षण व गरजा याचा विचार करुन सदर मिळकत विक्री करणेचे ठरवले व योग्य किंमत आलेने सदर व्यवहार अज्ञानाचे हिताचा आहे तथापी, सदर मिळकतीचे मालक हे अज्ञान असलेने सदर व्यवहारास मा.जिल्हा न्यायालयाची परवानगी आवश्यक आहे, सदरची कृती योग्य व गरजेचे असून अज्ञानाचे हिताची आहे, असे कथन करुन अज्ञान अर्जदाराचे वतीने त्यांचे पालनकर्ते म्हणजेच अर्जदार नं. ३ व ४ यांनी या मे. न्यायालयात अज्ञानाची मिळकत विक्री करणेस परवानगी मिळणेचा अर्ज या मे. कोर्टात दाखल केलेला आहे.

त्याअर्थी या जाहीर प्रसिध्दीकरणाने कळविण्यात येते की, अर्जदारांच्या वरील मागणी संबंधाने कोणाच्या काही हरकती असल्यास वा अन्य कोणाच्या काही हक्क अधिकार असल्यास संबंधितांनी ही जाहीर प्रसिध्दीकरण प्रसिध्द झालेपासून ३० दिवसांचे आत अगर पुढील नेमलेली तारीख १९/०८/२०२६ रोजी या मे. कोर्टात स्वतः अगर माहितगार वकीलामार्फत हजर राहून आपले लेखी म्हणणे, हरकती, सादर करावयात. विहित मुदतीत कोणाच्याही हरकती न आल्यास मा.कोर्टाचे प्रकरणी पुढील यथायोग्य आदेश होतील.

हे जाहीर प्रसिध्दीकरण आमचे सहीनिशी व मे. कोर्टाचे शिक्क्यानिशी प्रसिध्दी केले असे. तारीख : १६/०७/२०२६

सही/-
**क. लिपीक**
**जिल्हा न्यायालय, बार्शी**

कोर्टाचा शिक्का

सही/-
**अधिक्षक**
**अप्पर जिल्हा न्यायालय, बार्शी**

# छत्रपती संभाजी महाराज तलाव सुशोभीकरण भ्रष्टाचाराच्या चौकशीसाठी थाळीनाद आंदोलन




**सोलापूर, दि. १९ जुलै-**

छत्रपती संभाजी महाराज तलाव सुशोभीकरण कामामध्ये करोडो रुपयांचा कथित भ्रष्टाचार झाल्याचा आरोप करत या प्रकरणाची सखोल व निष्पक्ष चौकशी करून दोषीवर फौजदारी कारवाई करण्यात यावी या मागणीसाठी संभाजी ब्रिगेडच्या वतीने विजापूर रोडवरील छत्रपती संभाजी महाराज तलाव येथे थाळीनाद आंदोलन करण्यात आले.

यावेळी थाळ्या वाजवून प्रशासनाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला. छत्रपती संभाजी महाराज तलाव हे राजकारण्यांना भ्रष्टाचार करण्याचं कुरण झालं आहे प्रस्तावित पाच कोटी कामाला संभाजी ब्रिगेडचा विरोध असून आधी बारा कोटीची केलेली कामे दाखवा तलाव सुशोभीकरणाच्या कामांमध्ये आर्थिक अनियमितता झाल्याचा संशय व्यक्त करत संबंधित अधिकारी, कंत्राटदार व जबाबदार व्यक्तींवर फौजदारी गुन्हे दाखल करून कठोर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली. यावेळी संभाजी ब्रिगेडचे मा. पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष शाम कदम, जिल्हाध्यक्ष संभाजी भोसले, महिला आघाडी जिल्हाध्यक्ष मीनल दास, विकास तीरेकर, शेखर भोसले, फिरोज सय्यद, संतोष सुरवसे, इशरद नागोरे, प्रकाश डोंगरे, शिरीष जगदाळे, राहुल मेरू, अनिता वाघमारे, जयश्री रानसर्जे, दादाराव कदम, रमेश हबु, राजेश रानसरजे आदी उपस्थित होते.

## CHANGE IN NAME

I hereby declare that my old name in My 10th board certificate and also school Record is PAWAR ATUL KRISHNAT has been changed to new name ATUL KRUSHNATH PAWAR (as per Adhar card) so Both name Are person same and is me .At Post - B-9, Sundar Nagar, near, Banegar Plaza, Vijapur Road, solapur 413004
Aftdv no. 878312
Date 08/07/2026

## जाहीर नोटीस

आमचे अशिल ज्योत्सना विजय मंजुळकर रा. घर नं. ५९७/१, चांभार गल्ली, कुंभारी रोड, कुंभारी, ता. द. सोलापूर यांनी दिलेल्या अधिकारावरून या जाहीर नोटीशीने तमाम लोकांना विशेषतः ता. द. सोलापूर व ता. उ. सोलापूर येथील लोकांना कळविणेत येते की, डि. व सब डि. सोलापूर पैकी ता. द. सोलापूर पैकी मौजे कुंभारी ग्रामपंचायत हद्दीतील गट नं. ३९६/१/ब यापैकी कॉ. गोदूताई परुळेकर विडी कामगार सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या. (अ), ता. द. सोलापूर मधील घरकुल क्र. अ-४६६/३ असे असून ही घरकुल या जाहीर नोटीशीचा विषय आहे. सदरची मिळकत ही मुळतः मुळ सभासद भाग्यलक्ष्मी रामचंद्र कैंची यांना संस्थेकडून रितसर अलॉट झालेली होती, मात्र दरम्यान भाग्यलक्ष्मी रामचंद्र कैंची यांनी त्यांचे कौटुंबिक हॉस्पिटल खर्च भागविणेकरिता सदर मिळकत त्यांनी आमचे अशिल ज्योत्सना विजय मंजुळकर यांना दि. २५/०२/२०२२ रोजी नोटरी दस्त नं. २०३१ ने कब्जापावती व करारपत्राने विक्री केलेली असून त्यानंतर आमचे अशिल ज्योत्सना विजय मंजुळकर यांनी सौ. राधिका सुरेश पाथरूट यांना सदर घरकुल विक्री करुन त्यांचेकडून ठरलेला मोबदला घेतलेला आहे. तेव्हापासून आजतागायत सदरची मिळकत सौ. राधिका सुरेश पाथरुट यांचेच मालकी व प्रत्यक्ष कब्जे वहिवाटीत असून त्यावर इतरांचा कोणाचाही कब्जे वहिवाट वा हक्क अधिकार नाही. सबब, सध्या सौ. राधिका सुरेश पाथरुट यांना सदर मिळकत रितसर संस्थेकडून स्वतःच्या नावांने ट्रान्सफर करण्याचे आहे. परंतु मुळ सभासदांना म्हणजे भाग्यलक्ष्मी रामचंद्र कैंची यांना व त्यांचे घर खुप शोधले असता ते अद्यापपर्यन्त मिळालेले नाही, तरी ते सोलापुरात नसून कोठे आहेत याची कल्पना सुध्दा आमचे अशिलांना नाही. त्यामुळे आमचे अशिल यांनी सदर संस्थेस असे हमीपत्र लिहून दिले आहे की, सदर मिळकत वरील करारपत्र दस्तावदारे सदर संस्थेमध्ये सौ. राधिका सुरेश पाथरुट यांचे नावांने रितसर ट्रान्सफर करून मिळावी, त्यानंतर मुळ सभासद भाग्यलक्ष्मी रामचंद्र कैंची यांनी अथवा त्यांचे वाली वारसदार म्हणून कोणीही कायदेशीर हक्क-अधिकार सांगण्यांस वरील गृहनिर्माण संस्थेमध्ये आल्यास त्याची संपूर्णतः निवारणा आमचे अशिल हे स्वतःचे पदरखर्चीने दूर करून देणार आहेत. अशा प्रकारचे हमीपत्राव्दारे व वरील परिस्थितीचा विचार करुन वर नमूद संस्था / सोसायटी सदर मिळकत सौ. राधिका सुरेश पाथरुट यांचे नावे रितसर संस्थेमध्ये ट्रान्स्फर करण्यास तयार झाले आहे. तेव्हा सदरचे सौ. राधिका सुरेश पाथरूट यांचे नावाची नोंद वरील घरकुलच्या संस्थेच्या संपूर्ण रेकॉर्डला होण्यास कोणाचेही हरकत अथवा तक्रारी असल्यास त्याबद्दल त्यांनी खालील नमूद पत्यावर सदर नोटीस प्रसिध्द झालेल्या तारखेपासून ८ (आठ) दिवसांच्या आत आपली लेखी हरकत तक्रार कळवावी. या मुदतीत कोणाचेही लेखी हरकत अथवा लेखी तक्रार न आल्यास वर नमूद घरकुल आमचे अशिलांनी विक्री केलेल्या व्यक्तीचे नावांने म्हणजेच सौ. राधिका सुरेश पाथरूट यांचे नावाने वरील संस्थेमध्ये रितसर ट्रान्सफर करण्यात येईल. त्यानंतर त्याबाबत कोणाचेही, कसलेही प्रकारचे तक्रार-हरकत चालणार नाही याची नोंद घ्यावी. हे जाहीर नोटीस दिली. तारीख दि. १६/०७/२०२६

सही/-
**ॲड. जगदीश व्ही. कोंडी**
**बी.एस.एल., एलएल.बी., एम.एस.डब्ल्यु**
**ॲडव्होकेट व नोटरी**
**रा. ९१९, भवानी पेठ, सोलापूर-४१३००२**
**मो. ९८६०२०५०७८**
**अशिलतर्फे ॲडव्होकेट**

## बँक ऑफ महाराष्ट्र

**आंचलिक कार्यालय, सोलापूर**
पहिला मजला, अग्रवाल पॅलेस, भारती विद्यापीठ रोड, जुळे सोलापूर, पिन - ४१३००४

Zen Life Making Life Simpler Bank of Maharashtra
YEAR OF DEPOSITS FY 2026-27

### ताबा सूचना - तेरखेडा शाखा

ज्याअर्थी, खालील सही करणार बँक ऑफ महाराष्ट्रचे प्राधिकृत अधिकारी यांनी सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल असेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ (सरफेसी कायदा) अन्वये आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स, २००२ च्या नियम ३ सह वाचल्या जाणाऱ्या कलम १३ (१२) अंतर्गत मिळालेल्या अधिकारांचा वापर करून दिनांक ०७.०५.२०२६ रोजी मागणी नोटीस जारी केली होती. या नोटीसद्वारे संबंधित कर्जदार श्री. सयाजी सुदाम जाधवर आणि श्रीमती सावित्रीबाई सयाजी जाधवर यांना नोटीसमध्ये नमूद केलेली एकूण रक्कम रुपये २२,२७,३११.००/- (अक्षरी रुपये बावीस लाख सत्तावीस हजार तीनशे अकरा मात्र) अधिक कर्ज सुविधेवरील मासिक पद्धतीने लागणारे न आकारलेले व्याज, तसेच करारातील दरानुसार पुढील व्याज आणि इतर आनुषंगिक खर्च, शुल्क इत्यादी (जे दिनांक ०७.०५.२०२६ पासून प्रत्यक्ष पैसे भरेपर्यंत लागू राहील), सदर नोटीस मिळाल्यापासून ६० दिवसांच्या आत भरण्याचे आवाहन करण्यात आले होते.

कर्जदार आणि वर नमूद केलेले इतर संबंधित ही रक्कम परत करण्यात अपयशी ठरल्यामुळे, याद्वारे संबंधित कर्जदार, वर नमूद केलेले इतर आणि सर्वसामान्य जनतेला सूचित करण्यात येते की, खालील सही करणार यांनी सदर कायद्याच्या कलम १३ (४) सह वाचल्या जाणाऱ्या संबंधित नियमांच्या नियम ८ अंतर्गत मिळालेल्या अधिकारांचा वापर करून दिनांक ०९.०७.२०२६ रोजी खाली वर्णन केलेल्या मालमत्तेचा प्रतीकात्मक ताबा घेतला आहे.

विशेषतः कर्जदार आणि वर नमूद केलेल्या इतरांना तसेच सर्वसामान्य जनतेला याद्वारे इशारा देण्यात येतो की, त्यांनी या मालमत्तेशी कोणताही व्यवहार करू नये. या मालमत्तेशी केलेला कोणताही व्यवहार बँक ऑफ महाराष्ट्र, तेरखेडा शाखा यांच्याकडे प्रलंबित असलेल्या रुपये २२,२७,३११.००/- (अक्षरी रुपये बावीस लाख सत्तावीस हजार तीनशे अकरा मात्र) अधिक दिनांक ०७.०५.२०२६ पासून कराराच्या दरानुसार होणारे पुढील व्याज आणि आनुषंगिक खर्च, किंमत व शुल्कांच्या अधीन राहील.

**मालमत्तेचे वर्णन**

ग्रामपंचायत मिळकत क्र. ३२८ (गट नं. २७२) अंतर्गत असलेली, मौजे नांदगाव, ता. वाशी, जि. धाराशिव येथील एकूण ९०० चौरस मीटर क्षेत्रफळ असलेली व त्यावरील बांधकामासहित संपूर्ण स्थावर मालमत्ता.

**चतु:सीमा खालीलप्रमाणे:**
**पूर्वेस** : देविदास आणि सदाशिव घुले यांची मालमत्ता
**पश्चिमेस** : मच्छिंद्र घुले यांची मालमत्ता
**दक्षिणेस:** रस्ता
**उत्तरेस:** चंद्रकांत घुले यांची मालमत्ता आणि स्वतःची मिळकत

**दिनांक: ०९.०७.२०२६**
**स्थळ: तेरखेडा, धाराशिव**

शिक्का

सही/-
**अधिकृत अधिकारी**
**बँक ऑफ महाराष्ट्र**

## श्री महावीर अर्बन को-ऑप बँक लि, सोलापूर

SHRI MAHAVIR URBAN CO-OP. BANK LTD. SOLAPUR ॥ धनवृद्धि समृद्धि ॥

मुख्य कार्यालय : ६०/६१, पूर्व मंगळवार पेठ, सोलापूर ४१३००२
फोन नं-०२१७-२६२२९४४/२६२२९३३

ज्या अर्थी खाली सही करणार श्री महावीर अर्बन को ऑप बँक ली., सोलापूर प्राधिकृत अधिकारी यांनी सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल असेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सेक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट २००२ या कायद्यातील कलम १३ (१२) आणि नियम ८/१ व ३/९ अंतर्गत प्राप्त अधिकारांचा वापर करून खालील कर्जदार व जामीनदार यांना कलम १३ (२) अन्वये खालील नमूद तारखेस मागणी नोटीस बजावली होती कि, त्यांनी सदरची नोटीसतील नमूद केलेली बँकेला येणे असलेली रक्कम नोटीसच्या तारखेपासून ६० दिवसाच्या आत परत करण्याबाबत कळवूनही सदर रक्कम परतफेड करण्यास आपण असमर्थ ठरल्याने, विशेषतः कर्जदार व जामीनदार आणि सर्वसाधारण जनता यांना नोटीस देण्यात येते कि, खाली सही करणार यांनी सदर कायद्याचे सेक्शन १३ (४) व नियम ८/१ व ३/९ अंतर्गत प्राप्त अधिकाराचा वापर करून खाली नमूद मालमत्तेचा प्रतीकात्मक ताबा घेतला आहे.

**ताबा सूचना**
**सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल असेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सेक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट २००२ या कायद्यातील कलम १३ (४) व नियम ८/१**
**परिशिष्ठ IV प्रमाणे**

| अ. क्र. | तपशील | वर्णन |
|---|---|---|
| १ | कर्जदार व जामीनदार यांचे नाव व पत्ता | १) श्रेया एंटरप्रायसेस प्रोप: दिपाली जयसिंग रजपूत (कर्जदार)<br>रा : सी-२६/५५, विणकर उद्योग सोसायटी, एम आय डी सी अक्कलकोट रोड, सोलापूर ४१३००६<br>२) जयसिंग शंकरसिंग रजपूत (जामीनदार)<br>रा : सी-२६/५५, विणकर उद्योग सोसायटी, एम आय डी सी अक्कलकोट रोड, सोलापूर ४१३००६<br>३) मानसिंग शंकरसिंग रजपूत (जामीनदार)<br>रा : भैय्या वस्ती, कर्णिक नगर, अक्कलकोट रोड, सोलापूर ४१३००६ |
| | कर्ज खाते क्र. | ००३००३२१७००००१९१ |
| | थकीत कर्ज रक्कम | एकूण रक्कम रुपये ५१,५४,६८४/- (रु. एक्कावन्न लाख चोपन्न हजार सहाशे चौऱ्याऐंशी फक्त) अधिक दि. ०१/०४/२०२६ पासून १४% प्रमाणे होणारे व्याज + दंड व्याज + इतर खर्च |
| | मागणी नोटीस दिनांक | २०/०४/२०२६ |
| | प्रतीकात्मक ताबा घेतलेली दिनांक | १७/०७/२०२६ |
| | तारण मालमत्ता तपशील | डी. व सब डी. सोलापूर पैकी सोलापूर महानगर पालिका नवीन हद्दवाढ मधील ता. उत्तर सोलापूर पैकी कसबे सोलापूर येथील जुना स. नं. १७७/१अ यासी नवीन स. नं. १६८/१अ यापैकी नवनाथ नगर या नावाने ओळखले जाणारे मधील प्लॉट नं. १९, याचे क्षेत्र ४९९.४३ चौ. मी. (ऑनलाईन उताऱ्याप्रमाणे क्षेत्र ४.९९.४३ आर. चौ. मी.) अथवा ५३७६ चौ. फु. हि जागा व त्यावरील बांधकामासहित मिळकत, या मिळकतीचे चतु:सिमा असे :- पूर्वेस- सामाईक रस्ता व त्या पलीकडे गट नं. १७७, पश्चिमेस - प्लॉट नं. १८, उत्तरेस - प्लॉट नं. १६, दक्षिणेस- गट नं. १७७ ची जमीन. |

विशेषतः कर्जदार, जामीनदार आणि सर्वसाधारण जनता यांना सुचित करण्यात येते कि, त्यांनी सदर स्थावर मालमत्ता संदर्भात कोणताही व्यवहार करू नये असा व्यवहार केल्यास श्री महावीर अर्बन को ऑप बँक लि., सोलापूर यांना येणे असलेली रक्कम कर्जदार यांचे कर्ज व मालमत्ता तारण कर्ज खाते यांचे अधीन राहील. कृपया लक्षात घ्या कि श्री महावीर अर्बन को ऑप बँक लि., सोलापूर यांना उपलब्ध असलेल्या अश्या अधिकार आणि उपायांवर पूर्वग्रह न ठेवता हे प्रकाशन केले गेले आहे. श्री महावीर अर्बन को ऑप बँक लि., सोलापूर कायद्याच्या अधीन असलेल्या आधार आर्थिक आणि कर्जदाराच्या विरुद्ध आपणास पुढील अधिनियमाच्या कलम १३ (१३) नुसार नोंद घेण्याची विनंती केली आहे. आमच्या बँकेच्या पूर्व लेखी संमतीशिवाय वरील तारण मिळकत विल्हेवाट लावण्यापासून किंवा व्यवहार करण्यास किंवा विक्रीच्या मार्गाने, भाडेपट्ट्याने किंवा अन्यथा सुरक्षित मालमत्ताद्वारे हस्तांतरित करण्यास आपल्याला प्रतिबंधित आहे.

**दिनांक : १७/०७/२०२६**
**स्थळ : सोलापूर**

सील

सही/-
**प्राधिकृत अधिकारी**
**श्री महावीर अर्बन को-ऑप बँक ली., सोलापूर**



# हॅरीच्या इंग्लंडला कांस्यपदक

## दहा गोलच्या थरारक सामन्यात इंग्लंडचा फ्रान्सवर ६-४ ने विजय, बुकायो साकाची हॅट्ट्रिक




कांस्यपदकांसह विजयाचा आनंद साजरा करताना इंग्लंड फुटबॉल संघातील खेळाडू

**मियामी, १९ जुलै**

येथे झालेल्या फिफा २०२६ विश्वचषक स्पर्धेतील तिसऱ्या स्थानासाठीच्या लढतीत इंग्लंडने फ्रान्सचा ६-४ असा पराभव केला आणि कांस्यपदक पटकावले. सामन्याच्या अखेरीस इंग्लंडने आपली चार गोलची आघाडी जवळपास गमावलीच होती, पण कशीबशी विजयाची रेषा ओलांडण्यात ते यशस्वी ठरले.

इंग्लंड संघाने बुधवारी अटलांटा येथे अर्जेंटिनाकडून मिळालेल्या हृदयद्रावक पराभवाची निराशा झटकून टाकली आणि पूर्वार्धातच ४-० अशी दमदार आघाडी घेतली. सामन्याच्या सुरुवातीच्या काही मिनिटांतच डेक्लान राइसने लांब अंतरावरून एक अप्रतिम गोल केला; त्यानंतर १८ व्या मिनिटाला राइसच्या कॉर्नरवर एझी कोन्साने हेडरद्वारे गोल केला आणि पूर्वार्धाच्या शेवटच्या आठ मिनिटांत बुकायो साकाने दोन गोल करीत विजयावर जवळपास शिक्कामोर्तब केले.

मात्र, १४ वर्षांच्या कार्यकाळानंतर निरोप घेणारे प्रशिक्षक दिदिएर देशॅम्प्स यांच्याकडून मध्यंतरात मिळालेल्या कडक कानउघाडणीनंतर, फ्रान्स संघ उत्तरार्धात आक्रमक पवित्रा घेऊन मैदानात उतरले. किलियन एमबाप्पेने गोल करीत लिओनेल मेस्सीसोबतच्या 'गोल्डन बूट'च्या चुरशीच्या लढतीत आघाडी घेतली; त्यानंतर तासाभराचा खेळ पूर्ण होण्यापूर्वी ब्रॅडली बारकोलाने गोल करून अंतर ४-२ असे कमी केले आणि ६७ व्या मिनिटाला एमबाप्पेने आपला दुसरा गोल करीत विश्वचषकाच्या इतिहासातील सर्वाधिक गोल करणारा खेळाडू होण्याचा मान मिळविला, त्यामुळे फ्रान्सची पिछाडी केवळ एका गोलची उरली.

साकाने ८६ व्या मिनिटाला पेनॉल्टीवर गोल करीत आपली हॅट्ट्रिक पूर्ण केली; तरीही, 'इंज्युरी टाइम'मध्ये उस्मान डेम्बेलेने गोल करून गोलसंख्या ५-४ अशी केली. डेम्बेलेने बॉक्समध्ये वेगवान मुसंडी मारत डाव्या पायाने मारलेला फटका हेंडरसनला चकवून दूरच्या कोपऱ्यात धाडला आणि फ्रान्सला बरोबरी साधण्यासाठी काही मिनिटांची संधी मिळवून दिली. मात्र, ज्यूड बेलिंगहॅमने प्रतिस्पर्धी बचावफळीला लीलया चकवत व चपळाईने हालचाल करीत इंग्लंडसाठी सहावा गोल नोंदविला आणि फ्रान्सच्या आशा कायमच्या संपुष्टात आणल्या; या विजयासह इंग्लंडने आपल्या इतिहासात पहिल्यांदाच विश्वचषकातील तिसऱ्या स्थानासाठीचा सामना जिंकला. हा निःसंशयपणे या फिफा विश्वचषकातील सर्वोत्तम सामना आहे. या अविस्मरणीय सामन्यात बुकायो साकाने ३७ व्या मिनिटाला, ४५व्या मिनिटाला मैदानी गोल, तर ८७ व्या मिनिटाला पेनॉल्टीवर गोल करून आपली हॅट् ट्रिक साजरी केली. पूर्वार्धात इंग्लंडने फ्रान्सवर पूर्णपणे वर्चस्व गाजवित ४-० अशी आघाडी घेतली होती, पण त्यानंतर फ्रान्सने जोरदार मुसंडी मारत ३-४ अशी पिछाडी भरून काढली. त्यानंतर सामन्याच्या अखेरच्या टप्प्यात दोन्ही संघांनी गोलची देवाणघेवाण केली; फ्रान्सने बरोबरी साधायला हवी होती, पण अखेरीस मियामीमध्ये इंग्लंडने बाजी मारली आणि सामना ६-४ असा संपला.

कर्णधार हॅरी केनच्या नेतृत्वाखाली इंग्लंडच्या खेळाडूंनी अतिथींच्या हस्ते आपली कांस्यपदके स्वीकारली. (वृत्तसंस्था)

# एमबाप्पे २२ गोलसह मेस्सीच्या पुढे

## ओलिसेने ७ गोलसह पेलेचा विक्रम मोडला
## बेलिंगहॅमचे ७ गोल इंग्लंडसाठी सर्वाधिक

**मियामी, १९ जुलै**

**फ्रान्सच्या किलियन एमबाप्पेच्या कारकिर्दीत आता फिफा विश्वचषकात २२ गोल झाले आहेत. त्याने सर्वाधिक गोल करण्याच्या बाबतीत लिओनेल मेस्सीला (२१ गोल) मागे टाकले आहे. मेस्सी रविवारी स्पेनविरुद्धच्या अंतिम सामन्यात खेळण्याची अपेक्षा आहे.**



### १० गोलसह 'गोल्डन बूट'च्या शर्यतीत आघाडीवर

**एमबाप्पे १० गोलसह 'गोल्डन बूट'च्या शर्यतीत आघाडीवर आहे, तर मेस्सीचे ८ गोल आहेत. एकाच विश्वचषक स्पर्धेत १० किंवा त्याहून अधिक गोल करणारा तो चौथा खेळाडू ठरला आहे. तसेच, १९७० मध्ये पश्चिम जर्मनीच्या गर्ड मुलरने अशी कामगिरी केली होती. त्यानेही १० गोल केले होते; त्यानंतर ५६ वर्षांनी एमबाप्पेने ही कामगिरी केली आहे. एमबाप्पेने मेस्सीपेक्षा ५७ मिनिटे अधिक खेळला आहेत. त्यामुळे, अंतिम सामन्यात मेस्सीने पूर्ण ९० मिनिटे (किंवा त्याहून अधिक वेळ) खेळल्यास, 'गोल्डन बूट' जिंकण्यासाठी त्याला किमान 'हॅट् ट्रिक' किंवा दोन गोल आणि एका 'असिस्ट'ची (गोलसाठी मदत) गरज भासेल. २०२६ फिफा विश्वचषकात एमबाप्पेचे १४ गोल-योगदान (१० गोल, ४ असिस्ट) आहे; गेल्या साठ वर्षांतील कोणत्याही एका स्पर्धेतील ही सर्वाधिक संख्या आहे. एमबाप्पेने विश्वचषकाच्या प्रत्येक टप्प्यावर (गट फेरी, राऊंड ऑफ ३२, राऊंड ऑफ १६, उपांत्यपूर्व फेरी, तिसऱ्या स्थानासाठीचा सामना आणि अंतिम सामना) गोल केले आहेत, फक्त उपांत्य फेरीत त्याला गोल करता आलेले नाहीत. त्याने खेळलेल्या तीन उपांत्य सामन्यांमध्ये त्याने एकही गोल केलेला नाही.**

**सामन्यातील सर्वाधिक गोलसंख्या १०**

या सामन्यातील एकूण १० गोल ही १९८२ नंतर (हंगेरी १०-१ एल साल्वाडोर) फिफा विश्वचषकाच्या सामन्यातील सर्वाधिक गोलसंख्या होती. तसेच, विश्वचषकाच्या इतिहासातील तिसऱ्या स्थानासाठीच्या सामन्यातील ही सर्वाधिक एकत्रित गोलसंख्या ठरली (यापूर्वी १९५८ मध्ये ९ गोल झाले होते: फ्रान्स ६-३ पश्चिम जर्मनी). विश्वचषकाच्या इतिहासात केवळ चार सामन्यांमध्ये यापेक्षा जास्त गोल झाले आहेत.

**इंग्लंडला पहिल्यांदाच तिसरे स्थान**

इंग्लंडने फिफा विश्वचषकात पहिल्यांदाच तिसरे स्थान पटकावले; यापूर्वी त्यांनी तिसऱ्या स्थानासाठीचे दोन सामने गमावले होते: २०१८ मध्ये बेल्जियमविरुद्ध (२-१) आणि १९९० मध्ये इटलीविरुद्ध (२-१). १९६६ मध्ये विश्वचषक जिंकल्यानंतरची इंग्लंडची ही आतापर्यंतची सर्वोत्तम कामगिरी आहे.

**जूड बेलिंगहॅमचे सात गोल**

जूड बेलिंगहॅमने २०२६ च्या विश्वचषकात आपला सातवा गोल केला; एकाच विश्वचषक स्पर्धेत एखाद्या इंग्लिश खेळाडूने केलेले हे सर्वाधिक गोल आहेत. बेलिंगहॅमचे हे सातही गोल 'ओपन प्ले'मधून (पेनल्टीशिवाय) झाले आहेत. यामुळे एकाच विश्वचषक स्पर्धेत पेनल्टीशिवाय सर्वाधिक गोल करण्याच्या बाबतीत त्याने गॅरी लिनेकरचा (१९८६ मध्ये ६ गोल) विक्रम मागे टाकला.

**हॅटट्रिक करणारा बुकायो साका चौथा इंग्लिश खेळाडू**

हॅरी केन (२०१८ मध्ये पनामाविरुद्ध), गॅरी लिनेकर (१९८६ मध्ये पोलंडविरुद्ध) आणि जेफ हर्स्ट (१९६६ मध्ये पश्चिम जर्मनीविरुद्ध) यांच्यानंतर विश्वचषकात हॅटट्रिक करणारा बुकायो साका हा केवळ चौथा इंग्लिश खेळाडू ठरला.

**ओलिसेने मोडला पेलेचा विक्रम**

मायकल ओलिसे याने २०२६ फिफा विश्वचषकात सात 'असिस्ट' (गोलसाठी मदत) केले. गेल्या ६० वर्षांत एकाच विश्वचषकात सर्वाधिक असिस्ट करण्याच्या बाबतीत त्याने पेलेचा (१९७० मध्ये ६ असिस्ट) विक्रम मोडला. या विश्वचषकात मायकल ओलिसेच्या असिस्टवर एम्बाप्पेने पाच गोल केले आहेत - गेल्या ६० वर्षांतील एका खेळाडूने दुसऱ्या खेळाडूसाठी केलेले हे सर्वाधिक गोल-संयोजन (गोल कॉम्बिनेशन) आहे.

२०१० च्या गट फेरीतील मेक्सिको आणि दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या सामन्यांनंतर पहिल्यांदाच फ्रान्सला फिफा विश्वचषकात सलग पराभवांचा सामना करावा लागला.

फ्रान्सच्या संघाचे १४ वर्षे नेतृत्व केल्यानंतर दिदिएर देशॅम्प्स यांनी आपला शेवटचा सामना सांभाळला. विश्वचषकातील हा त्यांचा २६ वा सामना होता; फिफा विश्वचषकाच्या इतिहासात सर्वाधिक सामन्यांमध्ये संघाचे नेतृत्व करण्याचा हेल्मुट शॉन यांचा विक्रम त्यांनी मोडला.

**सर्वाधिक गोल सरासरी २.९८**

आज झालेल्या १० गोलमुळे, १९५८ नंतरची ही सर्वाधिक गोल सरासरी (२.९८ - १०३ सामन्यांत ३०७ गोल) असलेली विश्वचषक स्पर्धा ठरली आहे. एप्रिल १९६८ मध्ये युगोस्लाव्हियाविरुद्ध झालेल्या 'युरो १९६८' पात्रता फेरीच्या सामन्यानंतर, ५८ वर्षांत पहिल्यांदाच फ्रान्सने सामन्याच्या पूर्वार्धात चार गोल स्वीकारले. फिफा विश्वचषक सामन्याच्या पहिल्या २० मिनिटांत गोल आणि असिस्ट अशी कामगिरी करणारा डेक्लन राइस हा पहिला इंग्लिश खेळाडू ठरला. (वृत्तसंस्था)

# मेस्सीचा 'गोल्डन बूट'साठी संघर्ष, मात्र 'गोल्डन बॉल' आवाक्यात



**न्यू यॉर्क, १९ जुलै**

'गोल्डन बूट'च्या शर्यतीत किलियन एमबाप्पेला गाठण्यासाठी लिओनेल मेस्सीला अजून मोठी मजल मारावी लागणार आहे.

अर्जेंटिनाचा हा सुपरस्टार फुटबॉलमधील जवळपास सर्वच पुरस्कार जिंकला आहे, फक्त विश्वचषकातील सर्वाधिक गोल करणाऱ्या खेळाडूचा पुरस्कार (गोल्डन बूट) त्याच्या नावावर नाही. फ्रान्सच्या या स्ट्रायकरने तिसऱ्या स्थानासाठीच्या अटीतटीच्या सामन्यात आपली एकूण गोलसंख्या १० वर नेल्यामुळे, मेस्सी आता त्याच्यापेक्षा दोन गोलने मागे पडला आहे.

जरी मेस्सीला 'गोल्डन बूट' मिळवता आला नाही, तरीही न्यू जर्सीमधील ईस्ट रदरफोर्ड येथे स्पेनविरुद्ध होणाऱ्या विश्वचषक अंतिम सामन्यानंतर, स्पर्धेतील सर्वोत्तम खेळाडू म्हणून विक्रमी तिसऱ्यांदा 'गोल्डन बॉल' जिंकण्याची संधी त्याच्यासाठी नक्कीच उपलब्ध आहे. १९७८ मध्ये हा पुरस्कार देण्यास सुरुवात झाल्यापासून एकापेक्षा जास्त वेळा तो जिंकणारा तो एकमेव खेळाडू आहे. शिवाय, वयाच्या ३९ व्या वर्षी अर्जेंटिनाला सलग दुसऱ्यांदा अंतिम फेरीत नेल्यामुळे, आणखी एक 'गोल्डन बॉल' जिंकण्यासाठी त्याची दावेदारी अधिक बळकट झाली आहे.

"तोच इतिहास आहे. तोच एक दिग्गज (लिजेंड) आहे," असे अर्जेंटिनाचे प्रशिक्षक लिओनेल स्कालोनी म्हणाले.

विश्वचषकातील कामगिरीसाठी रविवारी दिले जाणारे इतर पुरस्कार म्हणजे सर्वोत्तम गोलकीपरसाठीचा 'गोल्डन ग्लोव्ह' आणि २१ वर्षे किंवा त्यापेक्षा कमी वयाच्या सर्वोत्तम खेळाडूला दिला जाणारा 'सर्वोत्तम युवा खेळाडू' पुरस्कार.

यापैकी किमान एक, किंवा कदाचित दोन्ही पुरस्कार जिंकण्याच्या स्थितीत स्पेन आहे. कारण, गोलकीपर उनाई सायमनने सात सामन्यांत केवळ एक गोल स्वीकारला आहे, तर १९ वर्षांचा लॅमिन यामाल आक्रमक फळीत चमकदार कामगिरी करत आहे आणि तो जगातील सर्वात आश्वासक खेळाडूंपैकी एक का मानला जातो, हे सिद्ध करत आहे.

मेस्सी त्याच्या कारकिर्दीच्या अशा टप्प्यावर आहे जिथे त्याने फुटबॉलमधील वर्षातील सर्वोत्तम खेळाडूला दिला जाणारा 'बॅलन डी'ओर' पुरस्कार विक्रमी आठ वेळा जिंकला आहे. 'गोल्डन बूट' त्याला अद्याप मिळालेला नाही, परंतु या स्पर्धेतील शेवटच्या दोन सामन्यांपूर्वी तो आघाडीवर होता. उपांत्य फेरीपर्यंत मेस्सी आणि एमबाप्पे या दोघांनीही आठ गोल केले होते, परंतु एका अतिरिक्त 'असिस्ट'मुळे (गोलसाठी मदत करणाऱ्या पासमुळे) मेस्सी आघाडीवर होता. शनिवारी इंग्लंडविरुद्ध फ्रान्सचा ६-४ असा पराभव झाला असला तरी, त्या सामन्यात एमबाप्पेने दोन गोल केले. यासह, १९७० मध्ये जर्मनीचे दिग्गज खेळाडू गर्ड मुलर यांनी १० गोल केल्यापासून, एकाच विश्वचषकात १० गोल करणारा तो पहिला खेळाडू ठरला.

एमबाप्पेने यापूर्वी कतारमध्ये चार वर्षांपूर्वी 'गोल्डन बूट' जिंकला होता; त्यावेळी अंतिम सामन्यात फ्रान्सचा अर्जेंटिनाकडून पराभव झाला होता.

जर अर्जेंटिनाचा विजय झाला आणि मेस्सीने एमबाप्पेला मागे टाकले, तर २००२ मध्ये ब्राझीलने विजेतेपद जिंकताना रोनाल्डोने आठ गोल केले होते, त्यानंतर 'गोल्डन बूट' जिंकणारा आणि त्याच वेळी विजेत्या संघाचा भाग असलेला तो पहिला खेळाडू ठरेल.

आणखी एक 'गोल्डन बॉल' जिंकण्यासाठी त्याला कदाचित कोणत्याही गोलची गरज भासणार नाही.

मेस्सीने २०१४ मध्ये पहिल्यांदा हा पुरस्कार जिंकला होता (तेव्हा अर्जेंटिना उपविजेता ठरला होता) आणि त्यानंतर २०२२ मध्ये पुन्हा एकदा हा पुरस्कार मिळवला; त्यावेळी सात सामन्यांत सात गोल करत त्याने आपल्या देशाला तिसरे विजेतेपद मिळवून देण्यात मोलाची भूमिका बजावली होती. (वृत्तसंस्था)

# सिंधूने जिंकले ऐतिहासिक 'जपान ओपन' विजेतेपद

**टोकियो, १९ जुलै**

माजी विश्वविजेती पी.व्ही. सिंधूने रविवारी इतिहास घडविला. बीडब्ल्यूएफ 'सुपर ७५०' बॅडमिंटन स्पर्धेच्या अंतिम सामन्यात स्थानिक खेळाडू अकाने यामागुचीचा २१-१७, २१-१७ असा पराभव करून 'जपान ओपन' महिला एकेरीचे विजेतेपद जिंकणारी ती पहिली भारतीय ठरली. सिंधूने ही संपूर्ण स्पर्धा एकही गेम न गमावता जिंकली. 'बीडब्ल्यूएफ जागतिक बॅडमिंटन स्पर्धा' (नवी दिल्ली २०२६) सुरू होण्यास महिनाभरापेक्षा कमी कालावधी शिल्लक असताना, 'सय्यद मोदी इंटरनॅशनल' २०२४ नंतरचे तिचे हे पहिलेच विजेतेपद ठरले.



विजेतेपदाच्या चषकासह पी. व्ही. सिंधु

स्थानिक प्रेक्षकांसमोर माजी जागतिक क्रमवारीत अव्वल स्थानी असलेल्या अकाने यामागुचीचा सामना करताना सिंधूने अत्यंत संयमी खेळ केला. तिने पहिला गेम २१-१७ असा जिंकला आणि त्यानंतर दुसरा गेमही त्याच फरकाने जिंकत आपले पहिले 'जपान ओपन' विजेतेपद निश्चित केले. माझ्या डोळ्यांत आनंदाश्रू होते कारण माझ्यासाठी हा विजय अत्यंत महत्त्वाचा होता. मी स्वतःवर खूप मेहनत घेत होते आणि मला हे जमू शकते, असा विश्वास बाळगून होते. अनेक लोक विचारणा करत होते की नक्की काय चालले आहे, तरीही माझा स्वतःवर, माझ्या कुटुंबावर, माझ्या प्रशिक्षकांवर आणि माझ्या सपोर्ट स्टाफवर विश्वास होता, असे सिंधू विजयानंतर म्हणाली.

२०२२ मधील 'सिंगापूर ओपन'नंतर भारताबाहेर सिंधूने जिंकलेले हे पहिलेच 'बीडब्ल्यूएफ वर्ल्ड टूर' विजेतेपद आहे. २०१९ च्या या विश्वविजेती खेळाडूच्या कारकिर्दीतील हा आणखी एक महत्त्वाचा टप्पा ठरला आहे; तिने 'बीडब्ल्यूएफ वर्ल्ड चॅम्पियनशिप्स'मध्ये पाच पदके (ज्यात बासेल येथील ऐतिहासिक सुवर्णपदकाचा समावेश आहे) जिंकली आहेत.

विजेतेपदाच्या प्रवासात, जपानच्या नोझोमी ओकुहाराने उपांत्यपूर्व फेरीपूर्वी माघार घेतल्यामुळे सिंधू थेट उपांत्य फेरीत पोहोचली. उपांत्य फेरीत, टोकियो ऑलिम्पिक विजेती चेन युफेई हिच्याविरुद्ध सिंधू २१-१९, १५-१० अशी आघाडीवर असतानाच दुखापतीमुळे चिनी खेळाडूने सामना अर्धवट सोडला (जखमी निवृत्त झाली), ज्यामुळे यामागुचीविरुद्धचा अंतिम सामना निश्चित झाला.

हा महत्त्वपूर्ण विजय एका अत्यंत महत्त्वाच्या टप्प्यावर मिळाला आहे. १७ वर्षांनंतर 'बीडब्ल्यूएफ वर्ल्ड चॅम्पियनशिप्स' (नवी दिल्ली २०२६) भारतात परतत असताना आणि स्पर्धेला महिनाभरापेक्षा कमी कालावधी शिल्लक असताना, पाच वेळा जागतिक स्पर्धेत पदक जिंकणारी आणि २०१९ ची विश्वविजेती सिंधू आता विजयाची लय आणि नव्याने मिळालेला आत्मविश्वास घेऊन या खेळातील सर्वात मोठ्या स्पर्धेकडे वाटचाल करीत आहे. (वृत्तसंस्था)

### पंतप्रधान मोदींना सिंधूचा भावपूर्ण प्रतिसाद

**नवी दिल्ली, १९ जुलै**

जपान ओपन जिंकणारी पहिली भारतीय खेळाडू ठरल्याबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अभिनंदन केल्यानंतर, दोन वेळा ऑलिम्पिक पदक विजेती पी.व्ही. सिंधू हिने त्यांना एक भावपूर्ण संदेश लिहिला. 'तुमच्या शुभेच्छा माझ्यासाठी अत्यंत मोलाच्या आहेत', असे सिंधूने लिहिले. यात तिने भारतीय खेळांना दिलेल्या सततच्या पाठिंब्याबद्दल त्यांचे आभार मानले आणि टोकियो ऑलिम्पिकनंतरच्या भेटींमधील काही खास आठवणींना उजाळा दिला.

या ऐतिहासिक विजयामुळे तिची बीडब्ल्यूएफ वर्ल्ड टूर विजेतेपदाची दोन वर्षांची प्रतीक्षा आणि 'सुपर ७५०' किंवा त्याहून वरच्या दर्जाच्या स्पर्धेतील विजेतेपदाचा सात वर्षांचा दुष्काळ संपला. या ऐतिहासिक विजयानंतर, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी याचे वर्णन "भारतीय बॅडमिंटनसाठी एक ऐतिहासिक कामगिरी" असे केले. त्यांनी सिंधूच्या जिद्दीचे कौतुक केले आणि तिची ही कामगिरी देशभरातील असंख्य युवा खेळाडूंना प्रेरणा देईल, असे म्हटले.

पंतप्रधानांच्या अभिनंदनपर संदेशाला 'एक्स'वर प्रतिसाद देताना सिंधूने कृतज्ञता व्यक्त केली आणि गेल्या काही वर्षांत त्यांच्यासोबत घालवलेल्या खास क्षणांची आठवण काढली. (वृत्तसंस्था)

# संध्याराणी बंडगर यांचा महाराष्ट्राचे मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांच्या हस्ते सन्मान

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १९ जुलै -**

अखिल भारतीय नागरी सेवा क्रीडा स्पर्धा सन २०२५-२६ या वर्षांत गुजरात येथे झालेल्या लॉन टेनिस या क्रीडा प्रकारात महाराष्ट्र राज्यास पहिल्यांदाच एकेरी व दुहेरीत २ सुवर्ण पदके मिळवून देऊन राज्याचा नावलौकीक केलेल्या आंतरराष्ट्रीय टेनिसपटू संध्याराणी बंडगर, मुख्यलेखापाल, सामाजिक वनीकरण, सोलापूर यांचा सचिवालय जिमखाना, मंत्रालय, मुंबई येथे महाराष्ट्र राज्याचे मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

हा गौरव माझे प्रशिक्षक तसेच मार्गदर्शक राजीव देसाई यांचा देखील असल्याच्या भावना संध्याराणी बंडगर यांनी आपल्या मनोगतातून व्यक्त केल्या. त्याच प्रमाणे माझ्या या यशात माझ्या कुटुंबियांचे देखील मोठे योगदान असल्याचे संध्याराणी यांनी नमूद केले.



संध्याराणी हिच्या या यशाबद्दल राज्य संघटनेचे अध्यक्ष प्रशांत सुतार, सचिव सुंदर अय्यर, जिल्हा संघटनेचे अध्यक्ष राजेश दमाणी यांनी अभिनंदन केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## लिटिल चॅम्प बक्षीस वितरण २६ जुलैला

**सोलापूर, दि. १९ जुलै -**

सोलापूर डिस्ट्रिक्ट क्रिकेट असोसिएशनच्या सर्व १२ वर्षांखालील 'लिटिल चॅम्प' खेळाडूंना व पालकांना कळिवण्यात येते की, स्पर्धेचा बक्षीस वितरण सोहळा रविवार २६ जुलै रोजी सायंकाळी ४ वाजता इंदिरा गांधी स्टेडियमवर होणार आहे. या सोहळ्यात सर्व खेळाडूंना प्रमाणपत्र व सामनावीर बक्षीस देण्यात येईल. जे खेळाडू फोटो सेशनला येऊ शकले नव्हते, त्यांनी सोबत पासपोर्ट साईज फोटो आणावा; जेणेकरून तो प्रमाणपत्रावर लावून असोसिएशनचा शिक्का मारून दिला जाईल. कार्यक्रम संपल्यानंतर सर्व पालक व खेळाडूंसाठी अल्पोपहाराची सोय केली आहे. तरी सर्वांनी या कार्यक्रमास न चुकता उपस्थित राहावे. पाऊस आल्यास कार्यक्रम स्टेडियमच्या हॉलमध्ये घेतला जाईल, असे जिल्हा क्रिकेट संघटनेचे संयुक्त सचिव चंद्रकांत रेंबर्सो यांनी कळिवले आहे.

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# आषाढी वारीत '१०८'च्या ६० रुग्णवाहिका

## जिल्हा व्यवस्थापक डॉ. अनिल काळे यांची माहिती

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. १९ जुलै -**

आषाढीवारीसाठी पालखी सोहळ्यासोबत येणाऱ्या वारकऱ्यांसाठी शासनाचा १०८ अत्यावश्यक वैद्यकीय सेवा विभाग व राज्य आरोग्य विभाग यांनी संयुक्तपणे यंदा वारीसाठी मोठ्या प्रमाणात आरोग्य सेवा उभारली आहे. यावर्षी प्रथमच १० मानाच्या पालखी सोहळ्यांसोबत ६० पेक्षा अधिक रुग्णवाहिका सज्ज असल्याची माहिती जिल्हा व्यवस्थापक डॉ. अनिल काळे यांनी दिली

रखुमाई सभागृह पोलीस संकुल, पंढरपूर येथे 'समारिटन' मोबाईल ॲप तसेच कार्डिओपल्मोनरी रिसक्सटिशन (सीपीआर) या बाबतचे प्रशिक्षण पोलीस अधिकारी व कर्मचारी यांना देण्यात आले. यावेळी ते बोलत होते. यंदा वारीमध्ये सहभागी होणाऱ्या प्रत्येक रुग्णवाहिकेत एक डॉक्टर व चालक सज्ज राहणार आहे. त्यांच्याजवळ अत्यावश्यक औषधाचा मुबलक साठा उपलब्ध राहणार आहे. जिल्हा सोलापूर (जगद्गुरु संत तुकाराम महाराज), जिल्हा सोलापूर (संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर महाराज), जिल्हा सोलापूर (संत श्री सोपानकाका महाराज) आणि इतर सात मानाच्या पालख्यांबरोबर १०८ रुग्णवाहिका उपलब्ध केल्या आहेत.काही रुग्णवाहिका हृदयविकार ग्रस्तांसाठी सुविधा असलेल्या आहेत.




'समारिटन' हे ॲप शासनाच्या आरोग्य विभाग आणि बी व्ही जी फौंडेशन या संस्थेच्या संयुक्त विद्यमाने विकसित केले आहे. ॲपल स्टोअर आणि गुगल प्ले स्टोअरवरून ते मोफत डाउनलोड करता येते. या ॲपमुळे केवळ रुग्णवाहिकेशी संपर्कच साधता येणार नाही, तर प्राथमिक उपचाराची माहितीही यामध्ये दिली आहे. त्यामुळे रुग्णवाहिका पोहोचण्यापूर्वी रुग्णाला काही आवश्यक मदत दिली जाऊ शकते. जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. वर्षा डोईफोडे व १०८ चे मुख्य अधिकारी डॉ. ज्ञानेश्वर शेळके, डॉ किशोर देव यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यात वारकऱ्यांना पालखी मार्ग, तळांवर तसेच पंढरपूर शहरात आरोग्य सुविधा देणार असल्याचेही डॉ. अनिल काळे यांनी सांगितले.यावेळी उपविभागीय पोलीस अधिकारी प्रशांत डगळे, डॉ.विजयकुमार सरडे, डॉ. महेश सूडके, तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ. एकनाथ बोधले, प्रशिक्षक डॉ.वेदव्यास मोरे, डॉ. कौस्तुभ घाटोळे, १०८ चे अतिरिक्त व्यवस्थापक युवराज वाघ, सुनील चव्हाण, दिलीप शिंदे तसेच पोलीस अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

### आपत्कालीन वैद्यकीय मदतीसाठी समारिटन ॲप

आरोग्य विभागाने यावर्षी नावीन्यपूर्ण उपक्रम राबवीत 'समारिटन' नावाचे मोबाइल ॲप्लिकेशन सुरू केले आहे. या ॲपच्या माध्यमातून वारकऱ्यांना आपत्कालीन वैद्यकीय मदतीसाठी त्वरित संपर्क साधता येणार आहे. ॲपवर आलेल्या माहितीवरून रुग्णवाहिका चालकाला रुग्णाचे ठिकाण अचूक कळणार आहे. यामुळे वारीतील रुग्णांना वेळेवर वैद्यकीय मदत मिळून रुग्णाच्या जीवितास धोका कमी होणार आहे.

## महत्वाचे...

### आज बार्शीतील सर्व वैद्यकीय सेवा पूर्ववत सुरु राहणार

**बार्शी दि.१९ जुलै -**

डोंबिवली येथे डॉक्टरांना झालेल्या मारहाणीच्या निषेधार्थ पुकारलेला सोमवार दि. २० रोजीचा राज्यव्यापी लाक्षणिक संप इंडियन मेडिकल असोसिएशनने स्थगित केला आहे. परिणामी बार्शी शहर व जिल्ह्यातील सर्व आरोग्य सेवा पुर्ववत सुरु राहणार आहेत. मुंबई उच्च न्यायालयाने या प्रकरणाची स्वतःहून दखल घेत आवाहन केल्यानंतर आणि आरोपीचा जामीन स्थगित केल्याने हा निर्णय घेण्यात आला आहे. डोंबिवली महानगरपालिकेच्या शास्त्रीनगर रुग्णालयात कर्तव्यावर असलेल्या डॉक्टर आणि कर्मचाऱ्यांना मारहाण व शिवीगाळ करण्यात आली होती. या घटनेच्या निषेधार्थ आयएमएसह विविध वैद्यकीय संघटनांनी कामबंद आंदोलनाची हाक दिली होती. मात्र उच्च न्यायालयाने शनिवारी विशेष सुनावणी घेत आरोपीचा जामीन स्थगित केला. तसेच संबंधित आरोपीला आत्मसमर्पण करण्याचे आदेश दिले. याच आदेशात न्यायालयाने डॉक्टरांना संप मागे घेण्याचे आवाहन केले होते. त्या आवाहनाला प्रतिसाद देत आयएमएने संप स्थगित करण्याचा निर्णय घेतला .

### करमाळ्यात २६ जुलैला रंगणार कारगिल विजय दिवस

**जेऊर, दि. १९ जुलै-**

करमाळ्यातील यशकल्याणी सेवा भवन येथे 'कारगिल विजय दिवस' साजरा करण्यात येणार असल्याची माहिती आजी-माजी सैनिक कल्याणकारी संघटना करमाळा तालुकाध्यक्ष अक्रूर शिंदे, यशकल्याणी सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष प्रा. गणेश करे पाटील यांनी दिली. कारगिल विजयाचा आनंद आणि देशासाठी वीरमरण पत्करलेल्या शहीद जवानांचे स्मरण करण्यासाठी कारगिल विजय दिवस साजरा केला जातो. यंदा या विजयाला २७ वर्ष पूर्ण झाले आहे. हेच औचित्य साधत आजी- माजी सैनिक कल्याणकारी संघटना करमाळा व यश कल्याणी सेवाभावी संस्था करमाळा यांचे संयुक्त विद्यमाने २६ जुलै रोजी कारगिल विजय दिवस या समारंभ होत आहे. तालुक्यातील शहीद जवान परिवारातील वीर पत्नी, वीर माता, वीर पिता, आजी -माजी सैनिक, सैनिक परिवार, आदींनी उपस्थित राहावे असे आवाहन आजी - माजी सैनिक कल्याणकारी संघटना करमाळा व यशकल्याणी परिवाराने केले आहे.

### देवगाव (मा.) येथे एकाची गळफास घेऊन आत्महत्या

**बार्शी दि. १९ जुलै-**

बार्शी तालुक्यातील देवगांव येथे एका व्यक्तीने राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केली. ही घटना शुक्रवार दि. १७ जुलै रोजी संध्याकाळी घडली. बाबुराव दशरथ चव्हाण (वय ५५, रा. देवगाव (मा), ता. बार्शी) असे आत्महत्या केलेल्या व्यक्तीचे नाव आहे. बाबुराव चव्हाण यांनी १७ जुलै रोजी संध्याकाळी ७:२० वाजेच्या सुमारास त्यांच्या देवगाव येथील राहत्या घरी गळफास घेतला. या घटनेनंतर त्यांना तातडीने उपचारासाठी बार्शी येथील ग्रामीण रुग्णालयात दाखल केले. मात्र, वैद्यकीय अधिकाऱ्यांनी त्यांचा मृत्यू झाल्याचे सांगितले. बार्शी ग्रामीण रुग्णालयाच्या वैद्यकीय अधिकाऱ्यांनी बार्शी तालुका पोलिसांना दिली. या माहितीच्या आधारे बार्शी तालुका पोलीस ठाण्यात अनैसर्गिक मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ च्या कलम १९४ प्रमाणे या प्रकरणाची प्राथमिक नोंद करण्यात आली आहे. बाबुराव चव्हाण यांनी हे टोकाचे पाऊल का उचलले, याचे नेमके कारण अद्याप समजू शकलेले नाही. या घटनेचा अहवाल बार्शीच्या तहसीलदारांना पाठविण्याची तजवीज पोलिसांनी ठेवली आहे. बार्शी तालुका पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी तथा सहाय्यक पोलीस निरीक्षक अक्षय सोनवणे यांच्या आदेशानुसार, पोलीस हेड कॉन्स्टेबल खेडकर या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत.

### मंगळवेढ्यात आज रोडरोमिओंच्या त्रासाविरोधात पोलिसांना निवेदन

**मंगळवेढा, दि. १९ जुलै -**

मंगळवेढा संतभूमी परिसरात अल्पवयीन शाळकरी मुलींना रोडरोमी आणि अनावश्यक त्रास होत आहे. त्याविरोधात सोमवार, दि. २० जुलै रोजी सकाळी ११ वाजता मंगळवेढा पोलीस स्टेशनमध्ये संयुक्त निवेदन देण्यात येणार आहे. नागरिकांनी त्यासाठी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन आयोजकांनी केले आहे. स्थानीय पालिका क्षेत्रातील विविध सामाजिक संघटना, शाळांचे शिक्षक-पालक संघ, महिला संघटना आणि विद्यार्थी प्रतिनिधी यांनी एकत्र येऊन ही मोहीम राबविली आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार, संतभूमी परिसरात रात्री आणि सकाळी काही असामाजिक घटक मुलींना अडवून मानसिक त्रास देत आहेत. या घटनेमुळे पालकांमध्ये नैराश्य आणि भीतीचे वातावरण पसरले आहे. याबाबत पोलीस स्टेशनवर जाऊन लिखित निवेदन दिले जाईल व त्वरित चौकशी, सतत पथनियंत्रण व घुसमट होणाऱ्या व्यक्तींबद्दल कडक कारवाई करण्याची मागणी केली जाईल.

## निधन वृत्त...

### दीपक मुसळे



**सोलापूर, दि. १९ जुलै -**

भारत माता कॉलनी, मजरेवाडी येथील दीपक जालिंदर मुसळे (वय ५०) यांचे रविवार दि. १९ जुलै रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात आई, दोन बहिणी असा परिवार आहे.

### ताराबाई सुतार



**सोलापूर, दि. १९ जुलै-**

विमानतळ हत्तुरे वस्ती येथील ताराबाई शंकर सुतार (वय ८०) यांचे नुकतेच आकस्मिक निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर साखर कारखाना स्मशानभूमी येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे ३ मुले, सुना व नातवंडे असा परिवार आहे. भगतलाल शंकर सुतार यांच्या त्या मातोश्री होत.

### रोहिणी कुर्डे



**मोहोळ, दि. १९ जुलै-**

येथील रोहिणी कुर्डे (वय ८१) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात तीन मुले, सुना, नातवंडे असा मोठा परिवार आहे. मोहोळ येथील प्रसिद्ध डॉक्टर अतुल कुर्डे यांच्या त्या मातोश्री होत.




पंढरपूर - सद्बुद्धी दिंडीमध्ये भरपावसात सहभागी झालेले आमदार जयंत पाटील, माजी खासदार राजू शेट्टी, आमदार अमित देशमुख, सतेज पाटील, आमदार अभिजित पाटील आदी.

# सद्बुध्दी दिंडीतून शक्तिपीठ महामार्गाला विरोध

## राजू शेट्टी जयंत पाटलांचा शक्तिपातचा इशारा

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. १९ जुलै-**

शक्तिपीठ महामार्गाला विरोध करण्यासाठी १३ जिल्ह्यांतील शेतकऱ्यांनी पंढरपुरात शनिवारी (दि.१८) 'सद्बुद्धी दिंडी' काढून विठ्ठल चरणी साकडे घातले. ईसबावी येथून सुरू झालेल्या दिंडीत भरपावसात हजारो शेतकरी आणि विविध पक्षांचे नेते सहभागी झाले. संत नामदेव पायरीमार्गे विठ्ठल-रुक्मिणी मंदिरात जाऊन सरकारला सद्बुद्धी देण्याची प्रार्थना केली.

दिंडीमध्ये स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे अध्यक्ष राजू शेट्टी यांच्यासह जयंत पाटील, सतेज पाटील, रासप नेते महादेव जानकर, खासदार धैर्यशील मोहिते-पाटील, आमदार अमित देशमुख, आमदार कैलास पाटील, आमदार अभिजित पाटील, कॉ.गिरीश फोंडे, राष्ट्रवादी (श.प.) जिल्हाध्यक्ष वसंत देशमुख, शेकापचे नेते डॉ.अनिकेत देशमुख आदींसह शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

शक्तिपीठ प्रकल्पाच्या नावाखाली २५ हजार एकर जमिनीवर वरवंटा फिरविण्याचे पाप सरकार करीत असल्याचा आरोप राजू शेट्टी यांनी यावेळी केला. जनतेचा विरोध डावलून कंत्राटदारांच्या फायद्यासाठी हा महामार्ग लादला, तर येत्या काळात या सरकारचा शक्तिपात झाल्याशिवाय राहणार नाही, असा इशारा जयंत पाटील यांनी दिला.

आमदार सतेज पाटील यांनी शक्तिपीठ महामार्गाचा खर्च राज्यातील २२ हजार गावांना प्रत्येकी १ कोटी रुपये दिले, तर ग्रामीण भागातील रस्ते सुधारतील, असे सांगितले.

# पालकमंत्र्यांच्या नावाचा गैरवापर; मुख्य संशयिताला पोलिस कोठडी

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि.१९ जुलै-**

महावितरणच्या कार्यकारी अभियंत्याला पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या नावाचा आणि कथित बनावट आवाजाचा वापर करुन माढा उपविभागातील बाह्यस्त्रोत (आऊटसोर्सिंग) काम मिळवण्यासाठी दबाव टाकल्या प्रकरणी बार्शी शहर पोलिसांनी मुख्य संशयित शिरीष ताटे याला अटक केली आहे. आरोपीला बार्शी येथील प्रथम वर्ग न्यायालयाने सोमवार दि. २० जुलैपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे.

महावितरणचे कार्यकारी अभियंता राकेश मगर यांच्या फिर्यादीनुसार, २३ जून रोजी त्यांच्या मोबाईलवर प्रथम अज्ञात व्यक्तीचा फोन आला. तिने 'पालकमंत्री जयकुमार गोरे बोलणार असल्याचे सांगितल्यानंतर दुसऱ्या व्यक्तीने पालकमंत्र्यांच्या आवाजाची नक्कल करत माढा उपविभागातील आऊटसोर्सिंगचे काम शिरीष ताटे यांना देण्याबाबत दबाव आणला. नंतर शिरीष ताटेने व्हॉट्सॲप कॉल करुन 'पालकमंत्र्यांचा फोन आला होता ना, आता काम मला द्या, अशी मागणी केली. मात्र, शासकीय नियमांनुसारच कंत्राटे दिली जातात असे सांगत मगर यांनी नकार दिला. त्यावर पालकमंत्र्यांकडे तक्रार करुन नोकरी घालवीन, आयुष्य उद्ध्वस्त करीन, अशी धमकी दिल्याचे म्हटले आहे. तक्रारीवरुन बार्शी शहर पोलिसांनी शिरीष ताटे व अज्ञात साथीदाराविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. न्यायालयात सरकारी पक्षाने आरोपीकडून गुन्ह्यात वापरलेले मोबाईल, सिमकार्ड, व्हॉट्सॲप कॉलची माहिती, कॉल डिटेल रेकॉर्ड, कथित बनावट आवाजाचा स्रोत, तांत्रिक उपकरणे तसेच इतर साथीदारांच्या शोधासाठी पोलीस कोठडीची आवश्यकता असल्याचे सांगितले. ते ग्राह्य धरत न्यायालयाने पोलीस कोठडी मंजूर केली. पोलिस कोठडीत कथित बनावट आवाज बनवण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता किंवा अन्य तंत्रज्ञानाचा वापर झाला का, आर्थिक व्यवहार झाले का, तसेच यात आणखी कोणाचा सहभाग आहे का, याचा तपास होईल. प्रकरणाचा तपास पोलीस निरीक्षक गणेश कुंभार करत आहेत.

# संत मुक्ताई पालखीचे बार्शीत आगमन



## आमदार राजेंद्र राऊत यांच्या हस्ते शेंद्री येथे स्वागत

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी दि. १९ जुलै -**

श्री संत मुक्ताई पालखी सोहळ्याचे आगमन सोलापूर जिल्ह्यात झाले. बार्शी तालुक्यातील वारदवाडी फाटा,शेंद्री गावामध्ये आमदार राजेंद्र राऊत यांनी पालखीचे स्वागत केले.

पाच जिल्ह्यांचा प्रवास करणाऱ्या या पालखी सोहळ्याला अनन्यसाधारण महत्व आहे. सोलापूर प्रशासन आणि शेंद्री ग्रामस्थांच्यावतीने भक्तिमय व वातावरणात पालखीचे स्वागत केले. आमदार राजेंद्र राऊत यांनी प्रतिक्रिया देताना सांगितले की, टाळ-मृदुंगाच्या गजरात आज श्री संत मुक्ताई पालखीचे बार्शी तालुक्यात आगमन झाले. सोलापूर जिल्ह्याच्यावतीने या पवित्र पालखी सोहळ्याचे स्वागत करण्याचा मान मला मिळाला. सपत्नीक श्रीसंत मुक्ताईचे मनोभावे दर्शन घेतले. सोलापूर प्रशासन आणि शेंद्री ग्रामस्थांनी केलेल्या भक्तिमय स्वागतामुळे वारकऱ्यांना मोठा आधार मिळाला आहे.

यावेळी संस्थानचे अध्यक्ष ॲड. रविंद्र पाटील, पालखी सोहळा प्रमुख ह.भ.प. रविंद्र हरणे, जि.प. अध्यक्ष दीपक वैद्य यांचे वडील अरुण वैद्य, नगराध्यक्षा तेजस्विनी कथले, सभापती मीनाक्षी रोंगे, सोलापूर प्रशासनातील अधिकारी, वारकरी बांधव व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### वारीच्या स्वागताचे मला परमभाग्य

श्रीक्षेत्र मुक्ताईनगर ते श्रीक्षेत्र पंढरपूर अशी पाच जिल्ह्यांचा प्रवास करणारी ही दिंडी श्रद्धा, भक्ती आणि एकतेचे प्रतीक आहे. मी सर्व वारकरी बंधू-भगिनींना सुखरुप आणि मंगलमय वारीसाठी मनापासून शुभेच्छा देतो.

**- आमदार राजेंद्र राऊत**

# महाळुंग येथील महादेव मंदिराजवळील पाण्याच्या टाकीत अळ्या

**तभा वृत्तसेवा,**
**श्रीपूर, दि. १९ जुलै-**

महाळुंग-श्रीपूर नगरपंचायत हद्दीतील प्रभाग क्र. ५ मधील महादेव मंदिराजवळ असलेल्या दगडी पिण्याच्या पाण्याच्या टाकीतील पाणी दूषित झाले आहे. नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. टाकीतील पाण्यामध्ये अळ्या व जंतू आढळून आल्याची तक्रार नागरिकांनी केली आहे.

गंभीर समस्येबाबत प्रभागातील रहिवासी सुधीर भोसले यांनी सहकाऱ्यांसह नगरपंचायतीचे मुख्याधिकारी संतोष सावंत यांना निवेदन देऊन तातडीने कारवाईची मागणी केली आहे. टाकीतील पाणी अनेक नागरिक पिण्यासाठी वापरतात. मात्र गेल्या अनेक दिवसांपासून या टाकीची स्वच्छता करण्यात आली नसल्यामुळे पाणी दूषित झाले असून त्यामध्ये आळ्या आणि जंतू स्पष्टपणे दिसत आहेत. सध्या पावसाळ्याचे दिवस आहेत, अशा परिस्थितीत हे पाणी पिणाऱ्या नागरिकांना पोटाचे विकार, जुलाब, उलट्या तसेच पाण्यातून पसरणाऱ्या इतर संसर्गजन्य आजारांचा धोका निर्माण होऊ शकतो, अशी भीती निवेदनात व्यक्त करण्यात आली आहे.



नगरपंचायतीने तात्काळ टाकीची सफाई करून निर्जंतुकीकरण करावे, भविष्यात अशा प्रकारची समस्या उद्भवू नये, यासाठी नियमित स्वच्छता व देखभालीचे वेळापत्रक निश्चित करावे, अशी मागणी केली आहे.

सुधीर भोसले, गणेश चव्हाण, अर्जुन माने, महादेव जाधव, राम केंगार, दत्ता चव्हाण, मारुती जाधव, पांडुरंग भोसले, रोहन चव्हाण, आनंद केंगार, विजय चव्हाण, अभिषेक साठे, दत्तात्रय वाघमारे, प्रदीप मस्के, यश जाधव, अजित मते यांच्या वतीने सह्यांचे निवेदन देण्यात आले .

# पोलिस ठाण्याच्या अगदी जवळच 'मटका किंग' पुन्हा सक्रिय

## वैराग पोलिस तात्काळ 'ॲक्शन मोड'मध्ये येण्याची गरज

तभा वृत्तसेवा,
वैराग, दि. १९ जुलै -

करमाळा विभागाच्या कर्तव्यदक्ष पोलीस उपविभागीय अधिकारी अंजना कृष्णा यांनी बार्शीचा प्रभारी चार्ज घेतला होता. तेव्हा वैराग शहरातील अवैध धंद्यांवर चांगले नियंत्रण होते. मात्र त्यानंतर वैराग पोलीस प्रशासनाच्या ढिम्म कारभारामुळे मटका किंग पुन्हा एकदा सक्रिय झाले आहेत.

सध्या वैराग शहरात पोलीस ठाण्याच्या अगदी हाकेच्या अंतरावर आणि मुख्य बाजारपेठेत दिवसाढवळ्या मटक्याचे आकडे लिहिले जात आहेत. पोलीस ठाण्यातील स्थानिक बीट अंमलदारांपासून ते वरिष्ठ अधिकाऱ्यांपर्यंत सर्वांनाच



हे काळे धंदे कुठे आणि कोणाच्या माध्यमातून चालवले जातात, याची माहिती आहे. असे असतानाही या मटका किंगवर कोणतीही ठोस कारवाई केली जात नाही. अंजना कृष्णा यांनी जी धडक कारवाईची धमक दाखवली, ती धमक दाखवण्यात वैराग पोलीस का अपयशी ठरत आहेत? मटक्याच्या विळख्यामुळे वैराग आणि परिसरातील कॉलेजवयीन तरुण, कष्टकरी शेतमजूर आणि सामान्य नागरिक झटपट पैसे कमावण्याच्या आमिषाला बळी पडत आहेत.

नागरिकांचा संताप अनावर झाल्यावर पोलीस केवळ नावापुरती किरकोळ कारवाई करतात. मटक्याच्या अड्ड्यांवर एखादा जुजबी गुन्हा दाखल करून पुन्हा हे अड्डे राजरोसपणे सुरू ठेवले जातात. त्यामुळे ही कारवाई निव्वळ दिखाव्यापुरती आणि पडद्यामागील सेटिंग कायम असल्याची जोरदार चर्चा रंगत आहे.

वैरागच्या सुज्ञ जनतेची सहनशीलता आता संपत आली आहे. नागरिकांना पोकळ आश्वासने किंवा निव्वळ कागदी गुन्हे नको आहेत. आक्रमक आणि कायमस्वरूपी मोहीम वैराग पोलिसांनी राबवणे गरजेचे आहे.

### मटका माफियांचा वाढता उपद्रव

- मुख्य बाजारपेठ आणि पोलीस ठाण्याच्या परिसरातच टेबल लावून आकडे उघडपणे लिहिले जात आहेत.
- कॉलेजवयीन तरुण आणि कष्टकरी वर्ग या आमिषाच्या जाळ्यात उद्ध्वस्त होत आहे.
- तात्पुरत्या कारवायांमुळे मटका किंगचे मनोबल वाढले असून, कायमस्वरूपी कारवाईची मागणी होत आहे.
- आता तरी वैराग पोलीस स्टेशन खडबडून जागे होणार का?

## महत्वाचे...



## शिक्षण प्रसारक मंडळाच्या वतीने पालखी सोहळ्यातील वैष्णवांना अन्नदान

**अकलूज, दि. १९ जुलै -**

येथील शिक्षण प्रसारक मंडळाच्या वतीने जगद्गुरु श्री संत तुकाराम महाराज, श्री संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्यातील वैष्णवांना सुमारे ३३ हजार भाकरी व १४० किलो बेसनाचे पिठले, ठेचा, लोणचे, कांदा अशा अस्सल ग्रामीण आस्वादाचे अन्नदान करण्यात आले. संस्थेचे ज्येष्ठ संचालक जयसिंह मोहिते-पाटील, नगरसेवक सयाजीराजे मोहिते-पाटील यांच्या हस्ते आणि संस्थेचे सचिव अभिजीत रणवरे, सहसचिव हर्षवर्धन खराडे-पाटील आदींच्या प्रमुख उपस्थितीत या उपक्रमाचा शुभारंभ करण्यात आला. या उपक्रम ाचे यंदाचे १२ वे वर्ष आहे. संस्थेचे ज्येष्ठ संचालक जयसिंह मोहिते पाटील यांच्या संकल्पनेतून हा उपक्रम सुरु करण्यात आला.

अध्यक्ष संग्रामसिंह मोहिते पाटील, संचालिका स्वरूपाराणी मोहिते पाटील, नगरसेवक सयाजीराजे मोहिते पाटील यांनी ही परंपरा पुढे सुरु ठेवली आहे. तुकोबारायांच्या पालखी सोहळ्यातील वैष्णवासाठी अकलूज सराटी महामार्गावर झालेल्या या अन्नदानात सदाशिवराव माने विद्यालय अकलूज, महर्षी शंकरराव मोहिते प्रशाला यशवंतनगर, जिजामाता कन्या प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालय अकलूज, लक्ष्म ीबाई कन्या प्रशाला यशवंतनगर, महर्षी शंकरराव मोहिते प्रशाला प्राथमिक विभाग, श्रीमती रत्नप्रभादेवी मोहिते पाटील गृहविज्ञान म हिला महाविद्यालय अकलूज या ६ शाखेतून सुमारे ८ हजार विद्यार्थी अन्नदानात सहभागी झाले.

श्री संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्यासाठी संस्थेच्या सदाशिवनगर येथील कर्मवीर बाबासाहेब पाटील विद्यालय व जुनिअर कॉलेज सदाशिवनगर यांच्या वतीने मांडवे विसावा येथे दि. २० जुलै रोजी ५ हजार भाकरी, ३५ किलो बेसन, ठेचा, लोणचे असे अन्नदान करण्यात येणार आहे. वेळापूर येथील सहकार महर्षी शंकरराव मोहिते-पाटील विद्यालय, प्राथमिक, माध्यमिक व अर्धनारी नटेश्वर महाविद्यालय, वेळापूर यांच्या वतीने दि.२१ जुलै रोजी ४ हजार भाकरी, ३० किलो बेसन, ठेचा, लोणचं असे अन्नदान होत आहे.



## कायदेशीर योगदानाबद्दल ॲड.उमेश मराठे यांचा सत्कार

**सोलापूर, दि.१९ जुलै-**

सोलापूरच्या विकासासाठी अडथळा ठरत असलेल्या बीटुच्या जाचक अटीपासुन मुक्तता मिळण्यासाठी दिलेल्या कायदेशीर बाबतीत योगदानाबद्दल ॲड.उमेश मराठे यांचा तीस हजारी लॉयर्स फोरमतर्फे ॲड.धनंजय माने, ॲड.भारत कट्टे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. याप्रसंगी ॲड.आय.बी. पाटील, ॲड.जयदीप माने, ॲड. अतुल कस्तुरे, ॲड.किरण गवळी, ॲड.प्रणित जाधव, ॲड.श्रीहरी कुरापाटी, इंटर्नी लॉयर सोहम खंडागळे, शेजल वैद्य, दत्ता देवकते, प्रविण वंगारी उपस्थित होते.

# समाजाच्या वेदनेची जाणीव हेच मानवतेचे प्रथम लक्षण

### संजय कुलकर्णी : डॉ हेडगेवार रक्तपेढीतर्फे रक्तदाता कृतज्ञता समारंभ

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १९ जुलै-**

समाजातील गरजूंच्या वेदनेची जाणीव असणे आणि त्यातून समाजाला उपयोगी अशा कार्याची अंमलबजावणी होणे हेच खरे मानवतेचे लक्षण आहे, असे प्रतिपादन कुटुंब प्रबोधन गतिविधि पश्चिम महाराष्ट्र प्रांताचे सहसंयोजक करिअर कौन्सिलर संजय कुलकर्णी यांनी केले. डॉ. हेडगेवार रक्तपेढी संस्था संचलित डॉ. हेडगेवार रक्त केंद्राचा ३६ वा वर्धापन दिन आणि रक्तदाता कृतज्ञता समारंभ रविवारी शिवस्मारक सभागृहात उत्साहात झाला. यावेळी संजय कुलकर्णी यांनी मार्गदर्शन केले.

प्रारंभी भारतमातेच्या तसेच राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे संस्थापक डॉ. केशव बळीराम हेडगेवार यांच्या प्रतिमांचे पूजन आणि दीपप्रज्वलन करण्यात आले. या कार्यक्रमास व्यासपीठावर प्रमुख पाहुणे वामसी लॅबचे मुख्य व्यवस्थापकीय संचालक केशव रेड्डी, डॉ. हेडगेवार रक्तपेढीचे अध्यक्ष विष्णुदास मालू, सचिव मिलिंद फडके, कोषाध्यक्ष सुहास जोशी उपस्थित होते.



#### डॉ. हेडगेवार रक्तपेढीकडून उच्चदर्जाची रुग्णसेवा

डॉ. हेडगेवार रक्तपेढी गेल्या ३५ वर्षांपासून सातत्याने रुग्णांना रक्ताची सेवा देत आहे. रक्तदान हे सर्वश्रेष्ठदान आहे. नवनवीन तंत्रज्ञानाचा वापर करून रुग्णसेवेच्या दर्जाम ध्ये वाढ करण्याचे डॉ. हेडगेवार रक्तपेढीचे कार्य कौतुकास्पद आहे, असे वामसी लॅबचे मुख्य व्यवस्थापकीय संचालक केशव रेड्डी यांनी यावेळी म्हणाले.

श्री. कुलकर्णी म्हणाले, दान हे निरपेक्ष हवे. देह, वाचा, चित्त दानात हवे. तरच दान केल्याची सफलता होते. असेच निरपेक्ष वृत्तीने रक्तदान करणारे हजारो रक्तदाते डॉ. हेडगेवार रक्तपेढीशी जोडले गेले आहेत. जगातील वस्तू, प्राणी आणि मनुष्याची निर्मितीच इतरांच्या उपयोगासाठी झालेली आहे. त्यामुळे प्रत्येकाने निरपेक्षपणे इतरांच्या उपयोगासाठी कार्य करावे असेही श्री. कुलकर्णी याप्रसंगी म्हणाले.

यावेळी दरवर्षी नियमितपणे मोठ्या प्रमाणावर रक्तदान करणाऱ्या संस्था, व्यक्ती, सामाजिक संघटनांचा डॉ. हेडगेवार रक्तपेढीतर्फे सन्मान करण्यात आला. या कार्यक्रमास डॉ. वैशंपायन स्मृती शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. ऋत्विक जयकर, डॉ. हेडगेवार रक्तपेढीचे संचालक शांतिनाथ बागेवाडी, महेंद्र कावरे, माधव देशपांडे, गिरीश दर्बी, अभिजीत टाकळीकर, निमंत्रित संचालक डॉ. भारत मुळे,संचालक डॉ किरण सारडा, राघवेंद्र मुजुमदार तसेच विजय जवळेकर, डॉ. मंजिरी धामणगावकर, डॉ. सुमेधा कंदलगावकर, डॉ. शाम गायकवाड आदी उपस्थित होते. डॉ. हेडगेवार रक्तपेढीचे अध्यक्ष विष्णुदास मालू यांनी प्रास्ताविक केले. व्यवस्थापक रंगनाथ जोशी यांनी सूत्रसंचालन तर सचिव मिलिंद फडके यांनी आभार प्रदर्शन केले.

## अमरावतीच्या ज्ञानेशकन्या संत गुलाबराव महाराज पालखीचे बार्शीत स्वागत



**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १९ जुलै-**

आषाढी एकादशीच्या पार्श्वभूमीवर मराठवाडा, विदर्भातून पंढरीच्या दिशेने पायी दिंड्यांचा प्रवास सुरु झाला आहे. गुरुवारी सकाळी अम रावती जिल्ह्यातील चांदूर बाजार येथून पंढरीकडे निघालेल्या ज्ञानेशकन्या श्री संत गुलाबराव म हाराज पालखीचे बार्शीत स्वागत करण्यात आले. येथील अलिपूर रोड येथील वायकुळे मळ्यात या पालखीत सहभागी वारकरी तसेच भक्तांसाठी महाप्रसादाचेही आयोजन करण्यात आले होते. परंपरेप्रमाणे ग्रामदैवत श्री भगवंताचे दर्शन घेऊन प्रज्ञाचक्षु संत गुलाब महाराज पालखी पंढरीकडे प्रयाण करते. चांदुर बाजार येथून निघालेली पालखी बार्शीत दाखल झाली. येथील स्व. बळीराम वायकुळे यांनी मागील ५० वर्षांपूर्वी पायी चालत जाणाऱ्या वारकऱ्यांना महाप्रसाद देण्याची परंपरा सुरु केली. आता हा सेवेचा वारसा निवृत्त तहसीलदार मदनराव वायकुळे , ज्येष्ठ नागरिक व त्यांच्या परिवाराने पुढे नेला आहे. अलिपूर रोडवरील वायकुळे मळ्यात असलेल्या श्रीकृष्ण मंदिरात यावर्षी पालखीचे स्वागत तसेच किर्तनाचा कार्यक्रम घेण्यात आला. यानंतर महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. शेकडो भाविक यावेळी उपस्थित होते, महिलांची संख्या मोठ्या प्रमाणात होती. यावेळी पालखीचे प्रमुख श्यामनारायणदास चौबे महाराज , संतोष महाराज निंबाळकर आदी उपस्थित होते. तसेच यावेळी निवृत्त तहसीलदार मदनराव वायकुळे, समीर वायकुळे , पंढरीनाथ पायघन, पोलीस हवालदार अमृत खेडकर, स्वर्णदीप वायकुळे, उमेश ठोंबरे, विमल वायकुळे, दीपाली माने, बळीराम सातपुते, नितीन देवकते, पुजारी पांडुरंग कुलकर्णी, राजेंद्र भंडारी, शशिकांत चव्हाण आदी उपस्थित होते.

## २२ व २३ जुलै रोजी चरणसेवा व आरोग्यसेवा शिबीर

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. १९ जुलै-**

आषाढी वारीनिमित्त श्री विठ्ठलाच्या दर्शनासाठी पायी पंढरपूरकडे जाणाऱ्या वारकऱ्यांसाठी मुख्यमंत्री सहायता कक्ष आणि काकासाहेब साळुंखे पाटील चॅरिटेबल ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने दि.२२ व २३ जुलै रोजी नक्षत्र मंगल कार्यालय, मेथवडे फाटा (ता.सांगोला) येथे चरणसेवा व आरोग्यसेवा शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या उपक्रमात वारकऱ्यांना आरोग्य तपासणी, औषधोपचार, चरणसेवा, अल्पोपहार व मुक्कामाची सुविधा उपलब्ध करून दिली जाणार असल्याची माहिती माजी आ.दिपकआबा साळुंखे पाटील यांनी दिली.

## अन्नछत्र मंडळाचे नाव कर्नाटक राज्यात आवर्जून घेतले जाते : लक्ष्मी पाटील

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. १९ जुलै-**

श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे जनमेजयराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली स्वामी भक्तांच्या सेवेर्थ न्यासाने विविध उपक्रम हाती घेतलेले असून, श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे नाव कार्यामुळे कर्नाटक राज्याच्या धार्मिक क्षेत्रात देखील आवर्जून घेतले जात असल्याचे मनोगत कल्याण कर्नाटक अभिरुद्धी प्राधिकर (के. डी.बी.)चे माजी अध्यक्ष दत्तात्रय गौडा-पाटील यांच्या सुविद्य पत्नी लक्ष्मी पाटील यांनी व्यक्त केले. त्या महिला मंडळासमवेत श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ येथे आले असता न्यासाचे कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे जनमेजयराजे



भोसले यांच्या हस्ते श्रींची मूर्ती, कृपावस्त्र, श्रीफळ देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी त्या बोलत होत्या. त्यांच्या समवेत शिवराज स्वामी, मल्लिनाथ करपे, प्रा.चंद्रकांत पाटील उपस्थित होते. याप्रसंगी न्यासचे उपाध्यक्ष अभय खोबरे, सचिव शामराव मोरे, विश्वस्त भाऊ कापसे, संतोष भोसले, मनोज निकम, सौरभ मोरे, बाळासाहेब कुलकर्णी, मैनुद्दीन कोरबू, अश्पाक काझी, सर्फराज शेख, प्रवीण देशमुख, अतिश पवार, ज्ञानेश्वर भोसले, मुख्य पुरोहित अप्पू पुजारी, बाळासाहेब पोळ, दत्ता मोरे, दत्ता माने, पिट्टू साठे, शुभम सावंत, शहाजी यादव, सतीश महिंद्रकर, लक्ष्मण बिराजदार, श्रीनिवास गवंडी, राजू पवार, रमेश हेगडे, तानाजी पाटील, प्रसाद हुल्ले, शरद भोसले, किरण साठे, असद फ ुलारी, अनिल बिराजदार, म ल्लिकार्जुन गवळी, संतोष माने, म हांतेश स्वामी, राहुल इंडे, विशाल घाटगे, धनंजय निंबाळकर, समर्थ चव्हाण, विठ्ठल रेड्डी उपस्थित होते.

## महिलेची फसवणूक; चौघांवर गुन्हा

**सोलापूर :** व्यवसायासाठी बँकेमधून पाच लाख रुपयाचे कर्ज काढायला लावून ते परत न करता एका महिलेची फसवणूक केल्याप्रकरणी चौघांविरुद्ध जोडभावी पेठ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. संजय मल्लिकार्जुन तुपसाखरे, विकी मल्लिकार्जुन तुपसाखरे, सोनाली अभिजीत राजकर, अभिजीत अरविंद राजकर अशी गुन्हा दाखल झालेल्यांची नावे आहेत. याबाबत रेखा रमेश सोनवणे (वय-४५, रा.राजस्व नगर) यांनी दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की, वरील आरोपीनी व्यवसाय सुरु करणार असल्याचे सांगून स्टेट बँक ऑफ इंडियाच्या बाळीवेस शाखेतून ५ लाख रुपयांचे कर्ज काढले. ते पैसे घेऊन परत न करता फसवणूक केली.

## विवाहितेचा छळ; ७ जणांवर गुन्हा

**सोलापूर :** तलाक देण्याच्या कारणावरुन एका विवाहितेचा शारीरिक व मानसिक छळ केल्याप्रकरणी पतीसह सासरच्या सहाजणांविरुद्ध जोडभावी पेठ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. पती वसीम हनीफ नाईकवाडी, सासरा हनीफ नाईकवाडी, सासू नसुरत नाईकवाडी, दीर मुश्ताक नाईकवाडी, जाऊ अर्शिया नाईकवाडी, नणंद बद्रुन नाईकवाडी (सर्वजण रा.नेहरु नगर, पिंपरी, पुणे) अशी गुन्हा दाखल झालेल्यांची नावे आहेत. याबाबत समिना वसीम नाईकवाडी (रा. पूर्व मंगळवार पेठ, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की, वसीम नाईकवाडी यांच्यासोबत सन २०२० मध्ये माझे लग्न झाले आहे. पती वसीम याने तू मला पसंत नाही, कुटुंबियांनी जबरदस्तीने तुझ्याशी लग्न लावून दिले आहे. त्यामुळे तू मला तलाक दे, असा तगादा लावत मारहाण केली.

## 'बैद्यनाथ'चे संस्थापक पं.रामनारायणजी शर्मा वैद्य यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ संस्कृत विद्वानांचा सन्मान



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१९ जुलै-**

कविकुलगुरु कालिदास संस्कृत विद्यापीठ-रामटेक यांच्या वतीने बैद्यनाथ समूहाचे संस्थापक वैद्य पंडित रामनारायणजी शर्मा यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ रामनारायण शर्मा आयुर्वेद रिसर्च फाउंडेशन, स्थानिक जिल्हा प्रशासन आणि महाराष्ट्र पर्यटन विकास म हामंडळ-नागपूर यांच्या सहकार्याने संस्कृत विद्वानांचा सन्मान करण्यात आला.

केकेएरायूचे संस्थापक कुलगुरु डॉ. पंकज चांदे याप्रसंगी बोलताना म्हणाले, संस्कृत विद्यापीठांनी परदेशी विद्यार्थ्यांसाठी इंग्रजी माध्यमातून अध्यापन सुरु करण्यात यावे. जेणेकरुन संस्कृतचा जागतिक स्तरावरील प्रसार अधिक प्रभावी होईल.

तत्कालीन जिल्हाधिकारी मनुकुमार श्रीवास्तव, बैद्यनाथचे डायरेक्टर सुरेशजी शर्मा यांच्या सहकार्य व आर्थिक सहाय्याने कविकुलगुरू कालिदास संस्कृत विद्यापीठाने महाकवी कालिदास संस्कृतव्रती राष्ट्रीय पुरस्काराची सुरुवात करण्यात आली, असे यावेळी सांगण्यात आले.

कुलगुरु डॉ.अतुल वैद्य यांनी संस्कृत विद्वानांना भारताची बौध्दिक संपत्ती संबोधत विद्यापीठाला जागतिक स्तरावर प्रतिष्ठित संस्था बनविण्याची वचनबध्दता व्यक्त केली. आयसीटी, मुंबईचे माजी कुलगुरु प्रो. गणपती यादव यांनी कालिदास दिनानिमित्त अशा विद्वानांच्या समूहाशी भेट होणे ही आनंदाची बाब असल्याचे सांगितले.

बैद्यनाथचे डायरेक्टर सुरेशजी शर्मा, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाचे वरिष्ठ प्रादेशिक व्यवस्थापक दिनेश पाटील, प्रो. हरेकृष्ण अगस्ती, कुलसचिव डॉ.रोशन अलोने आदींची प्रमुख उपस्थिती होती. प्रो. कविता होले यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. यावेळी पुरस्कार सोहळ्याचा सचित्र इतिहास दर्शविणाऱ्या कालिदसीयमधब या स्मरणिकेचे तसेच विद्यापीठाच्या ध्यैदर्भीषब या वृत्तपत्रिकेचे प्रकाशन करण्यात आले.

पुरस्कारांच्या प्रशस्तिपत्रांचे वाचन समारंभ समन्वयक डॉ.रेणुका बोकारे, प्रो. राधा देशकर, अथर्व भारद्वाज, डॉ.सिमरन ठाकूर यांनी केले. प्रो.चंद्रकिरण सलूजा, प्रो.सरोजा भाटे, प्रो.माधव देशपांडे यांना महाकवी कालिदास संस्कृतव्रती राष्ट्रीय पुरस्कार प्रदान करण्यात आला.

नंदकिशोर पट्टरकिने, प्रो.कालुरी हनुमंथा राव, प्रो.कृष्णकांत शर्मा, डॉ. रामकृष्ण पेजट्टाया, प्रो.वीरनारायण पांडुरंग, डॉ.सचिन कठाले यांचाही पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला.




**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तरुण भारत कार्यालय, श्री. मसलेकर निवास, जिल्हा न्यायालय पाठीमागे, समर्थ नगर, धाराशिव (उस्मानाबाद) ४१३५०१, कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. दूरध्वनी : ९७६७०९९७११ / ८८८८८४७२३९ ● मुख्य समुह संपादक : **दिलीप यशवंत पेठे.** ● मुख्य संपादक : **प्रशांत वसंतराव माने** (पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे) दैनिक सोलापूर तरुण भारत. RNI No. MAHMAR/2023/86468. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Websate:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही.

**Owned by, SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LTD. Printed by, Published by** DILIP SHIVMURTI DULANGE **Printed at** SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LT. 19,20 INDUSTRIAL ESTATE, HOTGI ROAD, SOLAPUR, Dist. SOLAPUR, 413003.**Publised at** TARUN BHARAT OFFICE Mr. Maslekar Residence, Behind District Court, Samarth Nagar, Dharashiv. PIN - 413501 |**RNI No. MAHMAR/2023/86468**
● **CHIEF GROUP EDITOR :** DILIP YASHWANT PETHE ● **CHIEF EDITOR :** PRASHANT VASANTRAO MANE

धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## तुळजापूरात १०० गरजू महिलांना साड्यांचे वाटप

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.१९ जुलै -**

केंद्रीय ऊर्जा राज्यमंत्री श्रीपाद नाईक यांनी शनिवारी (दि. १८) आई तुळजाभवानीचे दर्शन घेतल्यानंतर भाजप प्रदेश कार्यकारिणी सदस्य गुलचंद व्यवहारे यांच्या वतीने १०० गरजू महिलांना साड्यांचे वाटप केले.



यापूर्वी तुळजापूर शहरात श्रीपाद नाईक यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले.

साडी वाटप कार्यक्रमास माजी आमदार सुजितसिंह ठाकूर, भाजप जिल्हाध्यक्ष दत्ता कुलकर्णी, माजी जिल्हाध्यक्ष संताजी चालुक्य, अनिल काळे, शिवाजी बोधले, आनंद कंदले, गुलचंद व्यवहारे, बाळासाहेब भोसले, इंद्रजीत साळुंके, सागर पारडे, विकास मलबा, साहेबराव घुगे यांच्यासह भाजपचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## संक्षिप्त वृत्त...



### बळीराजाच्या सुख-समृद्धीसाठी अकरा गावांतील मारुती दिंडी

**लोहारा, दि.१९ जुलै -**

दरवर्षीप्रमाणे यंदाही लोहारा शहरातील हरिहर भजनी मंडळ व भाविकांनी तालुक्यातील अकरा गावांतील मारुती मंदिरांना भेट देत मारुतीरायाला पाणी अर्पण करून बळीराजाच्या सुख-समृद्धीसाठी प्रार्थना केली. दिंडीने मोघा खुर्द, मोघा बु., नागराळ, बेंडकाळ, मार्डी, कानेगाव, कास्ती बुद्रुक, मसलगा, नागूर, कास्ती खुर्द व लोहारा बुद्रुक येथील मारुती मंदिरांचे दर्शन घेतले. यावेळी शेतकऱ्यांच्या अखंड सुख, समाधान व चांगल्या पावसासाठी सामूहिक साकडे घालण्यात आले. दिंडीत भगवान गरड, हरी वाघे, नारायण माळी, बालाजी माळी, मोहन पाटील, सदाशिव बिराजदार, गणेश दुबे, श्रीकांत माळी, गजेंद्र माळी, दिगंबर क्षीरसागर, आकाश लामतुरे, आदिनाथ पाटील, रवी माळी, कार्तिक सातपुते, दिलीप सुरवसे, राजेंद्र स्वामी यांच्यासह अनेक भाविक व टाळकरी सहभागी झाले होते. दिंडीदरम्यान दादा माळी यांनी अल्पोपहाराची व्यवस्था केली, तर अविनाश माळी यांनीही अल्पोपहार दिला.



### उमरग्यात आई तुळजाभवानी मंदिराच्या जागेचे भूमिपूजन संपन्न

**उमरगा, दि.१९ जुलै -**

शहरातील कार्ले प्लॉट, डिग्गी रोड परिसरात उभारण्यात येणाऱ्या आई तुळजाभवानी देवी मंदिराच्या जागेचे भूमिपूजन नगराध्यक्ष किरण गायकवाड यांच्या हस्ते शुक्रवारी (दि. १७) सकाळी उत्साहात पार पडले. कार्ले प्लॉट परिसरातील नागरिकांच्या मंदिरासाठी जागेच्या मागणीला प्रतिसाद देत नगराध्यक्ष किरण गायकवाड यांनी वैयक्तिक मदतीतून जागा उपलब्ध करून दिली. ही जागा श्री तुळजाभवानी चॅरिटेबल ट्रस्टच्या नावाने खरेदी करण्यात आली असून त्यानंतर भूमिपूजनाचा सोहळा संपन्न झाला. यावेळी नगर परिषदेचे गटनेते पंढरीनाथ कोणे, नगरसेवक सचिन जाधव, शफी चौधरी, राहुल शिंदे, शरद पवार, सिद्धार्थ सोनकांबळे, शिवसेना तालुकाप्रमुख योगेश तपसाळे, युवा नेते रोहित पवार यांच्यासह परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### डॉ. विक्रमसिंह माने यांना 'प्रिन्सिपल ऑफ द इयर-२०२६' पुरस्कार

**धाराशिव, दि.१९ जुलै -**

तेरणा पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट संचलित तेरणा अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विक्रमसिंह माने यांना प्लस ९१ मीडिया व इंनोवेदा आयोजित 'एज्युकेशन कॉन्क्लेव्ह-२०२६' मध्ये 'प्रिन्सिपल ऑफ द इयर-२०२६' पुरस्काराने पुणे येथे गौरविण्यात आले. विद्यार्थी कौशल्य विकास, नाविन्यपूर्ण प्रकल्प, अद्ययावत तंत्रज्ञानावरील प्रशिक्षण, उद्योग-संस्था समन्वय आणि सामाजिक उपक्रम प्रभावीपणे राबविल्याबद्दल त्यांना हा सन्मान प्रदान करण्यात आला. त्यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी विविध तांत्रिक प्रकल्प साकारले असून संशोधन, प्लेसमेंट आणि कौशल्य विकास क्षेत्रातही त्यांनी उल्लेखनीय योगदान दिले आहे. या पुरस्काराबद्दल संस्थेचे अध्यक्ष डॉ. पद्मसिंह पाटील, विश्वस्त आमदार राणाजगजितसिंह पाटील, विश्वस्त मल्हार पाटील, व्यवस्थापकीय समन्वयक प्रा. गणेश भातलवंडे, विभागप्रमुख, प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थ्यांनी डॉ. माने यांचे अभिनंदन केले.



### सोनवणे यांची भाजप किसान मोर्चा जिल्हा उपाध्यक्षपदी नियुक्ती

**उमरगा, दि.१९ जुलै -**

भारतीय जनता पक्षाच्या संघटनात्मक विस्ताराच्या पार्श्वभूमीवर आ. बसवराज पाटील यांच्या शिफारशीवरून विजयकुमार सोनवणे यांची भाजप धाराशिव जिल्हा किसान मोर्चाच्या उपाध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली. नियुक्तीपत्र आ. सुजितसिंह ठाकूर, भाजप जिल्हाध्यक्ष दत्ताभाऊ कुलकर्णी, किसान मोर्चाचे जिल्हाध्यक्ष संतोष बोबडे व दिलीप भालेराव यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले. यावेळी पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि शेतकरी उपस्थित होते. नियुक्तीनंतर विजयकुमार सोनवणे यांनी पक्षाने दिलेली जबाबदारी निष्ठेने पार पाडण्याचा निर्धार व्यक्त करत केंद्र व राज्य शासनाच्या शेतकरी हिताच्या योजना तळागाळापर्यंत पोहोचविण्यासह शेतकऱ्यांच्या प्रश्नांसाठी प्रभावीपणे काम करण्याचे आश्वासन दिले. या नियुक्तीबद्दल भाजप पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच विविध क्षेत्रातील मान्यवरांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

# उधारीच्या वादातून धाबा मालकावर कथित जीवघेणा हल्ला

**'फुकट्या' दोन पोलीस हवालदारांवर नळदुर्ग पोलिसात गुन्हा दाखल...**

**तभा वृत्तसेवा**
**इटकळ, दि.१९ जुलै -**

तुळजापूर तालुक्यातील मौजे इटकळ येथील राष्ट्रीय महामार्गालगत असलेल्या शाही धाब्याचे मालक अशपाक इलाही मुजावर (वय ३८) यांच्यावर झालेल्या कथित जीवघेण्या हल्ल्याप्रकरणी नळदुर्ग पोलीस ठाण्यात दोन पोलीस हवालदारांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेमुळे इटकळसह परिसरात खळबळ उडाली असून निष्पक्ष चौकशीची मागणी होत आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, गुरुवार (दि. १६ जुलै २०२६) रोजी रात्री सुमारे १० वाजण्याच्या सुमारास अशपाक मुजावर हे आपल्या धाब्यावर बसले असताना



पोलीस हवालदार नागेश साळुंके व उमाकांत कोळेकर तेथे आले. काही दिवसांपूर्वी जेवण उधारीवर न दिल्याचा राग मनात धरून दोघांनी लोखंडी सळई व लोखंडी पाईपने अशपाक मुजावर यांच्यावर बेदम मारहाण केल्याचा आरोप फिर्यादीत करण्यात आला आहे.

या हल्ल्यात अशपाक मुजावर यांच्या डोक्याला व डोळ्याजवळ गंभीर दुखापत होऊन मोठ्या प्रमाणात रक्तस्राव झाला. तसेच छातीवरही गंभीर मार लागल्याने ते घटनास्थळीच बेशुद्ध पडले. त्यानंतर लियाकत खुदादे व दयानंद गायकवाड यांनी त्यांना तातडीने सोलापूर येथील मार्कंडेय रुग्णालयात दाखल केले. डॉक्टरांनी त्यांच्या डोक्यावर ११ टाके घातले असून सध्या त्यांच्यावर डॉ. पाटील व डॉ. देगावकर यांच्या देखरेखीखाली उपचार सुरू आहेत. या प्रकरणी शबाना अशपाक मुजावर यांनी दिलेल्या फिर्यादीवरून नळदुर्ग पोलीस ठाण्यात पोलीस हवालदार नागेश साळुंके व उमाकांत कोळेकर यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

घटनेत पोलीस कर्मचाऱ्यांची नावे समोर आल्याने इटकळ व परिसरात तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. या प्रकरणाची निष्पक्ष, सखोल व पारदर्शक चौकशी करून दोषींवर कठोर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे.

## तुळजापूरला सर्वोत्कृष्ट रक्तदान शिबिर आयोजनाचा प्रथम पुरस्कार

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.१९ जुलै -**

डॉ. हेडगेवार रक्तपेढी, सोलापूर यांच्या वतीने दिला जाणारा २०२५-२६ वर्षातील सर्वोत्कृष्ट रक्तदान शिबिर आयोजनाचा प्रथम पुरस्कार तुळजापूर शहराला प्राप्त झाला आहे. शहर व तालुक्यात वर्षभरात आयोजित करण्यात आलेल्या रक्तदान शिबिरांना मिळालेल्या उत्स्फूर्त प्रतिसादामुळे हा बहुमान मिळाला.

२०२५-२६ या वर्षात तुळजापूर शहर व तालुक्यात ७२ रक्तदान शिबिरांचे आयोजन करण्यात आले. या शिबिरांमधून १,५५९ रक्तदात्यांनी रक्तदान करून समाजाप्रती आपली बांधिलकी जपली. या यशामध्ये तुळजाभवानी मंदिर संस्थान, श्री मुदगुलेश्वर मंदिर समिती, युवास्पंदन सामाजिक संस्था, तुळजाई नागरी सहकारी पतसंस्था, विठाई हॉस्पिटल, अजिंक्य कोचिंग क्लासेस, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, रोटरी क्लब आणि आर्ट ऑफ लिव्हिंग या संस्थांचे विशेष योगदान राहिले.

डॉ. हेडगेवार रक्तपेढीच्या ३६ व्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात वामसी लॅब, सोलापूरचे मुख्य व्यवस्थापक केशव रेड्डी, कुटुंब प्रबोधन गतिविधी पश्चिम महाराष्ट्र प्रांताचे सहसंयोजक संजय कुलकर्णी, रक्तपेढीचे अध्यक्ष विष्णुदास मालु, उपाध्यक्ष डॉ. विजय शिवपुजे आणि सचिन मिलिंद फडके यांच्या हस्ते युवास्पंदन सामाजिक संस्थेचे अध्यक्ष तथा डॉ. हेडगेवार रक्तपेढीचे संचालक महेंद्र कावरे आणि ज्योतिबा जाधव यांचा मानचिन्ह देऊन सन्मान करण्यात आला.

युवास्पंदन सामाजिक संस्थेने १९९५ पासून सलग ३१ वर्षे दरवर्षी किमान दोन रक्तदान शिबिरांचे आयोजन करत रक्तदान चळवळ सातत्याने जोपासली आहे.

## केंद्रीय राज्यमंत्री श्रीपाद नाईक यांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.१९ जुलै -**

महाराष्ट्राची कुलस्वामिनी आई तुळजाभवानी मातेच्या दर्शनासाठी तुळजापूर येथे आलेले केंद्रीय ऊर्जा राज्यमंत्री श्रीपाद नाईक यांचा तुळजाभवानी रेल्वे संघर्ष समितीच्या वतीने हडको कॉलनी येथील गुलचंद व्यवहारे यांच्या निवासस्थानी स्वागत व सत्कार करण्यात आला.



यावेळी बबनराव गावडे, अंबादासराव पोपळे, अशोक साळुंखे, रत्नाकर खोले, गणेश जळके, मोहन भोसले, अनिल हंगरगेकर, गोविंद दिवटे यांच्यासह समितीच्या सदस्यांनी श्रीपाद नाईक यांना शाल, श्रीफळ व पुष्पहार देऊन सन्मानित केले.

या प्रसंगी भाजपचे ज्येष्ठ नेते तथा माजी आमदार सुरजितसिंह ठाकूर यांचाही समितीच्या वतीने सत्कार करण्यात आला. कार्यक्रमास भाजप जिल्हाध्यक्ष दत्ताभाऊ कुलकर्णी, संताजी चालुक्य, रामदास कोळगे, अनिल काळे, प्रा. संभाजी भोसले, प्रा. प्रदीप हंगरगेकर, इंद्रजीत साळुंके, साहेबराव घुगे आदी उपस्थित होते.

## परंडा नगरीत संत एकनाथ महाराजांच्या पालखीचे स्वागत





### वारकऱ्यांना पाणी व फळांचे वाटप

**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.१९ जुलै -**

आषाढी वारीनिमित्त पैठणहून पंढरपूरकडे प्रस्थान केलेली संत एकनाथ महाराजांची पालखी शनिवारी (दि. १८ जुलै) सायंकाळी परंडा शहरात मुक्कामासाठी दाखल झाली. टाळ-मृदुंगांच्या गजरात आणि ज्ञानबा-तुकारामच्या जयघोषात पालखीचे शहरात आगमन होताच भाविकांनी दर्शनासाठी मोठी गर्दी केली.

खासापुरी चौक ते भवानी चौक मार्गाने पालखीचे आगमन होताच परंडा नगरपरिषदेचे नगराध्यक्ष तथा शहराचे प्रथम नागरिक जाकिरभाई सौदागर, तहसीलदार काकडे, नगरपरिषद प्रशासन, पोलीस प्रशासन आणि विविध मान्यवरांच्या उपस्थितीत पालखीचे पुष्पहार अर्पण करून उत्स्फूर्त स्वागत करण्यात आले.

यावेळी नगराध्यक्ष जाकिरभाई सौदागर यांच्या वतीने हजारो वारकऱ्यांना पिण्याच्या पाण्याच्या बाटल्या आणि फळांचे वाटप करण्यात आले. वारकऱ्यांच्या सेवेसाठी करण्यात आलेल्या या उपक्रमाचे भाविकांनी कौतुक केले.

संत एकनाथ महाराजांची पालखी परंडा शहरात दाखल होताच दर्शनासाठी शहरातील नागरिकांनी चौकाचौकांत मोठी गर्दी केली होती. भक्तिमय वातावरणात संपूर्ण शहर विठ्ठलनामाच्या गजराने दुमदुमून गेले. परंपरेनुसार संत एकनाथ महाराजांची पालखी रात्री मुक्कामासाठी देशमुख यांच्या वाड्यावर विसावणार असून, रविवारी सकाळी पंढरपूरच्या दिशेने पुढील प्रवासाला मार्गस्थ होणार आहे.


वारी ही महाराष्ट्राच्या सांस्कृतिक परंपरेचे, सामाजिक ऐक्याचे आणि मानवतेच्या बंधुभावाचे प्रतीक मानली जाते. सर्व जाती-धर्म, पंथ आणि समाजघटकांना एकत्र आणणारा हा सोहळा वारकरी संप्रदायाच्या समतेच्या संदेशाची प्रचिती देत असल्याची भावना यावेळी अनेकांनी व्यक्त केली.

## कळंब तालुक्यात अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार; आरोपीविरुद्ध पोक्सोसह गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१९ जुलै -**

तालुक्यातील एका गावातील १६ वर्षे ६ महिने वयाच्या अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार करून जीवे मारण्याची धमकी दिल्याप्रकरणी एका तरुणाविरुद्ध कळंब पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मे २०२६ मध्ये आरोपीने अल्पवयीन मुलीला मोटारसायकलवर बसवून गावातील पिराच्या भिंतीच्या आडोशाला नेले. तेथे तिच्यावर लैंगिक अत्याचार केल्याचा आरोप आहे. तसेच, ही घटना कोणाला सांगितल्यास तिच्या आई-वडिलांना जीवे मारण्याची धमकी दिल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे.



या प्रकरणी पीडितेच्या आईने १८ जुलै २०२६ रोजी दिलेल्या फिर्यादीवरून आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आहे.

## नळदुर्ग नगरपालिकेचा अभिनव उपक्रम; प्रभागनिहाय 'जनता दरबार'ला प्रतिसाद

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.१९ जुलै -**

आमदार राणाजगजितसिंह पाटील यांच्या संकल्पनेतून नळदुर्ग नगरपालिकेने शहरातील प्रत्येक प्रभागात नागरिकांच्या समस्या त्यांच्या दारात जाऊन सोडविण्यासाठी 'जनता दरबार' या अभिनव उपक्रमाला सुरुवात केली आहे. नगरपालिकेच्या इतिहासात प्रथमच नगराध्यक्ष बसवराज धरणे यांच्या नेतृत्वाखाली हा उपक्रम राबविण्यात येत असून नागरिकांकडून त्याचे स्वागत करण्यात होत आहे.

या उपक्रमाची सुरुवात प्रभाग क्रमांक १ मधून करण्यात आली. वसंतनगर येथील श्री संत सेवालाल महाराज सभागृहात आयोजित जनता दरबारात नगराध्यक्ष बसवराज धरणे, उपनगराध्यक्ष नय्यर जहागीरदार, पाणीपुरवठा समितीचे सभापती तानाजी जाधव, बांधकाम समितीचे सभापती शशिकांत पुदाले, नगरसेवक निरंजन राठोड, नगरसेविका छमाबाई राठोड, माजी नगरसेवक किशोर नळदुर्गकर, बलदेव ठाकूर, शिवाजी सुरवसे, माजी नगराध्यक्षा झिमाबाई राठोड आदी उपस्थित होते.



जनता दरबाराला प्रभाग क्रमांक १ मधील नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. यावेळी एकूण ६७ तक्रारी नोंदविण्यात आल्या. त्यामध्ये 'लाडकी बहीण' योजनेचे लाभ बंद होणे, निराधार योजनेचे अनुदान थांबणे, स्वच्छता आणि दिवाबत्ती यासंदर्भातील तक्रारींचा समावेश होता.विशेष म्हणजे, नव्या पाणीपुरवठा योजनेमुळे परिसरात मुबलक आणि उच्च दाबाने पाणीपुरवठा होत असल्याने पाणीपुरवठ्याबाबत एकही तक्रार प्राप्त झाली नाही. याचे श्रेय पाणीपुरवठा समितीचे सभापती तानाजी जाधव यांना देण्यात आले. नगराध्यक्ष बसवराज धरणे यांनी सांगितले की, नगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील तक्रारींचे निराकरण सोमवारपासून सुरू करण्यात येणार आहे.

तर तहसील कार्यालयाशी संबंधित तक्रारींसाठीही संबंधित विभागाकडे पाठपुरावा करून त्या लवकरात लवकर सोडविण्याचा प्रयत्न केला जाईल.

नगरपालिका निवडणुकीपूर्वी प्रशासकीय स्तरावर जनता दरबार आयोजित करण्यात आला होता. मात्र, नगरपालिकेच्या वतीने प्रत्येक प्रभागात जाऊन नागरिकांच्या समस्या ऐकून त्यांचे निराकरण करण्याचा हा पहिलाच उपक्रम आहे.

यामुळे नागरिकांना आपल्या तक्रारी मांडण्यासाठी नगरपालिकेत जाण्याची गरज भासणार नसून, नगराध्यक्ष आणि संबंधित नगरसेवक थेट त्यांच्या प्रभागात जाऊन समस्या जाणून घेणार असल्याने या उपक्रमाचा नागरिकांना मोठा लाभ होणार आहे.

## जागतिक युवा कौशल्य दिन उत्साहात; युवकांनी कौशल्यविकासावर भर द्यावा : सुरवसे

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.१९ जुलै -**

जागतिक युवा कौशल्य दिनानिमित्त कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता विभागाच्या वतीने शहरातील मायक्रोकॉम कम्प्युटर एज्युकेशन येथे विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. यावेळी जिल्हा कौशल्य विकास अधिकारी रोहित सुरवसे यांनी युवकांनी केवळ पदवीवर न थांबता कौशल्य आत्मसात करून रोजगारक्षम तसेच उद्योजक बनण्याचे आवाहन केले.



कार्यक्रमास कौशल्य समन्वयक विद्या नाडे, जिल्हा समन्वयक समित सुरवसे, बाबासाहेब शेटे आणि मायक्रोकॉम कम्प्युटर एज्युकेशनचे संचालक प्रा. युसुफ मुल्ला यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी कौशल्य प्रशिक्षण पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी सुमय्या जमादार, मोनिका जाधव, रमेजा मोमीन, रेवती वाडीकर, दिव्या सूर्यवंशी, कल्पश्री सूर्यवंशी आणि इरफान मुल्ला यांनी परिश्रम घेतले.

## लिपिकपदी बढती; राधा जायभाय यांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.१९ जुलै -**

पंचायत समिती तुळजापूर येथे परिचारक पदावर कार्यरत असलेल्या राधा राजकुमार जायभाय यांना लिपिक पदावर बढती मिळून जिल्हा परिषद धाराशिव येथे बदली झाल्याबद्दल प्रतीक्षा नगर येथील नागरिक व महिला वर्गाच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला.

प्रतीक्षा नगर येथील ओपन स्पेसमध्ये आयोजित कार्यक्रमात स्वाती बागल, गीतांजली जाधव आणि पुनम लाटे यांच्या हस्ते पुष्पगुच्छ देऊन त्यांचा गौरव करण्यात आला. यावेळी इंदु राठोड, ज्योती चौधरी, उल्फा मोटे, विद्यासागर लोखंडे, भाऊसाहेब गीते, गजानन कांबळे, तुकाराम मोटे, राजकुमार जायभाय यांच्यासह प्रतीक्षा नगरातील नागरिक उपस्थित होते.

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, परंडा**
**बार्शी रोड परंडा - पिनकोड ४१३ ५०२**
दूरध्वनी क्रमांक (०२४७७) २३२०२४ Email ID-tahparandagmail.com

जा.क्र२०२५/महसूल/जन्म-मृत्यु नोंद/क्रमांक- दि. १५/०७/२०२६

**जाहिरनामा**

ज्याअर्थी अर्जदार **प्रभाकर परशुराम वाघमारे रा. बावची ता. परंडा जि. धाराशिव** यांचा मुलगा नामे **निखिल प्रभाकर वाघमारे** याची **जन्म दिनांक** ०३/०५/२००५ रोजी मौ. **बावची** तालुका. परंडा जि. धाराशिव येथे झालेला असून, त्याबाबतची नोंद ग्रामपंचायत कार्यालय बावची ता. परंडा जि. धाराशिव येथे नसल्याने अर्जदार यांनी या कार्यालयात अर्ज करून स्वतः च्या जन्माची नोंद अभिलेखामध्ये घेणे करीता आदेशीत करण्याबाबत विनंती अर्ज केलेला आहे.

सदरहू अर्जदार प्रभाकर परशुराम वाघमारे रा. बावची ता. परंडा जि. धाराशिव यांचा मुलगा नामे **निखिल प्रभाकर वाघमारे** यांच्या जन्म दिनांक/जन्म स्थळाच्या नोंदीबाबत कोणाचा आक्षेप असल्यास या जाहीरनाम्याच्या तारखेपासून पंधरा दिवसाच्या आत या कार्यालयात हजर होऊन आपली हरकत लेखी स्वरूपात कळविण्यात यावी असे या जाहीरनाम्याद्वारे कळविण्यात येते, विहित मुदतीत हरकत प्राप्त न झाल्यास अर्जदाराचे अर्जात मागणी केलेनुसार पुरावा घेऊन आदेश पारित करण्यात येईल.

**दिनांक / /२०२६ रोजी माझेसही व शिक्यानिशी दिले असे.**

**स्वाक्षरित/-**
**कार्यकारी दंडाधिकारी,**
**परंडा**

## संक्षिप्त...

### स्वभावाला बदलण्याची ताकत आध्यात्मात आहे ब्र.कु. महानंदा बहनजी

तभा वृत्तसेवा

उदगीर दि. १९ जुलै : स्वभावाला बदलण्याची ताकत आध्यात्मात आहे असे बहुमोल विचार ब्र.कु. महानंदा बहनजी यांनी व्यक्त केले.

एस.टी.कॉलनी नळेगाव रोड मलकापुर येथील नव्यानेच उभारण्यात आलेल्या विघ्नेश्र्वर गणेश मंदिर, केदारेश्र्वर शिवालय मंदिर येथे मुर्ती प्राण प्रतिष्ठापणा व कलशारोहन सोहळ्यानिमित्य आयोजित शिववलिला ग्रंथाचे पारायण प्रसंगी ब्र..कु.ईश्र्वरिय विश्र्व विद्यालय उदगीर केंद्राच्या संचालिका ब्र.कु.महानंददा बहनजी यांनी प्रवचनात व्यक्त केले.

प्रवचनात अपले विचार व्यक्त करताना बहनजी म्हणाल्या की,बुध्दी जिवी प्राणी फक्त मणूष्य आहे परंतू मनूष्यात श्रेष्ठ कर्म करण्याची ताकत कमी झाली आहे. विचार बुरसटलेले आहेत त्यामुळे मनुष्य दु:खी होतो. संस्कारीत बनण्यासाठी ज्ञानाची गरज असुन ज्ञानात मनूष्याला बदलण्याची ताकद आहे परंतू बदलून घ्याची ईच्छा असली पाहिजे ,स्वभावाला बदलण्याची ताकत आध्यात्मात आहे, ईश्र्वराला मानण्याबरोबर ईश्र्वराने दिले विचाराचे अनुकरण करणे महत्वाचे आहे. विचार करण्याची पध्दतीवर आपले सुख दु:ख अवलंबून आहे आपले विचारच माणसाला सुख आणी दु:ख देते म्हणून विचार सकारात्मक ठेवा,विविध ग्रथाचे वाचन करा, चिंतन करा चिंतनानाने मनाला श्रेष्ठ विचाराची ताकद मिळते असे सांगून जिवनात ईश्र्वर चितनाचा सप्ताह सतत ठेवा अपेक्षा कमी ठेवा आनंदी जीवन जगा स्वत:आनंदी रहा व दुसर्याला आनंद द्या असे बहुमोल विचार ब्र.कु.महानंदा बहन यांनी व्यक्त केले.

या प्रसंगी विचार पीठावर ब्र.कु. मिराबहन ,शि.भ.प. उध्दव महाराज हैबतपुरे उपसस्थित होते. शिवलिला मृत ग्रंथाचे पारायणास दोनशे महिला भाविकांनी सहभाग नोंदवला आहे.महाआरती होऊन कर्यक्रमाची सांगता झाली.

# निळकंठेश्वर साखर कारखान्याच्या विशेष सर्वसाधारण सभेत विकास प्रकल्पांना मंजुरी



तभा वृत्तसेवा

औसा दि. १९ जुलै : दररोज ६० हजार लिटर क्षमतेचा डिस्टिलरी प्रकल्प, दररोज ५ टन क्षमतेचा संपीडित जैववायू (सीबीजी) प्रकल्प, ३० टन क्षमतेचा सेंद्रिय खत व पोटॅश निर्मिती प्रकल्प, तसेच २० मेगावॅट क्षमतेचा सौर ऊर्जा प्रकल्प उभारणी-मालकी-संचालन-हस्तांतरण तत्त्वावर उभारण्याच्या ठरावास औसा तालुक्यातील किल्लारी येथील निळकंठेश्वर साखर कारखान्याच्या सभासदांनी एकमताने मंजुरी दिली.

औसा तालुक्यातील किल्लारी येथील निळकंठेश्वर साखर कारखान्याची विशेष सर्वसाधारण सभा शुक्रवार दि.१७ रोजी झाली.यावेळी आ. अभिमन्यू पवार यांनी शेतकरी सभासदांनी संवाद साधला त्यावेळी प्रवीण फडणवीस,शेखर सोनवणे, संतोष बेंबडे,सुभाष जाधव, रमेश माने,प्रकाश पाटील,राम पाटील, गोविंद भोसले यांची प्रमुख उपस्थिती होती.

या प्रकल्पांमुळे कारखान्याची आर्थिक क्षमता अधिक भक्कम होण्यास मदत होणार असून, शेतकरी सभासदांच्या हिताला चालना मिळणार आहे.याचबरोबर कारखान्याच्या सर्वांगीण व दीर्घकालीन विकासाला बळ मिळेल, असा विश्र्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

या विशेष सर्वसाधारण सभेत कारखान्याची प्रगती, शेतकरी सभासदांच्या हिताचे निर्णय आणि आगामी वाटचालीबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. सभासदांनी मांडलेल्या सूचना, अपेक्षा आणि विविध विषयांवरील मते जाणून घेत आमदार अभिमन्यू पवार यांनी संवाद साधला. यावेळी बोलताना आमदार अभिमन्यू पवार म्हणाले की, अनेक वर्षे बंद असलेला निळकंठेश्वर साखर कारखाना केंद्र व राज्य सरकारच्या सहकार्यामुळे पुन्हा सुरू करण्यात यश आले आहे. सध्या कारखाना पूर्ण क्षमतेने कार्यरत असून ऊस उत्पादक शेतकऱ्यांना त्यांच्या हक्काचा कारखाना पुन्हा उपलब्ध झाला आहे. गत गाळप हंगाम यशस्वीपणे पूर्ण झाल्याने कारखान्याला पुन्हा गतवैभव प्राप्त होत असल्याचे आ.पवार यांनी सांगितले. कारखान्याच्या पुनरुज्जीवनामुळे किल्लारी परिसरातील व्यापारी, लघुउद्योजक आणि इतर पूरक व्यवसायांना चालना मिळाली आहे .तर स्थानिक पातळीवर रोजगारनिर्मितीलाही गती मिळाल्याचे आ.पवार यांनी स्पष्ट केले. आगामी काळातही कारखान्याचा सर्वांगीण विकास आणि शेतकरी सभासदांचे हिताला प्राधान्य देण्यात येणार असल्याचे त्यांनी यावेळी स्पष्ट केले.

## मोटारीच्या वायरच्या चोरी प्रकरणी दोघांविरुद्ध चाकूर पोलिसांत तक्रार दाखल

तभा वृत्तसेवा

चाकूर दि. १९ जुलै : चाकूर तालुक्यातील आनंदवाडी शिवारातील शेतकऱ्याच्या शेतातील मोटारची विद्युत वायर चोरी केल्याप्रकरणी दोन जणांविरुद्ध चाकूर पोलीस ठाण्यात अदखलपात्र गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आनंदवाडी येथील विष्णुदास प्रल्हाद पासमे वय ५८ वर्षे, व्यवसाय-शेती यांनी चाकूर पोलीस ठाण्यात शेतातील विद्युत वायर चोरी गेल्याची तक्रार दिली.सविस्तर माहिती अशी की,ता.१८ जुलै २०२६ रोजी दुपारी सुमारे एक वाजण्याच्या सुमारास शेतातील मोटार बंद पडल्याने विष्णूदास पासमे तळ्यावर मोटार सुरू करण्यासाठी गेले असता, आनंदवाडी गावातीलच नारायण निवृत्ती पस्तापूरे व महादू बाबुराव चिटलेवाड हे दोघे मोटारीची विद्युत वायर घेऊन जात असल्याचे दिसले असल्याचा आरोप करण्यात आला आहे..

त्यानंतर विष्णूदास यांनी मोटार सुरू करण्याचा प्रयत्न केला असता ती सुरू झाली नाही.तेंव्हा इकडे तिकडे पाहीले असता मोटारीची वायर कापून नेल्याचे निदर्शनास आले.त्यामुळे विष्णूदास यांनी विद्युत वायर चोरी गेल्याचे लक्षात आले.चोरी गेलेल्या वायरची किंमत अंदाजे ४,००० रूपये असल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे.

सदरील प्रकरणी चाकूर पोलीस ठाण्यात एनसीआर क्रमांक ०७५८/२०२६ नोंदविण्यात आला असून भारतीय न्याय संहिता (इछड) कलम ३०३(२) व ३(५) अंतर्गत अदखलपात्र गुन्ह्याची नोंद करण्यात आली आहे.पोलिसांनी फिर्यादीला पुढील कायदेशीर कार्यवाहीसाठी संबंधित न्यायालयात दाद मागण्याचा सल्ला दिला आहे.

## पावसासाठी ग्रामदैवतांना साकडे

### आचवला येथे दिंडी, जलाभिषेक अन् सामुदायिक महाप्रसाद



तभा वृत्तसेवा

देवणी दि. १९ जुलै : खरीप हंगामातील पेरणीनंतरही पावसाने पाठ फिरवल्याने आचवला (ता. देवणी) परिसरातील शेतकरी चिंतेत सापडले आहेत. पेरणीनंतर एकदाही समाधानकारक पाऊस न झाल्याने पिके करपू लागली असून दुबार पेरणीचे संकट ओढवण्याची भीती निर्माण झाली आहे. या पार्श्र्वभूमीवर ग्रामदैवतांनी पावसाची कृपा करावी, या श्रद्धेतून शनिवारी (दि. १८ जुलै) आचवला येथील समस्त ग्रामस्थांनी पारंपरिक 'पुर' साजरा करत ग्रामदैवतांना साकडे घातले.

पहाटेपासूनच गावात धार्मिक वातावरण निर्माण झाले होते. टाळ, मृदंग आणि वीणेच्या गजरात गावातून भव्य दिंडी काढण्यात आली. गावातील विविध मंदिरांमध्ये जाऊन ग्रामदैवतांचा जलाभिषेक करण्यात आला. प्रत्येक देवतेला पाणी अर्पण करून वेळेवर आणि भरपूर पाऊस पडावा, अशी सामूहिक प्रार्थना करण्यात आली.

या दिंडीत तरुण शेतकऱ्यांसह ज्येष्ठ नागरिक, महिला आणि लहान मुलांनीही मोठ्या उत्साहाने सहभाग घेतला. अनेकांच्या हातात घागर, कळशी व पाण्याची भांडी होती. श्रद्धा आणि एकोप्याचे दर्शन घडविणाऱ्या या उपक्रमात महिलांची उपस्थिती विशेष लक्षवेधी ठरली. संपूर्ण गाव एकत्र येऊन पावसासाठी प्रार्थना करत असल्याचे भावनिक चित्र या निमित्ताने पाहायला मिळाले.

यंदा वेळेवर पेरणी झाल्यानंतर पावसाने मोठा खंड दिल्यामुळे उगवलेली पिके धोक्यात आली आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांच्या मनात दुबार पेरणीची भीती वाढली असून आर्थिक संकटही गडद होत आहे. अशा कठीण परिस्थितीत निसर्गाने साथ द्यावी आणि लवकर चांगला पाऊस व्हावा, या आशेने ग्रामस्थांनी हा पारंपरिक धार्मिक विधी पार पाडला.

या कार्यक्रमासाठी ज्ञानेश्र्वर कारभारी, तानाजी शिंदे, मधुकर लखन गावे, ज्ञानोबा बेद्रे, यादव बिरादार यांच्यासह ग्रामस्थांनी पुढाकार घेतला. कार्यक्रमाचे नियोजन व समन्वय श्रीरंग सूर्यवंशी यांनी पाहिले.

जलाभिषेक आणि धार्मिक कार्यक्रमानंतर संपूर्ण गावासाठी सामुदायिक महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले. खीर, भात आणि कडीचा प्रसाद सर्व ग्रामस्थांनी एकत्र बसून ग्रहण केला. सामाजिक ऐक्य, परंपरा आणि श्रद्धेचे दर्शन घडविणारा हा उपक्रम ग्रामस्थांसाठी प्रेरणादायी ठरला.

## महसूल अधिकारी, कर्मचारी निवासस्थानांचे आज भूमिपूजन



तभा वृत्तसेवा

अहमदपूर दि. १९ जुलै : अहमदपूर येथील लातूर ते नांदेड या राष्ट्रीय महामार्गावर मरशिवणी रस्त्यावरील शासकीय वसतिगृहाजवळ महसूल विभागातील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांसाठी आधुनिक व सुसज्ज अशा नवीन निवासस्थानांचे बांधकाम करण्यात येणार आहे. या प्रस्तावित इमारतीचे भूमिपूजन सोमवार, २० जुलै २०२६ रोजी सकाळी ११ वाजता राज्याचे सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांच्या हस्ते होणार आहे.

या कार्यक्रमास लोकप्रतिनिधी, वरिष्ठ शासकीय अधिकारी व विविध संस्थांचे पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत. महसूल विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांची निवासस्थानाची अडचण दूर करण्यासाठी शासनाने सुमारे १५ कोटी रुपयांचा निधी मंजूर केला आहे.

या निधीतून वर्ग-४ च्या कर्मचाऱ्यांसाठी ८ निवासस्थाने, वर्ग -३ च्या कर्मचाऱ्यांसाठी ८ निवासस्थाने, वर्ग -२ च्या अधिकाऱ्यांसाठी २ निवासस्थाने आणि वर्ग -१ च्या वरिष्ठ अधिकाऱ्यांसाठी २ निवासस्थाने अशी एकूण २० हून अधिक घरे बांधली जाणार आहेत.

## जे नसे शेतकऱ्यांच्या ललाटी ते करतात तलाठी

### भ्रष्टाचारी तलाठी, मंडळ अधिकारी यांच्या विरोधात जन आक्रोश मोर्चाचे आयोजन

तभा वृत्तसेवा

शिरूर अनंतपाळ दि. १९ जुलै : शासकीय सेवेत कर्मचारी तलाठी व मंडळ अधिकारी कर्तव्य बजावत असताना नियमाचे पायमल्ली करुन निर्णय घेत आहेत. त्याच बरोबर दाखल केलेल्या प्रस्तावावर वेळ काढून प्रत्यक्षपणे पाहणी करीत नाहीत व अप्रत्यक्षपणे पैसे मागणी करुन तसेच पैसे कमावण्याच्या हेतूने तलाठी नियमबाह्य कामकाज करीत असल्यामुळे शेतक-याचे हाल आणि न भरुन येणारे नुकसान होत आहे. एका तलाठयाची चुक शेतक-याला -सुधारण्यासाठी बारा वर्ष लागतात जे नसे शेतक-याच्या ललाठी ते करतात तलाठी या म्हणी प्रमाणेच सध्या शिरुर अनंतपाळ तलाठ्यांचा कारभार आहे. तालुक्यातील तलाठ्यांच्या चुकीच्या निर्णयामुळे अनेक शेतक-यांना अत्महत्या करण्याची वेळ आली आहे.

त्याचेच एक उदाहरण म्हणजे शिरूर अनंतपाळ येथील अमर (राहुल)संजय येंजने या शेतकऱ्या संदर्भात काही दिवसांपूर्वी आर. एस.पाटील या तलाठ्याने पिडीत शेतकऱ्यांची जमीन परस्पर दुसऱ्याच्या नावावर ओढल्यामुळे शेतकऱ्याने महसूल मंत्री महाराष्ट्र राज्य, जिल्हा अधिकारी , तहसीलदार, यांच्या कडे लेखी तक्रार दाखल केली होती. त्यांच्या तपासाअंती संबंधित तलाठी दोषी आढळल्याने तहसीलदारांनी त्यांचा तात्काळ पदभार काढून घेतला, परंतु पिडीत शेतकऱ्याला वाटते की,ही शिक्षा अपुरी आहे. त्यासाठी या भ्रष्ट तलाठ्याला सेवेतून कायमस्वरूपी बडतर्फ करावे असे शेतकरी अमर (राहुल)येंजने यांचे म्हणणे आहे. तहसीलदार शिरूर अनंतपाळ यांना सादर केलेल्या निवेदनात संबंधित तलाठी व मंडळ अधिकारी यांच्यावर नियमबाह्य पद्धतीने कारभार केल्याचा आरोप करण्यात आला आहे.

जमिनी संदर्भातील प्रस्तावावर वेळेत निर्णय न घेणे, प्रत्यक्ष पाहणे टाळणे, कामासाठी वारंवार हेलपाटे मारायला लावणे तसेच पैशाची मागणी करून शेतकऱ्याचे आर्थिक पिळवणूक केलाचा दावा निवेदनात केला आहे. शेतकऱ्याच्या म्हणण्यानुसार महसूल विभागातील चुकीच्या निर्णयाचा परिणाम थेट शेती व शेतकऱ्यांच्या उपजवीकेवर होत आहे. साधी दुरुस्ती किंवा नोंद बदलण्यासाठी वर्षानुवर्ष हेलपाटे मारावे लागते आहे.

> जमीन हा शेतकऱ्यांचा जिव आहे अशा प्रकारे परस्पर फेर फार करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई नाही झाली तर सर्व सामान्य शेतकऱ्यांचा महसूल यंत्रनेवरचा विश्वास उडेल
> रयत क्रांती संघटना मराठवाडा अध्यक्ष
> (शिवाजीराव पेठे)

प्रशासनाच्या निष्क्रियतेमुळे शेतकरी अक्षरशा हवालदील झाले आहेत. कामे करून घ्यायचे असतील तर पैसे मोजा नाहीतर वर्षांनुवर्षे कार्यालयात खेटे मारा अशी संतप्त भावना शेतकऱ्यांमधून ऐकायला मिळत आहे. या पार्श्र्वभूमीवर संबंधित अधिकाऱ्यांच्या गैरकारभाराची सखोल चौकशी करून दोशीवर कठोर प्रशासकीय कारवाई करण्यात यावी अन्यथा आंदोलनाची तीव्रता वाढवण्यात येईल असा इशाराही निवेदनात देण्यात आला आहे.यासाठी ३ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी ११ वाजता महात्मा बसवेश्वर चौक शिरूर अनंतपाळ येथुन तहसील कार्यालयापर्यंत भव्य जन आक्रोश मोर्चा काढण्यात येणार असल्याचे निवेदनात नमूद केले आहे.

या मोर्चात विविध शेतकरी संघटनेचे नेते, विविध पक्षांचे कार्यकर्ते तसेच मोठ्या संख्येने शेतकरी उपस्थित राहणार असल्याचे दिसून येते आहे.

# 'कोचिंग क्लासेस टिचर फेडरेशन'च्या राज्य उपाध्यक्षपदी प्रा.डॉ. शादूल पठाण



तभा वृत्तसेवा

अहमदपूर दि. १९ जुलै : 'कोचिंग क्लासेस टिचर फेडरेशन न्ड सोशल फोरम ऑफ महाराष्ट्र' या राज्यस्तरीय संघटनेच्या राज्य उपाध्यक्ष पदी प्रा. डॉ. शादुल पठाण यांची नुकतीच निवड करण्यात आली. त्यांच्या या नियुक्तीबद्दल अहमदपूरमधील कोचिंग क्लासेस संचालक बांधवांच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे त्यांचा सत्कार करण्यात आला.

प्रा. डॉ. शादुल पठाण यांच्या निवडीने अहमदपूरच्या शैक्षणिक क्षेत्रात आनंदाचे वातावरण आहे. या सत्कार समारंभाप्रसंगी अहमदपूरमधील विविध कोचिंग क्लासेसचे संचालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. येथील कोचिंग क्लास फोरम च्या वतीने पुष्पगुच्छ देऊन आणि सन्मानचिन्ह देऊन डॉ. पठाण यांना सन्मानित करण्यात आले.

अहमदपूरचे उपविभागीय पोलीस अधिकारी अरविंद रायबोले यांनी या नियुक्तीची दाखल घेत प्रा. डॉ. शादुल पठाण यांचे अभिनंदन करून सत्कार केला . एका शिक्षकाची राज्यस्तरीय पदावर झालेली निवड ही अहमदपूरकरांना अभिमान असल्याचे त्यांनी सांगितले.

आपल्या सत्काराला उत्तर देताना प्रा. डॉ. शादुल पठाण म्हणाले की, राज्य स्तरावर मिळालेली ही जबाबदारी मी निष्ठेने पार पाडणार आहे. अहमदपूरच्या सर्व संचालक बांधवांनी जो विश्र्वास दाखवला त्याबद्दल मी सर्वांचा मनपूर्वक ऋणी आहे. आपल्या सर्वांच्या सहकार्याने कोचिंग क्लास शिक्षकांच्या समस्या सोडवण्यासाठी आणि शैक्षणिक दर्जा उंचावण्यासाठी मी कटिबद्ध राहीन. आणि अहमदपूर च्या शैक्षणिक पॅटर्न मी प्रमुख साक्षीदार आहे शैक्षणिक परिवर्तन घडवून पुन्हा एकदा अहमदपूर चे नाव शिक्षण क्षेत्रात सुवर्ण अक्षरांनी कोरले जावे या साठी प्रामाणिक प्रयत्न करणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

## डॉ.कदम,जाधव संपादित पुस्तकाचा संदर्भग्रंथ म्हणून विद्यापीठाच्या अभ्यासक्रमात समावेश

तभा वृत्तसेवा

उदगीर दि.१९जुलै: छत्रपती शिवाजीराजे महाविद्यालयातील साहित्यिक,शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रामध्ये कार्यरत असणारे,तसेच मराठी विश्र्वकोश निर्मिती मंडळ महाराष्ट्र राज्य मुंबईचे सदस्य डॉ.नरसिंग कदम आणि सहसंपादक प्रा.अजित जाधव यांनी संपादित केलेला महानुभाव संप्रदाय स्वरूप आणि विशेष या पुस्तकाचा डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजीनगर या विद्यापीठाच्या बी.ए. तृतीय वर्षाच्या अभ्यासक्रमात संदर्भग्रंथ म्हणून समावेश करण्यात आलेला आहे. तशा निवडीची माहिती त्यांना मराठी अभ्यास मंडळाचे अध्यक्ष डॉ.सर्जेराव जिगे यांनी दिली. अभ्यास मंडळाच्या सर्व सदस्यांनी अध्यक्षाच्या मार्गदर्शनाखाली ही निवड केलेली आहे. यापूर्वी प्रा.डॉ.नरसिंग कदम यांच्या महात्मा फुले : साहित्य आणि विचार, महात्मा फुलेंचे कार्य : शोध आणि बोध या दोन संपादित पुस्तकांचा उस्मानिया विद्यापीठ हैदराबाद या विद्यापीठाच्या एम.ए.च्या अभ्यासक्रमात संदर्भ ग्रंथ म्हणून समावेश झालेला आहे.त्यांचे अनेक राज्यस्तरीय, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय नियतकालिकामध्ये ७० पेक्षा जास्त शोधनिबंध प्रकाशित झालेले आहेत. विविध वर्तमानपत्रातून त्यांचे ६० पेक्षा जास्त लेख प्रकाशित झालेले आहेत. पीएचडीचे ते संशोधन मार्गदर्शक आहेत. विविध समित्यावर ते कार्य करत आहेत.तर प्रा.अजित पुंडलिकराव जाधव स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या बहि:शाल शिक्षण केंद्राचे व्याख्याते आहेत. सामाजिक चळवळीच्या माध्यमातून महाराष्ट्रभर विविध विषयावर प्रबोधन केले. त्यांचे संतांचा खरा इतिहास, सत्यशोधकी आणि ग्रामीण साहित्य ही पुस्तके आहेत. विविध विषयांवर ३५ पेक्षा जास्त शोध निबंध प्रकाशित झाले.राज्यस्तरीय उत्कृष्ट शिक्षक पुरस्कार व रोटरी क्लब ऑफ इंटरनॅशनल यांच्या वतीने देशाचे शिल्पकार या पुरस्काराने ते सन्मानित आहेत.

## लेबर कॉलनी परिसरात धूर फवारणीची मागणी



तभा वृत्तसेवा

लातूर दि. १९ जुलै : शहरातील लेबर कॉलनी परिसरात डासांचा प्रादुर्भाव वाढला आहे. पाऊस पडत नसल्याने गटारी तुंबल्या आहेत.

रिमझिम पावसामुळे काही ठिकाणी पाण्याचे डबके साचले आहेत. या डबक्यांत डोसोत्पत्ती मोठ्या प्रमाणात होत आहे. डासांसोबतच माशांचाही प्रादुर्भाव वाढला आहे.

त्यामुळे लेबर कॉलनी परिसरात धुर फवारणी करावी, उघड्यावर पडलेला कचरा उचलावा, घंटागाडी नियमित येईल, अशी व्यवस्था करावी, आदी मागण्या स्थानिक नागरिकांनी केल्या आहेत.

**टी. सी. हरवली आहे**

बापूराव अशोकराव भोसले या नावाची टि.सी. हरवली आहे. लातूर येथून चाकूर कडे दि. ११ एप्रिल २०२६ रोजी सकाळी १० वाजता बसने लातूर येथून चाकूर कडे प्रवास करीत असताना शाहू विद्यालय, शेळगावची बापूराव अशोकराव भोसले या नावाची दहावी पासची टि. सी. व इतर शैक्षणिक साहित्य हरवले आहेत.

टि. सी. व कागदपत्रे सापडल्यास खालील मोबाईल नंबर वर संपर्क साधावे.

बापूराव अशोकराव भोसले मु. पोस्ट. शेळगाव
ता.चाकूर जि.लातूर
मो. ८७८८०३३६००

# बिझनेस लोन चे आमिष दाखवून पाच सिम कार्ड च्या माध्यमातून फसवणूक

### पोर्टल वरील तक्रारीच्या आधारे १२ नागरिकांची ४.५० लाखांची ऑनलाइन फसवणूक करणाऱ्या आरोपी विरुद्ध शिरूर अनंतपाळ पोलिसात गुन्हा दाखल

तभा वृत्तसेवा

शिरूर अनंतपाळ दि. १९ जुलै : सायबर गुन्हेगारांकडून विविध प्रकारचे आमिष दाखवून नागरिकांची आर्थिक फसवणूक करण्याच्या घटना दिवसेंदिवस वाढत आहेत, या पार्श्र्वभूमीवर लातूर जिल्हा पोलीस सायबर गुन्ह्यांवर प्रभावी नियंत्रण ठेवण्यासाठी सातत्याने कार्यरत असून, विविध ऑनलाइन पोर्टलवर प्राप्त होणाऱ्या तक्रारींचा नियमित आढावा घेत संबंधितांवर तात्काळ कायदेशीर कारवाई करण्यात येत आहे.

पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांच्या मार्गदर्शनाखाली एनसीसीआरपीवर प्राप्त झालेल्या तक्रारीची छाननी करण्यात आली. या छाननीदरम्यान मोबाईल क्रमांक ८४४६३७७५०० तसेच इतर काही मोबाईल क्रमांकां विरुद्ध एकूण १२ तक्रारी प्राप्त झाल्याचे आढळून आले. सखोल पडताळणी केली असता महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांतील नागरिकांची एकूण १४,५०,०८६/ इतक्या रकमेची ऑनलाइन फसवणूक झाल्याचे निष्पन्न झाले.प्राप्त तक्रारींमध्ये अहमदनगर जिल्ह्यातील मिरजगाव येथील चार,पुणे जिल्ह्यातील नारायणगाव, पिंपरी, लोणी काळभोर, चिखली व विश्रांतवाडी येथील पाच, सांगली जिल्ह्यातील मिरज येथील एक, मुंबईतील कस्तुरबा येथील एक तसेच ठाणे जिल्ह्यातील अंबरनाथ येथील एका नागरिकाचा समावेश असून, या सर्वांकडून मिळून १४,५३,०८६/- इतकी रक्कम फसवणुकीद्वारे उकळण्यात आली.

पोलीस तपासादरम्यान शुभम रहीशचंद्र पिचारे रा. येरोळ, ता. शिरूर अनंतपाळ, जि. लातूर याने ही फसवणूक केल्याचे निष्पन्न झाले. आरोपी हा सन २०२१-२०२२ मध्ये अल्ट्रस टेक्नॉलॉजी या कॉल सेंटरमध्ये कार्यरत होता. त्या अनुभवाचा गैरफायदा घेत त्याने नागरिकांना बिझनेस लोन मंजूर करून देतो' असे खोटे आमिष दाखवून प्रक्रिया शुल्क, फाईल चार्जेस, इन्शुरन्स, जीएसटी आदी विविध कारणे सांगत पैसे जमा करण्यास भाग पाडले. नागरिकांकडून पैसे मिळवण्यासाठी आरोपीने एकूण पाच वेगवेगळ्या सिमकार्डाचा वापर केल्याचे तपासात उघड झाले आहे.

याप्रकरणी शिरूर अनंतपाळ पोलीस स्टेशनचे पोलीस अमलदार विनय उबाळे यांच्या फिर्यादीवरून शिरूर अनंतपाळ पोलीस ठाणे येथे गुन्हा क्रमांक १५५/२०२६ अन्वये कलम ३१८(४) भारतीय न्याय संहिता गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास पोलीस निरीक्षक अनंत भंडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक उमेश रायबोळे हे करत आहेत.

> **(सात वर्षांपर्यंत शिक्षेची तरतूद)**
> भारतीय न्याय संहिता कलम ३१८(४) अंतर्गत फसवणुकीद्वारे मोठ्या प्रमाणात आर्थिक लाभ मिळविणाऱ्या आरोपीस सात वर्षांपर्यंत कारावासाची शिक्षा, तसेच दंडाची शिक्षा होऊ शकते. त्यामुळे ऑनलाइन कर्ज, गुंतवणूक, नोकरी किंवा इतर कोणतेही आर्थिक आमिष दाखवून पैसे मागणाऱ्या कात्तींवर विश्र्वास ठेवू नये, असे आवाहन लातूर पोलिसांनी केले आहे.

> **(लातूर पोलिसांचे नागरिकांना आवाहन)**
> ऑनलाइन कर्ज मंजुरीसाठी कोणत्याही अनोळखी व्यक्तीच्या खात्यावर आगाऊ रक्कम जमा करू नका. मोबाईलवर आलेल्या लिंक, संदेश किंवा कॉलवर विश्र्वास ठेवण्यापूर्वी त्यांची खातरजमा करा संशयास्पद व्यवहार झाल्यास अथवा फसवणुकीचा प्रयत्न झाल्यास तात्काळ सायबर हेल्पलाईन क्रमांक १९३० वर संपर्क साधावा किंवा, पोर्टलवर तक्रार नोंदवावी, त्वरित तक्रार केल्यास फसवलेली रक्कम परत मिळण्याची शक्यता वाढते. सायबर गुन्हेगारांवर कठोर कारवाईबरोबरच नागरिकामध्ये जनजागृती करून अशा गुन्ह्यांना आळा घालण्यासाठी लातूर जिल्हा पोलीस सातत्याने कार्यरत असल्याचे पोलीस प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

# दर्जेदार शिक्षणासाठी नांदेड उत्तर मध्ये डिजीटल शाळा बनविणार : आ. बालाजीराव कल्याणकर

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. १९ जुलै -**

इंग्रजी शाळेची फिस परवडत नाही पण मुलांना दर्जेदार शिक्षण मिळायला हवे या हेतूने नांदेड उत्तर मतदार संघातील अनेक शाळा डिजीटल करणार आहे, इंग्रजी माध्यमांच्या शाळाही चांगल्या बनविणार आहे. विद्यार्थ्यांनी शिक्षण घेवून डॉक्टर, इंजिनिअर व इतर उच्च पदस्थ अधिकारी बनावे असे प्रतिपादन नांदेड उत्तर विधानसभा मतदार संघाचे आ. बालाजीराव कल्याणकर यांनी केले.



संध्याताई फाऊंडेशन महाराष्ट्रच्या वतीने जिल्हा परिषदेच्या शाळेतील विद्यार्थ्यांसाठी आयोजित रंग भरण स्पर्धा बक्षिस वितरण समारंभ मोठ्या उत्साहात नियोजन भवन येथे दि. १९ जुलै रोजी मोठ्या उत्साहात संपन्न झाला. यावेळी आ.बालाजीराव कल्याणकर बोलत होते. या कार्यक्रमाला आ. बालाजीराव कल्याणकर, आ. श्रीजयाताई चव्हाण, महापौर सौ. कविता मुळे, आयोजक सौ. संध्याताई कल्याणकर, अप्पर पोलिस अधिक्षक सुरज गुरव, जि.प. च्या प्राथमिक शिक्षणाधिकारी वंदना फुटाने, मनपाच्या शिक्षणाधिकारी प्रविणा मांदळे, नगरसेवक सुहास कल्याणकर, सेनेच्या महिला जिल्हाप्रमुख अपर्णाताई नेरलकर, पं.स.चे गटविकास अधिकारी प्रविण सुरडकर, राजाराम सुर्यवंशी, माणिक भोसले, संजय कोठाळे, प्रकाश गीरे पाटील आदिंची यावेळी प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी पुढे बोलताना आ. कल्याणकर म्हणाले की, सौ. संध्याताई कल्याणकर यांनी राबविलेला चिद्रकला या रंग भरण स्पर्धेचा उपक्रम अतिशय स्तुत्य आहे. नांदेड उत्तर मतदार संघातील मुलांना दर्जेदार शिक्षण मिळायला हवे, यासाठी राज्य सरकारकडून निधीची कमतरता पडणार नाही. येणार्या पिढीला शिक्षकांनी चांगले संस्कार दिले पाहिजे, असे त्यांनी म्हणून इंग्रजी शाळा ग्रामीण भागातील नागरीकांना फिसमुळे परवडणार नाहीत त्यामुळे शासनाकडून निधी उपलब्ध करुन नांदेड उत्तर मतदार संघात डिजीटल शाळा उभारल्या जाणार आहेत. असे त्यांनी मत व्यक्त करुन मुलांना गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्याची जबाबदारी शिक्षकांनी प्रभावी पार पाडावी असेही त्यांनी सांगीतले.

यावेळी कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात सौ. संध्याताई कल्याणकर म्हणाल्या की, ५० जि.प. शाळेंनी यात सहभाग घेतला होता. जवळपास ३५०० विद्यार्थी यात सहभागी झाले. पहिली ते चौथी, पाचवी ते आठवी अशा दोन गटातील २५० शाळेंना बक्षिस दिले आहे. तसेच विशेष कार्य करणार्या ५० मुख्याध्यापकांचा गौरव केल्याचे सांगून मुले मोबाईलपासून दूर झाली पाहिजेत. देशाच भविष्य मुले आहेत. त्यांच्यासाठी हा उपक्रम राबविल्याचे त्यांनी सांगितले. तर आ. श्रीजया चव्हाण या म्हणाल्या की, रंगभरण स्पर्धा हा उपक्रम स्तुत्य असून मुलांच्या विकासाला चालणा मिळणार असल्याचे त्यांनी सांगीतले. महापौर कविता मुळे यांनी उपक्रमाबद्दल कौतुक करुन मुलांच्या सुप्त गुणांना वाव मिळणारा हा उपक्रम आहे. शिक्षणासाठी आपण सदैव सहकार्य करणार असल्याचे त्यांनी सांगीतले.

अप्पर पोलिस अधिक्षक सुरज गुरव यांनी मुलांना शिक्षणात प्रेशर देवू नका, त्यांच्या आवडीच्या क्षेत्रामध्ये त्यांना प्रोत्साहन द्या, जिल्हा परिषदेच्या शाळांतून दर्जेदार शिक्षण मिळत आहे, मोबाईलच्या युगात ताईंनी मुलांच्या हातात ब्रश दिले आहे. ही कौतुकाची बाब असल्याचे त्यांनी सांगीतले. गटशिक्षणाधिकारी प्रविण चौंडकर यांनीही मत व्यक्त केले. जि.प.च्या प्राथमिक शिक्षणाधिकारी वंदना फुटाने या म्हणाल्या की, या स्पर्धेतील एक बक्षिस मुलांचे आयुष्य घडविते. मुलांच्या गुणवत्तेला वाव मिळतो असे म्हणत त्यांनी या उपक्रमाचे कौतुक केले. तसेच मनपाच्या शिक्षणाधिकारी प्रविणा मांदळे यांनीही या उक्रमाचे कोतुक केले. कलाशिक्षक सुर्यवंशी यांचा सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाचे सुत्रसंचलन सतीश कासेटवार यांनी केले, या बक्षिण वितरणाच्या कार्यक्रमाला मोठी गर्दी झाली होती. एकूणच हा कार्यक्रम मोठ्या उत्साहात संपन्न झाला.

**संध्याताई कल्याणकर यांचे कौतुक**

सौ .संध्या ताई बालाजीराव कल्याणकर यांनी यापूर्वी अनेक उपक्रम राबविले आता त्यांनी शाळेतील मुलांसाठी रंग भरण स्पर्धा आयोजित करून मुलांच्या शालेय जीवनात वेगळा आनंद स्पर्धेच्या माध्यमातून निर्माण केला आहे त्यांनी आयोजित केलेल्या या उपक्रमाबद्दल आणि त्याला मिळालेला प्रचंड प्रतिसाद याकरिता विविध मान्यवरांनी सौ.संध्याताई कल्याणकर यांचे कौतुक केले.

# सिडकोत सोनम वांगचुक यांच्या समर्थनार्थ संविधान वाचन आंदोलन

**तभा वृतसेवा**
**नवीन नांदेड, दि. १९ जुलै -**



दिल्ली येथे चालू असलेल्या जंतर - मंतर वर उपोषण करते सोनम वांगचुक यांना असंविधानिक वागणूक पोलिसांनी दिल्यामुळे या प्रकरणी सोनम वांगचुक यांना सिडको येथील शिवाजी महाराज पुतळा परिसरात आंबेडकरवादी युवक सम्राट आढाव व मीत्रमंडळीनी दिनांक १९ ते २० जुलै रोजी संविधान वाचन आंदोलन आयोजित करण्यात आले आहे.

दल्ली येथील जंतर मंतर वर चालू असलेल्या उपोषणास असविधानिक रित्या सोनम वांगचुक यांना पोलिसांनी उचलून रुग्णालयात घेऊन जाणे व उपोषणाचे भंग करणे सदरील उपोषणावर दबाव टाकने,यावर सरकार कुठलीही भूमिका घेत नसुन उपोषणकर्ते सोनम वांगचुक यांच्या उपोषण स्मरणार्थ व असंविधानिक प्रकरणाच्या निषेधार्त, तसेच राष्ट्रीय शैक्षणिक पात्रता व प्रवेश परीक्षा (छएएढ) पेपर लीक प्रकरणी केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा द्यावा या मागणीसाठी सोनम वांगचुक यांनी केलेल्या उपोषणाच्या समर्थनार्थ आणि दि. २० जुलै २०२६ रोजीच्या जंतर-मंतर ते लोकसभा संसद भवन दिल्ली दरम्यान आयोजित आंदोलनाला पाठिंबा दर्शविण्यासाठी सिडको येथे दोन दिवसीय दिनांक १९ ते २० जुलै रोजी संविधान वाचन आंदोलन चालु आहे.या आंदोलनाचे आयोजन आंबेडकरवादी युवक सम्राट आढाव व त्यांचे मित्र मंडळी यांच्या वतीने करण्यात आले आह. या आंदोलनात मोठ्या प्रमाणात महिला व युवक युती यांचा समावेश आहे. यावेळी या आंदोलनास प्रसेनजीत वाघमारे , विलास गजभारे, प्रा. प्रबुद्ध चित्ते, शाहीर बापूराव जमदाडे, प्रदीप हानवते, चंपतराव कांबळे, दीपक कदम, राजू सुताडे, साहिल बलसाने, अनिल मोरे, आकाश सोनकांबळे,

मनोज भरणे, आकाश चव्हाण, दीपक भरकड ,भगवान वाडे, विलास नागोरे, सतीश गजभारे, किरण सोनाळे, रामचंद्र जमदाडे, विनायक गायकवाड, कपिल झडते, सौ. सुजाता आढाव, सुनित गायकवाड, शोभा कसबे, उषा मोरे आदींनी संविधान वाचून आंदोलनास सुरुवात केली.

## माऊली ग्रुप चा सलग अकराव्या वर्षी अखंडीतपणे सेवायज्ञ

**हिमायतनगर**-माऊली मित्र मंडळ सेवाभावी ग्रुप नांदेडचा अतिशय स्तूत्य उपक्रम चालू असून सलग अकरा वर्षापासून सेवेधारी भाविकांच्या सेवेसाठी काम करीत आहेत. या वर्षी नव्याने वारकर्याच्या चरण सेवा ( मसाज ) चा उपक्रम चालू केला आहे.या सेवाभावी उपक्रमांमध्ये



हिमायतनगर शहर व तालूक्यातील असंख्य सेवाधारी मंडळी या सेवा यज्ञात सहभागी झाले आहेत. पंढपूर येथे आषाढी एकादशी निमित्त विठ्ठलाच्या दर्शनासाठी लाखो भाविक,वारकरी मंडळी जात असतात. विशेषतः पायी वारीला येथे विशेष महत्व असते.आषाढी वारीच्या अखंड प्रवासात वारकर्याना शारीरीक थकवा जाणवतो. या करीता आवश्यक औषधोपोचार या सह यावर्षी चरणस्पर्श अभ्यंग मसाज आयूर्वेदिक तेलाने पायाची मालिश व्यवस्थाही या वर्षी करण्यात आली आहे. सातारा जिल्ह्यातील फलटन येथे हे सेवाशिबीर ता. १५ ते १७ दरम्यान संपन्न झाले. वारकरी सेवा हिच इश्वर सेवा या माध्यमातून हा सेवाभावीयज्ञ समाजात मानवता,सेवाभाव आणि भक्तीचा संदेश देणारा ठरत आहे. या उपक्रमात समाजातील दानशूर व्यक्तीने दिलेल्या दानातून वारकर्याना भोजन,पाणि,आवश्यक त्या प्रामाणात औषधोपचार मिळत आहे.या उपक्रमात हिमायतनगर शहर,ग्रामीण क्षेत्रातून असंख्य सेवाधारी भाविकांनी सहभाग घेवून वारकर्याची मनोभावे सेवा केली आहे. या भक्तीमय उपक्रमाचे सर्वत्र कौतूक होत असून, सलग अकरा वर्ष अखंडीतपणे सेवा देणारया माऊली मित्र मंडळ ग्रूप येथे विशेष ठरला आहे.

## नांदेड जिल्हा मध्यवर्ती बँकेसाठी अतुल वाघ यांना उमेदवारी जाहीर

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. १९ जुलै -**

नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीमध्ये माजी मुख्यमंत्री तथा खासदार अशोकरावचव्हाण पुरस्कृत शेतकरी विकास पॅनलच्या नांदेड तालुका अ गटासाठी अतुल वाघ यांना उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे.



राज्याची माजी मुख्यमंत्री तथा खासदार अशोकराव चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची निवडणूक प्रक्रिया सुरू आहे. या निवडणुकीत अकरा संचालक बिनविरोध निवडून आल्यानंतर उर्वरित जागांसाठी येथे २९ जुलै रोजी मतदान होणार असून या निवडणुकीत नांदेड तालुक्यातून अ गटातून शेतकरी विकास पॅनलचे तरुण उमेदवार अतुल वाघ यांना उमेदवारी देण्यात आली आहे . खासदार अ शो क रा व चव्हाण यांचा शेतकरी विकास पॅनल मधून अतुल वाघ यांच्या उमेदवारीने अ गटातील निवडणूक अत्यंत लक्षणीय ठरणार आहे किंबहुना वाघ यांचा विजय निश्चितपणे होईल असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

# हदगाव आगारात चार नवीन 'राजमाता जिजाऊ' बसेस दाखल

**तभा वृतसेवा**
**हदगाव, दि. १९ जुलै -**

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या (एसटी) हदगाव आगारात शनिवार, दि. १८ जुलै २०२६ रोजी चार नवीन 'राजमाता जिजाऊ' बसेस दाखल झाल्या. या बसेसचा लोकार्पण सोहळा हदगाव-हिमायतनगर विधानसभा मतदारसंघाचे आ. बाबुराव कदम कोहळीकर यांच्या हस्ते उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. या नव्या बसेसमुळे हदगाव आगाराच्या प्रवासी सेवेत मोलाची भर पडली असून ग्रामीण भागातील प्रवाशांना अधिक सुरक्षित, आरामदायी व दर्जेदार प्रवासाची सुविधा उपलब्ध होणार आहे.



कार्यक्रमाच्या प्रारंभी नवीन बसेसचे विधिवत पूजन करण्यात आले. त्यानंतर आमदार बाबुराव कदम कोहळीकर यांच्या हस्ते फीत कापून बसेसचे लोकार्पण करण्यात आले. यावेळी त्यांनी बसेसची पाहणी करून चालक-वाहकांशी संवाद साधला. ग्रामीण भागातील नागरिकांना दर्जेदार सार्वजनिक वाहतूक सेवा उपलब्ध करून देण्यासाठी राज्य शासन व एसटी महामंडळ कटिबद्ध असून, नवीन बसेसचा लाभ सर्वसामान्य प्रवाशांना मोठ्या प्रमाणात होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. यावेळी हदगाव आगाराचे आगार व्यवस्थापक आनंद धर्माधिकारी, प्रभारी अण्णा कदम यांच्यासह चालक, वाहक, यांत्रिक विभागातील कर्मचारी तसेच प्रशासकीय अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. लोकार्पण सोहळ्यास भास्कर वानखेडे, बबनराव कदम, बबन माळुंदे, बालाजीराव दत्तात्रेय शिंदे, श्री वाकोडे, संदेश पाटील, गोपाल सारडा, कैलास बहादुरे यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर, सामाजिक कार्यकर्ते, असंख्य प्रवासी बंधू-भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## जिल्हा बँकेच्या संचालकपदी बिनविरोध निवड झाल्यानंतर आ. केराम सत्कार

**किनवट**-नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संचालक मंडळाच्या निवडणुकीत महायुतीच्या समन्वयातून किनवट मतदारसंघाचे आमदार भीमराव केराम यांची संचालकपदी बिनविरोध निवड झाल्यानंतर रविवारी किनवट येथे त्यांच्या निवासस्थानी अभिनंदनाचा अक्षरशः वर्षाव झाला. विविध क्षेत्रातील मान्यवर, महायुतीतील घटक पक्षांचे



पदाधिकारी व कार्यकर्ते, पत्रकार, सामाजिक कार्यकर्ते, उद्योजक तसेच नागरिकांनी पुष्पगुच्छ, शाल व श्रीफळ देऊन त्यांचा सत्कार करून शुभेच्छा दिल्या. नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या एकूण २३ संचालकांची निवड होत असून, त्यापैकी ११ संचालकांची बिनविरोध निवड झाली आहे. महायुतीचे ज्येष्ठ नेते तथा खासदार अशोकराव चव्हाण यांच्या पुढाकाराने व महायुतीतील समन्वयातून अनेक जागांवर उमेदवारांची बिनविरोध निवड करण्यात आली. त्यामध्ये किनवट मतदारसंघातून आमदार भीमराव केराम यांची संचालकपदी बिनविरोध निवड झाली. बिनविरोध निवडीनंतर आ. केराम हे मागील दोन दिवस नांदेड येथे विविध शासकीय व सहकारी क्षेत्रातील बैठकींमध्ये व्यस्त होते. पावसाळी अधिवेशनातील कामकाज पूर्ण करून त्यांनी नांदेडमध्ये जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीसंदर्भातील बैठकींना उपस्थिती लावली. त्यानंतर राज्याचे पालकमंत्री अतुल सावे यांच्या उपस्थितीत झालेल्या जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत सहभागी होत जिल्ह्याच्या विकासकामांबाबत चर्चा केली. याशिवाय पालकमंत्री सावे यांच्यासमवेत विविध कार्यक्रमांना व भेटींनाही त्यांनी उपस्थिती दर्शविली. रविवारी (दि. १९) आ. केराम किनवट येथील आपल्या निवासस्थानी परतल्यानंतर सकाळपासूनच शुभेच्छुकांची मोठी गर्दी झाली होती. महायुतीतील विविध घटक पक्षांचे पदाधिकारी, कार्यकर्ते, सहकारी संस्थांचे प्रतिनिधी, व्यापारी, उद्योजक, पत्रकार, सामाजिक क्षेत्रातील मान्यवर तसेच सर्वसामान्य नागरिकांनी त्यांचे अभिनंदन करून पुढील कार्यकाळासाठी शुभेच्छा दिल्या. दिवसभर सत्काराचा सिलसिला सुरू असून, नागरिकांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदविला. किनवट तालुक्याच्या सहकार क्षेत्राच्या दृष्टीने ही निवड महत्त्वपूर्ण मानली जात आहे. माजी आमदार डी. बी. पाटील यांनी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संचालकपदाची जबाबदारी सांभाळल्यानंतर दीर्घ कालावधीनंतर किनवट तालुक्याला पुन्हा संचालकपदावर प्रतिनिधित्व मिळाले आहे. त्यामुळे तालुक्यातील सहकारी संस्था, शेतकरी व ग्रामीण विकासाशी संबंधित प्रश्न अधिक प्रभावीपणे मांडले जातील, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. जिल्हा बँकेच्या माध्यमातून शेतकरी, सहकारी संस्था आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळकटी देण्यासाठी प्राधान्याने काम करणार असल्याची भावना आ. भीमराव केराम यांनी यावेळी व्यक्त केली. तसेच आपल्या निवडीबद्दल महायुतीच्या वरिष्ठ नेत्यांचे, कार्यकर्त्यांचे आणि किनवट-माहूर मतदारसंघातील जनतेचे त्यांनी आभार मानले.

## उमरी नगर परिषद कडून घरकुल लाभार्थ्यांना धनादेशाचे वाटप




**तभा वृतसेवा**
**उमरी, दि. १९ जुलै -**

उमरी नगरपरिषद कडून प्रधानमंत्री आवास योजना २.० अंतर्गत उमरी नगर परिषद हद्दीतील एकूण १०५ घरकुल लाभार्थ्यांना यांना एक कोटी पाच लक्ष रुपये वितरित करण्यात आले आहे .

उमरी शहरातील घरकुल लाभार्थांना नगराध्यक्ष सौ शकुंतला भगवान मुदीराज, उपनगराध्यक्ष कैलासभाऊ देशमुख गोरठेकर,माजी नगराध्यक्ष प्रवीणभाऊ सारडा यांच्या हस्ते निधी वितरीत करण्यात आला.

यावेळी गटनेते राजेश पाटील जाधव, बांधकाम सभापती संदीप चंदनवार महिला व बालकल्याण सभापती निकिता सिंगरवाड, नियोजन सभापती विष्णूभाऊ पंडित व सदस्य अनुसयाबाई कटकदवने ,साईनाथ जमदाडे ,गजानन अलसटवार, रतन खंदारे बाबू बेग हुसेन बेग, एजास खान, गजानन खांडरे, इरबा शेळके,वसीम कुरेशी,अशोक झडते,शंकर शिंदे,अनंत रापणवाड, विकी रणनवरे,दीपक खांडरे, जावेद खान,नगरसेवक प्रतिनिधी,कार्यालयीन अधीक्षक कांचन पडलवार , अभियंता कैलास यमलवाड, लेखापाल बालाजी चवरे, संगणक अभियंता सावंत सर, पूजा पावडे,घरकुलाचे अभियंता शकील पठाण, वरिष्ठ लिपीक गणेश मदने,विठ्ठल गगरोड,सचिन गंगासागरे ,गंगाधर पवार , चंद्रकांत श्रीकांबळे ,गौतम सोनफळे, शमीन बेग,आकाश खंदारे,रमाबाई करपे,माधव जाधव,यावेळी उपस्थित होते .

# ऑनलाइन तक्रार प्रक्रियेमध्ये शेतकरी अधिकच अडचणीत

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. १९ जुलै -**

कोरड्या दुष्काळाच्या छायेत असताना हळद पुनर्रचित हवामान आधारित पीकविमा योजनेत जोखमीनुसार तक्रारीची तरतूदच नाही, कंपनीने ईमेलचा फार्मेट बनवला आहे, त्यानुसार ते स्वीकारते. तसेच एक १४४४७ या कंपनीच्या तक्रार फोनवर पावसाच्या खंडाची नुकसानीची नोंद घेण्याची योग्य पद्धतच कार्यारत नाही, सुशासन, प्रशासन व विमा कंपनीकडून अनास्था दूर करून शेतकर्याला न्याय देण्यात यावा, या मागण्यांचे निवेदन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे मराठवाडा शेतकरी प्रतिनिधी प्रा. शिवाजी मोरे यांनी पाठविले आहे.

अनुशेषग्रस्त, कोरडा दुष्काळग्रस्त सोनखेड, शेवडी मंडळ ता. लोहा तसेच संपूर्ण नांदेड जिल्हा कोरड्या दुष्काळाच्या गर्द छायेमध्ये आहे. विहिरीचे, बोअरचे पाणी कमी झाले आहे. सोयाबीन जमिनीच्या बाहेर निघाले नाही, हळदीचे संपूर्ण प्रमाणात नुकसान झालेले आहे. बदलत्या हवामानामध्ये शेतकर्यांना आर्थिक संरक्षण देण्याकरता आर्थिक स्थायीत निर्माण करून देण्याकरिता या व्यापक उद्देशाने प्रधानमंत्री पीकविमा योजना निर्माण करण्यात आली. पीक संरक्षणाकरता विविध प्रकारच्या विमा योजना निर्माण करण्यात आल्या. त्यात प्रधानमंत्री पीक विमा योजना आणि पुनर्रचित हवामानावर आधारित पीकविमा योजना कोरड्या दुष्काळाच्या छायेत असलेल्या शेतकर्याला यातून आर्थिक संरक्षण मिळेल, परंतु हळद पिकाच्या जोखमीचा कालावधी, पावसाचा खंड १५ जुलैला संपतो, परंतु त्याच संदर्भात तक्रार करण्याची योग्य व सोपी पद्धत नसल्यामुळे शेतकरी अडचणीत आला. तसेच विमा कंपनीने प्रचार-प्रसार करण्यासाठी ईमेल दिला आहे, परंतु त्या अॅड्रेसवर ई-मेल केल्यानंतर योग्य फॉरमॅटमध्येच तो अर्ज आला पाहिजे, अशी अट घातली आहे. भोळ्या, भाबड्या शेतकर्याला याबाबत काहीच करता येत नाही, सेवा केंद्रावर तक्रार करायला गेले तर १४४४७ वर एक दिवस सांगा म्हणतात. नुकसानीचा, पावसाचा खंड हा एका दिवसाचा नाही, पंधरा दिवसाच्या नुकसानीच्या शासन निर्णयानुसार आहे व त्याची तक्रार करणे शेतकर्याला तीन दिवसात बंधनकारक केले आहे आणि त्या ठिकाणी सेवा देणारा कर्मचारी हे मान्य करायला तयार नाही, अशा अडचणीमध्ये शेतकरी अडकले आहेत. यातून प्रशासनाची व विमा कंपनीची उदासीनता समोर येत आहे. या जागतिकीकरणाच्या काळामध्ये नागरी समाज म्हणून व बिगर राजकीय अभिकर्त म्हणून शासन आणि नागरिकांनी महत्त्वाची भूमिका घेण्यात आवश्यक आहे तसेच ऑनलाईन पीक पाणी अॅपसुद्धा चालत नाही, अशा अनेक तक्रारी भागातून येत आहेत.

तरी या ऑनलाइन व पीकविमा प्रशासनातील शेतकर्यांसंदर्भातल्या अडचणी दूर करून शेतकर्याला न्याय द्यावा. तसेच शेतकर्यांची तक्रार करण्याचा अधिकार सुरक्षित ठेवावा, ई-मेल तसेच सेवा नंबरवर तक्रारी जोखीमीनुसार स्वीकारण्यास विमा कंपनी व प्रशासनाला आदेश द्यावेत, असेही निवेदनात म्हटले आहे.

# शेतकर्‍यांच्या वेदनेशी एकरुप होत श्रावण भिलवंडे यांचा वाढदिवस साधेपणाने साजरा

**तभा वृतसेवा**
**नायगाव, दि. १९ जुलै -**

नरसी येथील श्री तुळजाभवानी जिनिंग फेडरेशनचे चेअरमन तथा भारतीय जनता पक्षाचे माजी जिल्हा सरचिटणीस श्रावण पाटील भिलवंडे यांचा वाढदिवसानिमित्त आयोजित अभिष्टचिंतन सोहळा रविवारी त्यांच्या नरसी येथील 'नंदनवन' निवासस्थानी अत्यंत साधेपणाने आणि उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. या सोहळ्यास भाजप कार्यकर्त्यांसह विविध राजकीय पक्षांचे पदाधिकारी, सामाजिक क्षेत्रातील मान्यवर आणि हजारो नागरिक उपस्थित होते.



यंदा तालुक्यात समाधानकारक पाऊस न झाल्याने खरीप पिकांवर संकट ओढवले असून शेतकरी चिंतेत आहेत. या परिस्थितीचे भान ठेवत श्रावण पाटील मित्रमंडळाने गेल्या अनेक वर्षांपासूनची वाढदिवस साजरा करण्याची पारंपरिक पद्धत बाजूला ठेवून यंदाचा अभिष्टचिंतन सोहळा अत्यंत साधेपणाने साजरा करण्याचा निर्णय घेतला. या निर्णयाचे उपस्थितांनी स्वागत केले.

यावेळी नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेवर बिनविरोध निवडून आलेले नवनिर्वाचित संचालक श्रीनिवास पाटील चव्हाण यांचाही शाल, श्रीफळ व पुष्पहार देऊन विशेष सत्कार करण्यात आला. उपस्थितांनी त्यांचे अभिनंदन करून पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

अभिष्टचिंतन स्वीकारताना श्रावण पाटील भिलवंडे यांनी शेतकर्‍यांच्या अडचणीच्या काळात अनावश्यक उत्सव टाळणे हीच सामाजिक बांधिलकी असल्याचे सांगितले. मित्रमंडळाने घेतलेल्या साधेपणाच्या निर्णयाचे त्यांनी कौतुक करत उपस्थित सर्वांचे मनःपूर्वक आभार मानले.

कार्यक्रमानंतर उपस्थितांसाठी भोजनाची व्यवस्था करण्यात आली. तालुक्याच्या कानाकोपर्‍यातून आलेल्या कार्यकर्ते, हितचिंतक आणि विविध क्षेत्रांतील मान्यवरांच्या उपस्थितीमुळे संपूर्ण परिसर उत्साहाने फुलून गेला. विविध पक्षांच्या पदाधिकार्‍यांची उपस्थिती ही श्रावण पाटील भिलवंडे यांच्या सर्वसमावेशक नेतृत्वाला मिळालेल्या व्यापक स्वीकाराची साक्ष देणारी ठरली.

लातूर
# दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## गंजगोलाईत वाहतुकीला अडथळा; गुन्हा दाखल

तभा वृत्तसेवा

लातूर दि. १९ जुलै : शहरातील गजबजलेल्या गंजगोलाई परिसरात मिरची लाईन भागात वाहतुकीला अडथळा ठरेल, अशा पद्धतीने ऑटो-रक्षा उभी करणाऱ्या ऑटोरिक्षाचालकाविरुद्ध गांधी चौक पोलिसांनी कारवाई केली आहे.

१५ जुलै रोजी सकाळी ११ वाजण्याच्या सुमारास आरोपीने त्याची एमएच २४, एटी ९९३५ या क्रमांकाची ऑटोरिक्षा सार्वजनिक रस्त्याच्या मध्यभागी बेजबाबदारपणे उभी केली होती.

यामुळे वाहतुकीला मोठा अडथळा निर्माण होऊन नागरिकांच्या जीवाला धोका निर्माण झाला होता.



## विविध वृत्त....

### स्मार्ट मिटरची मनसेने केली होळी



तभा वृत्तसेवा

लातूर दि. १९ जुलै : महावितरणच्या स्मार्ट मिटर विरोधात महाराष्ट्र नवनिर्माण सेना आक्रमक झाली आहे. शहरातील महावितरण कार्यालयासमोर स्मार्ट मिटरची होळी करून सरकार व महावितरण विरोधात संताप व्यक्त करत स्मार्ट मिटर तात्काळ बंद करण्याची मागणी करण्यात आली आहे.

महावितरणच्या वतीने सध्या स्मार्ट मिटरची सक्ती करण्यात येत असून स्मार्ट मिटरमुळे सामान्य नागरिकांना नाहक अधिकचा आर्थिक भुर्दंड सहन करावा लागत असल्यामुळे हे स्मार्ट मिटर तात्काळ बंद करावेत अन्यथा महावितरण आणि सरकार विरोधात भव्य जनआक्रोश मोर्चा काढण्याचा ईशारा यावेळी मनोज अभंगे व शिवकुमार नागराळे यांनी दिला आहे.

### जि. प. वेतन अपहार प्रकरणातील तिघांना अभय

तभा वृत्तसेवा

लातूर : जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागात १ जानेवारी २०२५ ते ३१ मे २०२५ दरम्यान, ग्रामीण भागातील प्राथमिक आरोग्य केंद्र, उपकेंद्रांतील कर्मचाऱ्यांच्या वेतनाचा अपहार झाला. या प्रकरणात चार जणांचा सहभाग होता. यातील फक्त एकावर जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागाने गुन्हा नोंद केला. इतर तिघांना सूट दिली. हा प्रकार आरोग्य कर्मचाऱ्यांना आवडला नाही. या प्रकरणात सर्व दोषींवर गुन्हे नोंद करून अदल घडवायला हवी होती. ही नामी संधी जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागाने घालवली. वेतन अपहार झालेल्या कर्मचाऱ्यांनी अर्धवट कारवाई केल्याबद्दल तीव्र नाराजी व्यक्त केली. सर्वांनावर कारवाई होणे अपेक्षित होते. परंतु, जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागाने कचखाऊ भूमिका घेतल्याने इतर तिघांना अभय मिळाले. हे अभय का दिले, का जाणिवपूर्वक दिले, याबाबतीत उलटसुलट प्रतिक्रिया उमटत आहेत.

### वक्फ बोर्डाची मालमत्ता बचावासाठी स्वाक्षरी मोहीम

तभा वृत्तसेवा

लातूर दि. १९ जुलै : शहरातील वक्फ बोर्डाच्या मालमत्तेवर

अनधिकृतपणे अतिक्रमण करण्यात येत असल्याचा आरोप करीत वक्फच्या मालमत्तांवरील अतिक्रमणे तातडीने थांबवावीत, या मागणीसाठी गंजगोलाई येथे मुस्लिम समाजातील सामाजिक कार्यकर्त्यांनी पुढाकार घेत स्वाक्षरी मोहीम शुक्रवारी हाती घेतली आहे.

येथील वक्फ बोर्डाची मालमत्ता वाचविण्यासाठी जनजागृती आणि स्वाक्षरी मोहीम राबविण्यात येत असल्याचे सांगण्यात आले. यावेळी कार्यकर्त्यांनी हाता फलक घेऊन अनधिकृतपणे होणारे अतिक्रमण तातडीने थांबवावे, तसेच शासनाने कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

या प्रसंगी विविध राजकीय पक्षांचे पदाधिकारी, सामाजिक संस्था, संघटनांचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# लातूर शहरात दर्जाहिन विकास कामांचा सपाटा..!

## विकास निधी खर्च करायचाय म्हणून हा प्रकार सुरु आहे की काय ? नागरिकांना पडतोय प्रश्न

तभा वृत्तसेवा

लातूर, दि. १९ जुलै : कधीकाळी मराठवाड्यात विकास कामांच्या बाबतीत अग्रेसर असणाऱ्या लातूर शहराची अवस्था आजमितीस अतिशय बकाल झाल्याचे दिसत आहे. सध्यस्थितीत शहराच्या विविध भागात छोटी मोठी विकास कामे सुरु असून त्या कामांचा दर्जा अतिशय हिन असल्याचे पाहताक्षणीच लक्षात येते. त्यामुळे ही विकास कामे पाहून सामान्य लातूरकरांतूनच आता विकास निधी खर्च करायचा आहे म्हणून ही ओबडधोबड अन् सुमार दर्जाची कामे केली जात आहेत की काय ? असा प्रश्र्न उपस्थित केला जात आहे.

लातूर शहर महानगरपालिकेच्या तिसऱ्या पंचवार्षिक निवडणुकीत लातूरच्या मतदारांनी राज्यातील सत्ताधारी भाजप - महायुतीवर विश्र्वास न दर्शवता भारतीय राष्ट्रीय काँग्रेसलाविक्रमी बहुमताने सत्तास्थानी विराजमान केले. राज्यात आणि देशात भाजप - मित्र पक्षांची सत्ता असताना लातूरच्या मतदारांचा हा निर्णय काहीसा चुकलाच ,असे एकंदर परिस्थितीवरून पाहावयास मिळत आहे. सत्तेत असणाऱ्या पक्षाच्या हाती मनपाच्या चाव्या सोपविण्यात आल्या असत्या तर शहराचा विकासाला अजिबात खीळबसली नसती. विकास कामासाठी मोठ्या प्रमाणावर निधीचीआवश्यकता असते त्याकरिता सत्तेची नितांत सत्ता खूप महत्वाची असते, ही बाब लातूरच्या मतदारांना वेळ निघून गेल्यावर लक्षात येत आहे. लातूर शहर मनपातील कर्मचाऱ्यांना सुद्धा वेळेवर वेतन मिळत नाही. जेथे कर्मचाऱ्यांच्या वेतनाचीहीअडचण होते, तेथे विकास कामाच्या बाबतीत फारसे न बोललेलेच बरे.

आता पावसाळ्याचे दिवस आहेत. शहराच्या अनेक भागात रस्त्यावर खड्डे पडल्याने वाहनधारकांना वाहने चालविताना अक्षरशः सर्कस करावी लागते. त्याकरिता रस्त्यावरील खड्डे मुरूम टाकून बुजविण्याचे काम काही भागात केले गेले आहे. हे काम एवढ्या हलक्या दर्जाचे आहे की, एक दोन मोठे पाऊस होऊन गेल्यानंतर रस्त्यावरचे खड्डेपुन्हा अगोदर होते तसेच होऊन बसणार आहेत.

किमान मुरूम टाकल्यानंतर त्यावर रोड रोलर तरी फिरवून टाकलेला मुरूम दाबण्याचे काम संबंधित कंत्राटदाराने करायला हवे होते. फक्त खड्डे बुजवायलामुरूम टाकला का तर टाकला,असे सांगण्यासाठी आणि दाखवून देण्यासाठीचसदर काम केले गेल्याचे स्पष्ट दिसून येते. याकडे मनपा प्रशासनाने सूक्ष्म लक्ष देणे आवश्यक आहे. परंतु भ्रष्टाचाराच्या वाळविणे पोखरून टाकलेल्याप्रशासनाचे याकडे हेतुतः दुर्लक्ष होताना दिसते. शहराच्या विविध भागात हा प्रकार घडताना दिसत आहे. शहराच्या काही भागात पेव्हर ब्लॉक चे कामही केले जाताना पाहायला मिळते. या कामातही दर्जा कुठेही पाहायला मिळत नाही केवळ पेव्हर ब्लॉकचे काम केले का केले ? असे दाखवण्यापुरते केले जात आहे की काय ? असे एक ना अनेक प्रश्र्न सातत्याने उपस्थित केले जात आहेत.शहराच्या राजस्थान विद्यालयाच्या पाठीमागील गांधी नगर, रविंद्रनाथ टागोर नगर भागात सध्या पेव्हर ब्लॉकचेकाम सुरु आहे. या कामाचा आणि दर्जाचा सुतरामही संबंध नसल्याचे दृष्टीपथास येत आहे.

शहराच्या अनेक भागात अशा प्रकारचे काम यापूर्वीही केले गेले आहे. त्या कामाच्या दर्जाचीहीहीच अवस्था आहे. त्यामुळे अशा कामासाठी नागरिकांनीकराच्यारूपाने भरलेल्या पैशाचाअपव्यय करायचा अधिकार संबंधितांना कोणी दिला ? असाही संतप्त सवाल आता उपस्थित केला जात आहे. मनपा प्रशासनातील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी अशा दर्जाहिन कामांकडे तात्काळ लक्ष घालून संबंधित दोषींवर कारवाई करावी,अशी मागणी केली जात आहे.

## लातूर ग्रामीण शेत/पाणंद रस्ते योजनेच्या सहअध्यक्षपदी सुरज शिंदे यांची नियुक्ती



तभा वृत्तसेवा

लातूर दि.१९ जुलै : राज्य शासनाने नव्याने गठीत करण्यात आलेल्या मुख्यमंत्री बळीराजा शेत / पाणंद रस्ते योजनेच्या लातूर ग्रामीण विधानसभा कार्यक्षेत्राच्या सहअध्यक्षपदी भाजपाचे सुरज शिंदे यांची नियुक्ती करण्यात आली असून सदरील नियुक्ती करून काम करण्याची संधी उपलब्ध करून दिल्याबद्दल लातूर ग्रामीणचे आमदार रमेशआप्पा कराड यांचा यथोचित सत्कार करून आभार व्यक्त केले आहेत.

ग्रामीण भागातील शेतकऱ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी आणि शेतीतील मशागतीची कामे वेळेत व्हावीत, शेतमालाची सुलभ वाहतूक सुनिश्र्चित करण्यासाठी बारमाही शेतरस्ते असणे अत्यंत आवश्यक असल्यामुळे राज्यातील माहिती शासनाने मुख्यमंत्री बळीराजा शेत/पाणंद रस्ते योजना सुरू केली आहे. शासन निर्णयानुसार प्रत्येक विधानसभा क्षेत्र निहाय समिती गठीत करण्यात आली. लातूर ग्रामीण विधानसभा क्षेत्र समितीचे पदसिद्ध अध्यक्षपदी आ. श्री. रमेशआप्पा कराड आहेत.

मुख्यमंत्री बळीराजा शेत पांणद रस्ते योजनेच्या अंमलबजावणीत अधिक सुसूत्रता आणण्यासाठी शासन निर्णयात सुधारणा करण्यात आल्या असून समितीच्या कामकाजात मदतीसाठी लातूर ग्रामीणचे आमदार श्री. रमेशआप्पा कराड यांच्या शिफारसीनुसार भाजपाचे मुरुड मंडल अध्यक्ष श्री सुरज शिंदे यांची या समितीचे सहअध्यक्ष म्हणून राज्याचे महसूल मंत्री मा. चंद्रशेखरजी बावनकुळे यांनी एका परिपत्रकानुसार नियुक्ती केली आहे.

लातूर ग्रामीण विधानसभा क्षेत्रातील मुख्यमंत्री बळीराजा शेत पाणंद रस्ते योजनेच्या सहअध्यक्षपदी नियुक्ती करून काम करण्याची संधी दिल्याबद्दल सुरज शिंदे यांनी आ. रमेशआप्पा कराड यांचा यथोचित सत्कार करून आभार व्यक्त केले आहेत. यावेळी जिल्हा परिषदेचे सदस्य महादेव साळुंखे, भाजपाचे मंडल अध्यक्ष प्रताप पाटील, पंस सदस्य पांडुरंग बालवाड, पद्माकर चिंचोलकर, बाबासाहेब भिसे, हनुमंत गव्हाणे, भैरवनाथ पिसाळ, अशोक राठोड, संजय ठाकूर, वैभव मगर, सचिन लटपटे, शुभम खोसे, रवींद्र नागरगोजे, श्रीराम आदमाने, परमेश्र्वर माने, मुकुंद केसरी गोविंद नांदे, प्रशांत शिंदे, बालाजी गवळी, प्रशांत रायनोळे, आत्माराम शिंदे, अभिजीत पाटील यांच्यासह अनेक जण होते.

लातूर ग्रामीण मतदार संघात अद्यापपर्यंत कोणत्याही योजनेमधुन रस्त्यांची कामे झालेली नाही अश्या सर्व रस्त्यांची माहिती संकलीत करुन शेतकऱ्यांच्या रस्त्यांचे प्रश्र्न निकाली काढण्यासाठी कार्यकर्त्यांनी काम करावे कोणाचीही अडवणूक आणि पिळवणूक होणार नाही याची काळजी घ्यावी असे आ रमेशआप्पा कराड यांनी यावेळी बोलून दाखवले.

### लातूर तालुक्यात सर्वांत कमी ३६.३५ टक्के पेरणी

तभा वृत्तसेवा

लातूर दि. १९ जुलै : एल निनोमुळे यंदा असमान पाऊस पडत आहे. त्यामुळे पेरणीही असमान झाली आहे. लातूर तालुक्यात सर्वात कमी ३६.३५ टक्के पेरणी झाली आहे. लातूर तालुक्याच्या आसपासच्या भागातही पेरण्या रखडल्या आहेत. जळकोटमध्ये सर्वाधिक पेरणी झाली सोमवारपासून हस्त नवीन नक्षत्र निघणार आहे. त्यामुळे या नक्षत्रात मोठा पाऊस पडण्याची शेतकऱ्याना अपेक्षा आहे. पावसाअभावी लांबलेल्या पेरण्या पुढील आठवड्यात पाऊस झाल्यास काहीअंशी पूर्ण होतील. उत्पादनात मात्र मोठी घट निर्माण होण्याची भीती शेतकरी व्यक्त करीत आहेत.

### प्लास्टिकमुक्त भारताचा संकल्प; नागरिकांना मोफत कापडी पिशव्यांचे वितरण



तभा वृत्तसेवा


लातूर दि. १९ जुलै : आपले आरोग्य, आपलीच जबाबदारी अभियानांतर्गत राबविण्यात येणार्या भारत मुक्त प्लास्टिक अभियान अंतर्गत भारतीय जनता पक्षाच्या भाजपा प्रवक्त्या तथा नगरसेविका प्रेरणाताई होनराव यांच्या वाढदिवसानिमित्त बार्शी रोडवरील पाण्याच्या टाकी परिसरात नागरिकांना मोफत कापडी पिशव्यांचे वितरण करण्यात आले. वाढदिवस समाजोपयोगी उपक्रमातून साजरा करत पर्यावरण संरक्षणाचा प्रभावी संदेश देण्यात आला.

यावेळी नागरिकांना प्लास्टिकला नकार - कापडी पिशवीला होकार हा संदेश देत प्लास्टिकच्या वाढत्या वापरामुळे पर्यावरण आणि मानवी आरोग्यावर होणार्या गंभीर दुष्परिणामांची माहिती देण्यात आली. प्लास्टिकमुळे माती, पाणी व हवा प्रदूषित होते, जनावरे व पक्ष्यांच्या जीवाला धोका निर्माण होतो, नाले तुंबून पूरस्थिती निर्माण होते. तसेच प्लास्टिक जाळल्याने विषारी वायू तयार होऊन कर्करोग, दमा व इतर श्र्वसनविकारांचा धोका वाढतो. सूक्ष्म प्लास्टिक अन्न व पाण्यातून मानवी शरीरात जाऊन दीर्घकालीन आरोग्य समस्या निर्माण करू शकते. त्यामुळे प्रत्येकाने कापडी पिशवीचा वापर करून पर्यावरण रक्षणात योगदान द्यावे, असे आवाहन करण्यात आले.

या कार्यक्रमास बांधकाम उद्योजक नागनाथ गीते, माजी मुख्याध्यापक भागवत भोसले, सुनील ताडमडगे यांची प्रमुख उपस्थिती होती. उपस्थित मान्यवरांनी पर्यावरण संवर्धनासाठी अशा उपक्रमांची गरज अधोरेखित करत प्लास्टिकमुक्त भारत घडविण्यासाठी प्रत्येक नागरिकाने पुढाकार घ्यावा, असे मत व्यक्त केले.

कार्यक्रमाचे आयोजन सामाजिक कार्यकर्ते संजय राजुळे यांच्या पुढाकाराने आपले आरोग्य, आपलीच जबाबदारी अभियानांतर्गत करण्यात आले. उपस्थित नागरिकांनी प्लास्टिकचा वापर टाळून कापडी पिशवीचा स्वीकार करण्याचा आणि पर्यावरण संरक्षणासाठी सक्रिय सहभाग घेण्याचा संकल्प केला. वाढदिवस केवळ उत्सव म्हणून नव्हे, तर समाज आणि पर्यावरणासाठी उपयुक्त कार्य करून साजरा करूया, असा संदेश या उपक्रमातून देण्यात आला.

## 'शाहू'चे 'नीट' परीक्षेत घवघवीत यश



तभा वृत्तसेवा

लातूर दि. १८ जुलै : नीट-युजी-२०२६ परीक्षेचा निकाल गुरूवार दि. १६ जुलै रोजी रात्री जाहीर झाला. यामध्ये राजर्षी शाहू महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी पुन्हा एकदा घवघवीत यश संपादन केले आहे.

आतापर्यंत प्राप्त झालेल्या ८५० विद्यार्थ्यांच्या निकालानुसार मयुर गणेश आघाव या विद्यार्थ्याने (६८३ गुण) एआयआर-२१७ इतर मागासवर्गीय (ओबीसी) संवर्गातून एआयआर-५४ वा प्राप्त केला आणि महाविद्यालयातून सर्वप्रथम येण्याचा मान मिळवला. वास्तवसिंह नारायणराव वडणे (६७० गुण) एआयआर-५३२ व ईडब्ल्यूएस संवर्गातून एआयआर-२७ वा व महाविद्यालयातून सर्वद्वितीय, शंतनू रामदास दोडके (६७० गुण) एआयआर-५४८ व ईडब्ल्यूएस संवर्गातून एआयआर-३० वा प्राप्त करून महाविद्यालयातून सर्वतृतीय आला. अनुष्का सुनिल कांबळे (६२७गुण) अनुसूचित जाती संवर्गातून ९७ वा रँक प्राप्त करून प्रथम आली आहे तर देवांश रमेश जाधव (५८९ गुण) अनुसूचित जमाती संवर्गातून एआयआर-१०२ मिळवून महाविद्यालयातून प्रथम आला आहे तर कु. श्रावणी संतोष पोकळे (६५० गुण) एआयआर-१४७७ मिळवून मुलीत सर्वप्रथम आली.

महाविद्यालयात नीट-युजी परीक्षेच्या पुर्नतयारीसाठी इन्स्पायर (रिपीटर) बॅचचे विशेष वर्ग दरवर्षी चालविले जातात. आनंद शामराव शेंडगे (६५५गुण) एआयआर-११६१ प्राप्त करून महाविद्यालयातून प्रथम आला आहे. महाविद्यालयातून ६५० पेक्षा अधिक गुण प्राप्त करणारे ९ विद्यार्थी, ६०० पेक्षा ५६, ५५० पेक्षा १७३, ५०० पेक्षा ३५७ व ४५० पेक्षा अधिक गुण प्राप्त करणारे ५०३ विद्यार्थी आहेत. देशातील प्रख्यात अशा एम्स महाविद्यालयात किमान ५० पेक्षा जास्त विद्यार्थ्यांना निश्र्चित प्रवेश मिळू शकतो.

या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे शिव छत्रपती शिक्षण संस्थेचे अध्यक्ष व राजर्षी शाहू ज्युनिअर सायन्स कॉलेज शालेय समिती अध्यक्ष डॉ. अजय जाधव, सचिव बी. बी. ठोंबरे, सहसचिव डॉ. शिवाजीराव सुर्यवंशी, सहसचिव उद्धवराव पाटील व इतर सर्व संचालक, तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे, सीईटी-सेलचे संचालक प्रा. दिलीप देशमुख, उप-प्राचार्य सुरेश तांबडे, मुख्य-समन्वयक प्रा. स्वप्निल राजेमाने, व एम्स बॅचचे समन्वयक विनोद झरीटाकळीकर, इतर सर्व समन्वयक, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी विशेष अभिनंदन केले आहे.

### विद्यार्थिनींच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य ॥ शाळेसमोर विनाकारण रेंगाळणे पडणार महागात

## दामिनी पथकाची करडी नजर; ८५ जणांवर कारवाई




तभा वृत्तसेवा

लातूर दि. १९ जुलै : लातूर जिल्ह्यात शाळा, महाविद्यालये व विविध कोचिंग क्लासेस नियमितपणे सुरू झाले असून विद्यार्थिनींच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य देत लातूर पोलीसांकडून विशेष प्रतिबंधात्मक मोहीम राबविण्यात येत आहे. शैक्षणिक संस्थांच्या परिसरात विनाकारण रेंगाळणे, विद्यार्थिनींचा पाठलाग करणे, त्यांची छेड काढणे अथवा त्यांना मानसिक त्रास देणाऱ्यांविरुद्ध कठोर कारवाई करण्याचे आदेश पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांनी दामिनी पथकाला दिले आहेत. त्यानुसार दामिनी पथकाने ८५ जणांवर कारवाई केली आहे.

दामिनी पथकाकडून दररोज सकाळी ६ ते रात्री १० वाजेपर्यंत शाळा, महाविद्यालये, कोचिंग क्लासेस तसेच संवेदनशील परिसरात नियमित गस्त घालण्यात येत आ हे. अचानक तपासणी, संशयितांवर लक्ष ठेवणे तसेच विद्यार्थिनींशी संवाद साधून त्यांच्या सुरक्षिततेबाबत विश्र्वास निर्माण करण्याचे कामही दामिनी पथक या पथकाकडून सातत्याने केले जात आहे.

या विशेष मोहिमेदरम्यान शैक्षणिक संस्थांच्या परिसरात विनाकारण रेंगाळणाऱ्या व संशयास्पद वर्तन करणाऱ्या एकूण ८५ जणांवर महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ११० व ११७ अन्वये प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली आहे. यापुढेही अशा प्रकारचे गैरवर्तन करणाऱ्या व्यक्तींविरुद्ध तात्काळ कायदेशीर कारवाई करण्यात येणार आहे.

लातूर पोलीसांचे सर्व विद्यार्थिनी, पालक व शैक्षणिक संस्थांना आवाहन आहे की, शाळा, महाविद्यालय किंवा कोचिंग क्लासेस परिसरात कोणताही तरुण विनाकारण त्रास देत असल्यास, पाठलाग करत असल्यास किंवा संशयास्पद हालचाली करत असल्यास त्याची त्वरित माहिती द्यावी. अशा घटना लपवून न ठेवता आपत्कालीन क्रमांक ११२ वर संपर्क साधावा. तसेच परिसरात गस्त घालणाऱ्या दामिनी पथकाकडे, अथवा जवळच्या पोलीस ठाण्यात तात्काळ तक्रार नोंदवावी.

महिलांच्या व विद्यार्थिनींच्या सुरक्षिततेशी कोणतीही तडजोड केली जाणार नाही. सुरक्षित शैक्षणिक वातावरण निर्माण करण्यासाठी लातूर पोलीस कटिबद्ध असून अशा विशेष मोहिमा नियमितपणे सुरू राहणार आहेत, असा संदेश लातूर पोलिसांनी दिला आहे.